# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०२/२००६.** **दिनांक ०४.०३.२००६**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ०४ मार्च, २००६ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-२५९६-२००६, दि. २५ फेब्रुवारी, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ०४ मार्च, २००६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग | ०४. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. |
| ०५. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०६. | मा.श्रीमती रिम्पल लोहिया |
| ०७. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | ०८. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ०९. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १०. | मा.डॉ.पी.एल.तिवारी |
| ११. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते. | | |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.विश्वस्त सर्वश्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, मा.प्रकाश रामदास काळे, मा.शैलेश श्रीहरी कुटे, मा.समि खतिब व मा.कृष्णचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय यांचे पत्राची तसेच दुरध्वनी निरोपांची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

तसेच मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांचे दिनांक ०४.०३.२००६ चे पत्राची व सभेस अनुपस्थीत रहात असलेबाबतची नोंद घेण्यात आली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं. ०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०५.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.४.०२.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.०८ मध्ये शेवटी-**

"माहे नोव्हेंबर, २००५ अखेर प्रत्यक्ष जमा-खर्चाचे अवलोकन केले असता काही बाबींवरील जमा व खर्च मुळ तरतुदींपेक्षा अधिक होतील अशी शक्यता असल्याचे/झाल्याचे दिसून येते. यामुळे या बाबींसाठीची मुळ तरतूद माहे मार्च, २००६ अखेरपर्यंत अपुरी पडणार आहे. अंदाजपत्रकातील काही अपेक्षित वाढीव खर्चाच्या बाबींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**(अ) <u>वैद्यकीय अनुदान</u>** :-या बाबीत रुग्णांकडून येणाऱ्या अर्जाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे, रुग्णालय विभागाकडील मागणीनुसार सदरची तरतूद रुपये ०१ कोटीने वाढवून ७ कोटीवरुन रुपये ८ कोटी करण्यात येत आहे.

**(ब) <u>लेखापरिक्षण फी</u>** :-या बाबीत संस्थानने लेखापरिक्षणासाठी नियुक्त केलेले दोन लेखापरिक्षक यांच्या फीसाठी अंदाजपत्रकात रुपये २.४० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

**(क) <u>श्री साईनाथ रुग्णालय खर्च</u>** :- या बाबीवर संस्थान रुग्णांना देत असलेल्या वाढीव सेवेसाठी अंदाजपत्रकात रुपये ४६.५० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

**(ड) <u>सत्संग व योग साधना</u>** :-या बाबीवर मानवी कल्याणासाठी श्री रामदेव महाराज, हरिव्दार यांचे आयोजित केलेल्या योग साधना शिबीरासाठी मंजूर केलेल्या रुपये ३० लाख रकमेसाठी अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

उर्वरित मध्ये जाहिरात खर्च रुपये ०१ लाख, अतिथीगृह खर्च रुपये १.५० लाख, बँक चार्जेस १.५० लाख, उत्सव खर्च १५ लाख, डिजिटल प्रकाशने १० लाख इत्यादी खर्चात वाढ करण्यात आलेली आहे. इतर, जमा वा खर्चाच्या बाबींवरील मुळ तरतूदींमध्ये काही बदल अपेक्षित नसल्याने त्या तरतुदींचा पूनर्उल्लेख करण्यात आलेला नाही. सन २००५-०६ चे जमेचे व खर्चाचे मुळ निव्वळ अंदाजपत्रक रुपये १३९,११,९०,०००/- व रुपये १४१,८७,१०,०००/- मात्रचे आहे. (Opening व Closing-Cash Balances मुळे त्यांचा ताळमेळ झाला आहे.) मूळ तरतुदींमध्ये प्रत्येकी रुपये २,०७,९०,०००/- मात्रची वाढ होऊन, जमेचे व खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे असेल.

सुधारित निव्वळ जमा - रुपये १४१,१९,८०,०००/-

सुधारित निव्वळ खर्च - रुपये १४३,९५,००,०००/-

उपरोक्त सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

"माहे नोव्हेंबर, २००५ अखेर प्रत्यक्ष जमा-खर्चाचे अवलोकन केले असता काही बाबींवरील जमा व खर्च मुळ तरतुदींपेक्षा अधिक होतील अशी शक्यता असल्याचे/झाल्याचे दिसून येते. यामुळे या बाबींसाठीची मुळ तरतूद माहे मार्च, २००६ अखेरपर्यंत अपुरी पडणार आहे. अंदाजपत्रकातील काही अपेक्षित वाढीव खर्चाच्या बाबींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**(अ) वैद्यकीय अनुदान** :-या बाबीत रुग्णांकडून येणाऱ्या अर्जाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे, रुग्णालय विभागाकडील मागणीनुसार सदरची तरतूद रुपये ०१ कोटीने वाढवून ७ कोटीवरुन रुपये ८ कोटी करण्यात येत आहे.

**(ब) लेखापरिक्षण फी** :-या बाबीत संस्थानने लेखापरिक्षणासाठी नियुक्त केलेले दोन लेखापरिक्षक यांच्या फीसाठी अंदाजपत्रकात रुपये २.४० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

**(क) श्री साईनाथ रुग्णालय खर्च** :- या बाबीवर संस्थान रुग्णांना देत असलेल्या वाढीव सेवेसाठी अंदाजपत्रकात रुपये ४६.५० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

**(ड) सत्संग व योग साधना** :-या बाबीवर मानवी कल्याणासाठी श्री रामदेव महाराज, हरिव्दार यांचे आयोजित केलेल्या योग साधना शिबीरासाठी मंजूर केलेल्या रुपये ३० लाख रकमेसाठी अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

**इ) जाहिरात खर्च-याबाबतीत व्यवस्थापनाकडून नवीन प्रकल्प उदा.नियोजित प्रसादालय, श्री साईबाबा रुग्णालय, भक्तनिवासस्थान प्रकल्प इत्यादींसाठी प्रमुख तथा स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरातीमुळे अंदाजपत्रकात रुपये १६ लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.**

**ई) उत्सव खर्च- उत्सवात येणाऱ्या साईभक्तांच्या संख्येत होणारी वाढ, त्यांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधा व कलाकार मानधनात वाढ झाल्याने रुपये १८ लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.**

**उ) साईबाबा भक्तनिवासस्थान खर्च- भक्तनिवासस्थान इमारतीतील आधुनिक सोयी सुविधा व नवीन चादरी बेडशीट इत्यादी खरेदीमुळे अंदाजपत्रकात रुपये ३ लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.**

**ऊ) साईलीला खर्च- साईलीला मासिकाचे सभासदांच्या संख्येत झालेली मोठी वाढ व आधुनिक सुबक छपाईमुळे अंदाजपत्रकात रुपये ३.५० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.**

**ए) समाधी मंदिर खर्च- भक्तांची वाढलेली गर्दी, तसेच भक्तांचे सोयी सुविधेत केलेली वाढ त्यामुळे अंदाजपत्रकात रुपये १.५० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.**

उर्वरित मध्ये, अतिथीगृह खर्च रुपये १.७५लाख, बँक चार्जेस १.५० लाख, डिजिटल प्रकाशने १० लाख इत्यादी खर्चात वाढ करण्यात आलेली आहे. इतर, जमा वा खर्चाच्या बाबींवरील मुळ तरतूदींमध्ये काही बदल अपेक्षित नसल्याने त्या तरतुदींचा पुनर्उल्लेख करण्यात आलेला नाही. सन २००५-०६ चे जमेचे व खर्चाचे मुळ निव्वळ अंदाजपत्रक रुपये १,३९,११,९०,०००/- व रुपये १,४१,८७,१०,०००/- मात्रचे आहे. (Opening व Closing-Cash Balances मुळे त्यांचा ताळमेळ झाला आहे) मुळ तरतुदींमध्ये प्रत्येकी रुपये २,३४,१५,०००/- मात्रची वाढ होऊन, जमेचे व खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे असेल.

सुधारित निव्वळ जमा - रुपये १,४१,४६,०५,०००/-

सुधारित निव्वळ खर्च - रुपये १,४४,२१,२५,०००/-

उपरोक्त सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. " (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

**(०२) निर्णय क्र.२४ मध्ये शेवटी-**

"फेरनिविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात याव्यात. यामध्ये पुर्वी निविदा भरलेल्या निविदाधारकांना बयाणा रक्कमेची अट न ठेवता त्यांना संस्थान खर्चाने निविदा पाठवून फेर दर बंद पाकिटात देण्यास सांगण्यात यावे."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

"पुर्वी श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये भाडे तत्वावर मेडिकल स्टोअर चालविणेकामी निविदा भरलेल्या निविदाधारकांना बयाणा रक्कमेची अट न ठेवता त्यांना संस्थान खर्चाने निविदा पाठवून सुधारित दर बंद पाकिटात देण्यास सांगण्यात यावे."

**(०३) निर्णय क्र.७९-**

"मे.विजय स्टील कार्पोरेशन, मुंबई तर्फे विजय मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट या नावाने अजमेर येथे चालविण्यात येणारे रुग्णालय माहे सप्टेंबर,२००५ पासून बंद करण्यात आले आहे. तेथील चांगल्या स्थितीत

असलेले सामान ते संस्थानला मोफत देणेस तयार असलेबाबत त्यांनी पत्र दिलेले आहे. सदर साहित्याची प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

मे.विजय स्टील कार्पोरेशन, मुंबई तर्फे विजय मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट या नावाने अजमेर येथे चालविण्यात येणारे रुग्णालय माहे सप्टेबर,२००५ पासून बंद करण्यात आले आहे. तेथील चांगल्या स्थितीत असलेले सामान ते संस्थानला मोफत देणेस तयार असलेबाबत त्यांनी पत्र दिलेले आहे. **सदर साहित्याची संस्थानला आवश्यकता नाही, असे त्यांना कळविण्यात यावे** , असे ठरले. "

**(०४) निर्णय क्र.१०३ मध्ये शेवटी-**

"सध्या संस्थानचे विकासकामाकरीता शेती जमीन खरेदीचे काम चालू आहे. सदर जमीनी मोजणेकामी सर्व्हेअरची आवश्यकता आहे. सदर कामाकरीता श्री गबाजी सखाराम वराळ यांनी याकामासाठी कंत्राटी पध्दतीने १ वर्ष मुदतीकरीता रुपये ५०००/- या मासिक मानधनावर नियुक्ती देण्यात यावी असे ठरले."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

"सध्या संस्थानचे विकासकामाकरीता शेती जमीन खरेदीचे काम चालू आहे. सदर जमीनी मोजणेकामी सर्व्हेअरची आवश्यकता आहे. सदर कामाकरीता श्री गबाजी सखाराम वराळ यांनी याकामासाठी कंत्राटी पध्दतीने १ वर्ष मुदतीकरीता **रुपये ७०००/- या मासिक** मानधनावर नियुक्ती देण्यात यावी, असे ठरले." (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**(०५) निर्णय क्र.९०-** तहकुब करण्यात यावा.

तसेच या चर्चेच्यावेळी संस्थानमध्ये बऱ्याच वर्षापासून कंत्राटदारांमार्फत रोजंदारीवर कर्मचारी काम करीत आहेत. १०-१५ वर्षापासून काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यास जी रोंजंदारी मिळते तीच रोजंदारी आज रोजी कामास लागलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यास मिळत आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी संस्थानकडे उपलब्ध नसून, ती कंत्राटदारांकडे आहे. संस्थानमध्ये कंत्राटी पद्धतीने काम करणारे कर्मचाऱ्यांची कुशल व अकुशल अशा दोन भागात विभागणी केलेली आहे. मात्र याप्रमाणे करण्यात आलेल्या विभागणीनुसार अनेक पदवीधर अकुशल तर १० वी १२ वी पर्यंत शिक्षण झालेले काही कर्मचारी कुशल म्हणून काम करीत आहेत. ही तफावत दूर करणे आवश्यक आहे.

यावर चर्चा होऊन, याकामी संस्थान आस्थापनेवर रिक्त पदांचा अभ्यास करणेकामी खालील सदस्यांचे समितीची स्थापना करण्यात आली.

०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष
०२. मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३. मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे
०३. मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक,
०४. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे,

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/कामगार अधिकारी)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२. दिनांक १८.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.१०६.** दिनांक १८.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०३. दिनांक ११.२.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.१०७.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०२.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, ते **सोबत परिशिष्ट "अ" म्हणून** ठेवण्यात आले आहे. या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१.श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर कँटीन चालविणेकामी आलेले कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर कॅन्टीन चालविणेकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/११/२००५ चे सभेत ठेवण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ६६८ अन्वये १ वर्षाकरीता प्रायोजक तत्वावर चालविण्यास मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार दि. २६/११/२००५ चे मंजुर टिपणीन्वये सदरच्या कॅन्टीन चालविणेकामी सकाळ, लोकमत, लोकसत्ता, दैनिक सामना, टाईम्स ऑफ इंडिया व इंडियनएक्सप्रेस मुंबई आवृत्तीमध्ये जाहिरात देण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. २१/१२/२००५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे मुंबई व शिरडी कार्यालयात मिळून एकूण ३० निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. मुंबई कार्यालयातुन ०१ व शिरडी कार्यालयातून ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदर निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ चे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचा तुलनात्मक दरांचा तक्ता खालील प्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | प्रती महा देणारे भाडे |
|---|---|---|
| १ | चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. लि. शिर्डी | १) माल खरेदी, नोकर पगार, इंधन खर्च, लाईट बील व इतर खर्च संस्थानने करुन निव्वळ नफ्याचे १० % घसारा<br>२)संस्थानने सहकारी संस्थेस प्राधान्य म्हणून ठरवुन देईल अशा योग्य भाडे /घसारा देऊन भाडे तत्वावर १ वर्ष प्रायोगिक तत्वावर चालवण्यास तयार आहे. |
| २ | गिरीश शिवनारायण झंवर, शिर्डी | रु.१४,४४४.०० |
| ३ | महेश कारभारी पठारे, फत्त्याबाद | रु.५,०००.०० |
| ४ | विराज केटरर्स, सावेडी - अहमदनगर | रु.१७,७७७.०० |
| ५ | अनुपम सेंटर, कांदीवली-पुर्व | भाडे लिहीलेले नाहीत . |
| ६ | दामोधर बिंदल ॲण्ड असो.मुंबई | रु.१०,०११.०० |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालील दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. लि. शिर्डी | १) माल खरेदी, नोकर पगार, इंधन खर्च, लाईट बील व इतर खर्च संस्थानने करुन निव्वळ नफ्याचे १० % घसारा<br>२)संस्थानने सहकारी संस्थेस प्राधान्य म्हणून ठरवुन देईल अशा योग्य भाडे /घसारा देऊन भाडे तत्वावर १ वर्ष प्रायोगिक तत्वावर चालवण्यास तयार आहे. | १) माल खरेदी, नोकर पगार, इंधन खर्च, लाईट बील व इतर खर्च संस्थानने करुन निव्वळ नफ्याचे १० % घसारा<br>२)संस्थानने सहकारी संस्थेस प्राधान्य म्हणून ठरवुन देईल अशा योग्य भाडे /घसारा देऊन भाडे तत्वावर १ वर्ष प्रायोगिक तत्वावर चालवण्यास तयार आहे. |
| २ | गिरीश शिवनारायण झंवर, शिर्डी | रु.१४,४४४.०० | अनुपस्थित |
| ३ | महेश कारभारी पठारे, फत्त्याबाद | रु.५,०००.०० | अनुपस्थित |
| ४ | विराज केटरर्स, सावेडी - अहमदनगर | रु.१७,७७७.०० | २१,०००.०० |
| ५ | अनुपम सेंटर, कांदीवली-पुर्व | भाडे लिहीलेले नाहीत . | अनुपस्थित |
| ६ | दामोधर बिंदल ॲण्ड असो.मुंबई | रु.१०,०११.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन व मेडिकल स्टोअर्स यांबाबत मा.सदस्य डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांचे मार्गदर्शनाखाली आवश्यक ती कार्यवाही करावी अशी शिफारस करण्यात आली, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**०२. रुग्णालयासाठी मशिनरी/इक्वीपमेंट खरेदीकामी तज्ञ समिती नेमणेबाबत.**

नवीन नियोजित रुग्णालय लवकरच सुरु करण्याचे दृष्टीने दि.०४/०२/२००६ रोजीच्या सभेत त्यासंबंधी चाललेल्या खरेदी संदर्भात चर्चा झाली. आपल्या रुग्णालयातील खरेदी मोठया प्रमाणावर करावयाची असल्यामुळे व त्यातील बहुतांश खरेदी तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे त्याच्या निवड व खरेदी प्रक्रियेत उपयुक्त ठरेल अशा सदस्यांची एक तज्ञ समिती नेमल्यास कार्यवाही सुरळित होऊ शकेल अशी चर्चा झाली. त्यानुसार खालील रुग्णालयातील एक तज्ञ प्रतिनिधी निवड व वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावा असे सुचविले गेले. त्यानुसार खालील रुग्णालये निवडण्यात आली.

०१. कमल नयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद
०२. निरामय रुग्णालय, पिंपरी चिंचवड
०३. रुबी हॉल क्लिनिक,पुणे
०४. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय,पुणे
०५. प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय,रुग्णालय, लोणी
०६. सहयाद्रि रुग्णालय,पुणे

वरील रुग्णालयातील एकेक तांत्रिक प्रतिनिधी आजच्या बैठकीसाठी बोलविण्यात आले होते. परंतू, एकही तांत्रिक प्रतिनिधी आजचे सभेस उपस्थित नव्हते. याकामी ३ तज्ञांची नावे डॉ.विनय कोठारी,सल्लागार, यांनी सुचवावित व त्यांची एकत्रित सभा मुंबई येथे घेणेत यावी, असें ठरलें, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**०३. श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदी बाबत आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटीव्दारे निर्णय घेणेबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये नेत्रशल्य चिकित्सा विभागासाठी नव्याने खरेदी करावयाचे मशिनरी/उपकरणे / हत्यारे इत्यादी खरेदीकामी अंदाजे रु. २,४४,१५,०००/- इतका खर्च येणार आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Description | Amount in Rs. |
|---|---|---|
| 01. | Diagnostic Instruments | 1,64,45,000.00 |
| 02. | Surgical / Therapeutic Instruments | 59,70,000.00 |
| 03. | Surgical Instruments Sets | 20,00,000.00 |
| | Total - | 2,44,15,000.00 |

तसेच या व्यतिरिक्त श्री साईबाबा रुग्णालयाकरीता अजून नव्याने लागणारे मशिनरी / उपकरणे, सर्जीकल साहित्य, किरकोळ साहित्य, इत्यादी कामी अंदाजे रु. दोन कोटी खर्च येणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Description | Amount in Rs. |
|---|---|---|
| 01. | Orthopedic Instruments | 53,40,000.00 |
| 02. | Physiotherapy Machines | 10,00,000.00 |
| 03. | Cardiology Instruments | 20,15,000.00 |
| 04. | Neurology / Neuro Surgery Instruments | 30,00,000.00 |
| 05. | Radiology Instruments | 6,75,000.00 |
| 06. | Bio Medical Waste Management | 1,36,000.00 |
| 07. | Pathology / Microbiology Instruments | 7,20,000.00 |
| 08. | Others | 10,55,000.00 |
| 09. | Store / Sundry Items | 60,59,533.00 |
| | Total - | 2,00,00,533.00 |

असा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१२/२००५ चे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र. ८२० अन्वये सदरचे मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदीकामी मान्यता मिळालेली असून याकामी यापुर्वीच्या निर्णयानुसार मा. विश्वस्तांच्या सल्ल्यानुसार विहित पध्दतीने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तसेच निर्णय क्र. ८१९ अन्वये कार्डीओ व्हॅस्क्युलर सर्जरी, आर्थोपेडीक, ऑन्को सर्जरी इत्यादीसाठी जाहिरात देऊन फेर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, दैनिक सामना या सर्व आवृत्यामध्ये तर इंडियन एक्सप्रेस - मुंबई आवृत्ती या इंग्रजी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री दि.१३.०१.२००६ पासून व निविदा स्विकारण्याची मुदत दि.२१.०१.२००६ पर्यंत ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिरडी कार्यालयात २० आणि मुंबई कार्यालयात ५० मिळून एकूण ७० निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | योगेश्वर इंप्लान्टस प्रा. लि., ठाणे | ३६ | मेडीकेड सिस्टीम, चंदीगढ |
| २ | युनीव्हर्सल केमीकल्स, नाशिक | ३७ | संजय मेडीकल, पिंपरी-पुणे |
| ३ | ऑल ऑफिस ऑटोमेशन, पुणे | ३८ | झेनीथ सर्जिकल, मुंबई |
| ४ | विलास इलेक्ट्रॉनीक्स, नाशिक | ३९ | पिक्स मेडीकल, मुंबई |
| ५ | सेन्चुरीयन मार्केटींग, अहमदनगर | ४० | बायोमेड, मुंबई |
| ६ | स्वॅन इलेक्ट्रो मेक. सिस्टीम, नाशिक | ४१ | सुपेरीयर इलेक्ट्रॉनीक्स, मुंबई |
| ७ | हॉस्पिकेअर, अहमदनगर | ४२ | कॉसमॉस, मुंबई |
| ८ | महेश सर्जिकल, पुणे | ४३ | सिमेन्स लि., मुंबई |
| ९ | इनफ्रेस मेथोडेक्स, पुणे | ४४ | लाईफ लाईन सिस्टीम, नवी दिल्ली |
| १० | श्री आर्थोटुल्स, नाशिक | ४५ | ऑलम्पिक फार्मा, नवी दिल्ली |
| ११ | मेडीकेअर सिस्टीम, बद्दी | ४६ | टोटल प्रेझेन्टेशन, पुणे |
| १२ | कांचन ड्रग्ज, पुणे | ४७ | अलरजन मेडीकल सिस्टीम, चंदीगढ |
| १३ | जे.एस.पी. सर्जिकल, नाशिक | ४८ | एशियन सेल्स कार्पो., नाशिक |
| १४ | राहुल एंटरप्रायजेस, नाशिक | ४९ | कनसेप्ट इंटीग्रेशन, पुणे |
| १५ | व्यकंटेश सर्व्हीसेस, औरंगाबाद | ५० | विज्युएल इम्पॅक्ट, मुंबई |
| १६ | पुर्णिमा सर्जिकल, नाशिक | ५१ | तोवा सेल्स कार्पो, नवी दिल्ली |
| १७ | प्रेसी एंटरप्रायजेस, नाशिक | ५२ | वैभव एजन्सी, पुणे |
| १८ | एच.सी.एल. इनफन्ट लि., पुणे | ५३ | चोक्सी एमंजीनींग, मुंबई |
| १९ | गांधी एंटरप्रायजेस, अहमदनगर | ५४ | मोनोझाईन इंडीया, सिकंदराबाद |
| २० | आर बी इलेक्ट्रॉनीक्स, अहमदनगर | ५५ | बीएल लाईफ सायन्स, नवी दिल्ली |
| २१ | रेसेकेअर मेडीसीस, मुंबई | ५६ | टीमपॅक इंजिनीअर्स, नवी दिल्ली |
| २२ | झाप कार्डीओट्रॉनीक्स, मुंबई | ५७ | सिथेन्सीस मेडीकल, नवी दिल्ली |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | इंटरकार्डीओ प्रा. लि., नवी दिल्ली | ५८ | बायोटेक, मुंबई |
| २४ | मनमन, पुणे | ५९ | अल्कॉन लॅब, मुंबई |
| २५ | लाईफकेअर डिव्हाइसेस, ठाणे | ६० | एल अँन्ड टी, पुणे |
| २६ | ॲडव्हान्स मेडीकल, बेंगलोर | ६१ | संजय सायंटिफीक, मुंबई |
| २७ | वेड मेड सॉप्टवेअर, नवी दिल्ली | ६२ | मेहेरा आयटेक, मुंबई |
| २८ | छाया ग्राफीक्स लि., बेंगलोर | ६३ | सर्जीडन्ट मेडीकेअर, पुणे |
| २९ | आप्पास्वामी असोसिएटस, मुंबई | ६४ | बायोमेडीक्स, मुंबई |
| ३० | कालेलकर सर्जिकल, मुंबई | ६५ | ट्रान्ससाशिया, मुंबई |
| ३१ | इमरजन्ट, मुंबई | ६६ | इलाईट हेल्थकेअर, नवी दिल्ली |
| ३२ | माय हेल्थ, मुंबई | ६७ | लाईफ साईट, अहमदाबाद |
| ३३ | बायोमेडीकॉन, मुंबई | ६८ | आनंद मार्केटींग, ठाणे |
| ३४ | बायोमेडीकॉन, मुंबई | ६९ | ॲडव्हान्स मेडीकल, बेंगलोर |
| ३५ | विशाल सर्जिकल, मुंबई | ७० | रजत सेल्स, मुंबई |

वरील प्राप्त ७० निविदापैकी अ.नं. ४८ मे. एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांची निविदा खरेदी विभागाची असल्याने ती त्यांचेकडे वर्ग करण्यात आलेली आहे. तर. अ.नं. १६ मे. पुर्णिमा सर्जिकल, नाशिक ही निविदा आर्थोपेडीक ॲप्लायन्सेसची असल्याने तीचा प्रस्ताव स्वतंत्र असून त्यामध्ये त्याचा विचार करण्यात येत आहे. अशा उर्वरीत ६८ निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता. तसेच निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

सभेत नेत्र, अर्थोपेडिक व इ.सी.जी या विभागासाठी लागणारी मशिनरी,उपकरणे, खरेदीकामी बोलविण्यात आलेल्या निविदासादरकर्त्यांना समक्ष बोलावून चर्चा/वाटाघाटी केल्या. या सभेस मा.डॉ. तिवारी यांचे सोबत उपस्थित नेत्रतज्ञ डॉ.नागेंद्र शहा यांच्या सल्ल्यानुसार नेत्र विभागाच्या साहित्याबद्दल शिफारस घेण्यात आली. इतर विभागांसाठी आवश्यक असणारी उपकरणे , हत्यारे इत्यांदीची संख्या जास्त असल्याने तसेच वेळेअभावी उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित बोलावून त्यांना श्री साईबाबा संस्थान हे धर्मादाय संस्था असल्याने पूर्वी दिलेल्या दरामध्ये कांही सवलत देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकीटात द्यावेत, असे सांगण्यात आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तज्ञ समितीकडून शिफारस घेऊन, तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**०४. श्री साईबाबा रुग्णालयासाठी कर्मचारी आकृतीबंधाबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचे मार्फत अद्ययावत सुविधानीयुक्त असे २०० खाटांचे रुग्णालय तयार करणेबाबतचा प्रस्ताव मान्य होऊन त्यानुसार सदर रुग्णालयासाठी आवश्यक असलेला मेडीकल/पॅरामेडीकल अशा एकूण ५४२ कर्मचाऱ्यांचा सेवक आकृतीबंध मान्यतेसाठी दिनांक १६.०८.२००५ चे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

त्यानंतर मा.सचिव, विधी व न्याय विभाग यांचे आदेशानुसार सदरचा सेवक आकृतीबंध मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून प्रमाणित करुन घेऊन दिनांक ०३.१०.२००५ चे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पुन्हा पाठविण्यात आलेला आहे.

आकृतीबंधाबाबत विचार विनिमय सभा झाली. सदर सभेत सुधारित ७३७ पदाच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात येऊन सदर आकृतीबंध मा.सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, (महाराष्ट्र शासन) यांचे शिफारसींसह शासनास सादर करण्यात आला आहे.

दिनांक ०७.०२.२००६ रोजी सुधारित आकृतीबंधाबाबत मंत्रालयात माहिती घेतली असता सदरचा आकृतीबंध मा.संचालक, आरोग्यसेवा यांनी मा.सचिव, आरोग्य विभाग, मंत्रालय, यांचेमार्फत शासनास सादर केला आहे अशी माहिती मा.कार्यकारी अधिकारी यांनी दिली त्याची नोंद घेण्यात आली. तसेच नेमणूक करावयाचे कर्मचाऱ्यांचा जॉब चार्ट तयार करणेबाबत डॉ.विनय कोठारी,सल्लागार, यांचा सल्ला घेऊन कार्यवाही करावी, असे ठरलें. त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/अधिक्षक,आस्थापना)

**०५. श्री साईबाबा रुग्णालयासाठी कर्मचारी नेमणूकीबाबत.**

**अ)** दि.२९-३० जानेवारी २००५, दि.०७ व ०८ ऑगष्ट २००५, दि.१०/०९/२००५ व १८/१२/२००५ तसेच दि.१२/०१/२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वेळोवेळी घेतलेल्या डॉक्टरांच्या मुलाखतीद्वारे मा.विश्वस्त तथा वैद्यकीय निवड समितीचे अध्यक्ष मा.डॉ.पी.एल.तिवारी व मा.विश्वस्त तथा निवड समितीचे उपाध्यक्ष डॉ.ई.बी.गोंदकर यांनी निवड केलेल्या डॉक्टरांची विभागणी तीन विभागात केलेली आहे.

०१.पूर्ण वेळ कन्सल्टंट ०२. मानद कन्सल्टंट ०३. व्हिजीटींग कन्सल्टंट

**०१.** उपरोक्त प्रमाणे विभागणी केलेल्या डॉक्टरांचा आवश्यकतेनुसार पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत त्यात पूर्णवेळ कन्सल्टंट म्हणून खालील वैद्यकीय अधिकारी सेवेत दाखल झालेले आहेत, त्यांची माहिती पुढील प्रमाणे.:-

| अ.नं. | वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नांव व पदनाम | सदर पदांवर हजर तारीख | दरमहा देण्यात येणारे वेतन | सध्या कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.संजय कृ.पटवर्धन, वैद्यकीय प्रशासक | ०१/१२/२००५ | रु.,२५,०००/- | श्रीसाईबाबा हॉस्पिटल |
| २ | डॉ.प्रकाश चिं.मारपकवार, कार्डीयॅक सर्जन | १७/१०/२००५ | रु. २५,०००/- | वरीलप्रमाणे |
| ३ | डॉ.रेखा काशिनाथ ढवळे, ज्यु.रेडीओलॉजीस्ट | २७/१०/२००५ | रु. १८,०००/- दि.३१/०१/०६ राजीनामा | वरीलप्रमाणे |
| ४ | डॉ.अर्जुन जी.वैगास, वैद्यकीय अधिकारी, आर्थो | १३/१०/२००५ | रु. २१,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| ५. | डॉ.प्रताप पी.गिरगुणे, वैद्यकीय अधिकारी, आर्थो | १३/१०/२००५. | रु.२१,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| ६. | डॉ.कुलदिप आर.बाघ, वै.अधिकारी, स्त्री रोग व प्रसुतीतज्ञ | ०६/१०/२००५ | रु.२१,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| ७ | डॉ.शामकांत व्ही.शिंदे वैद्यकीय अधिकारी, बालरोग तज्ञ | १७/१०/२००५ | रु.२५,०००/- रुजु झालेले नाहीत. | श्री साईनाथ रुग्णालय |
| ८ | डॉ.दादासाहेब एल.कांबळे वैद्यकीय अधिकारी, त्वचारोग तज्ञ | १४/१०/२००५ | रु.२१,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| ९ | डॉ.सचिन दि.खोचीकर, वैद्यकीय अधिकारी, भुलतज्ञ | ०६/१०/२००५ | रु.१८,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १० | डॉ.स्नेहल नि.पाटील, आर.एम.ओ.ई एन.टी | ०४/१०/२००५. | रु.१८,०००/- दि.३१/१२/०५ राजीनामा | श्री साईनाथ रुग्णालय |
| ११ | डॉ.सुर्यकांत रा.पाटील, आर.एम.ओ. | ०७/१०/२००५ | रु.१७,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १२ | डॉ.वैशाली लक्ष्मण क्षीरसागर, आर.एम.ओ. | ०८/१०/२००५ | रु.१८,०००/- दि.२०/०१/०६ राजीनामा | श्री साईनाथ रुग्णाल |
| १३ | डॉ.दिनेश श्री.खोडसकर, आर.एम.ओ. | ०८/१०/२००५ | रु.१८,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १४ | डॉ.उषा विष्णू कोळपे, आर.एम.ओ. | १०/१०/२००५ | रु.१८,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १५ | डॉ.सुभाष श्रीराम शामकुंवर, आर.एम.ओ. | १७/१०/२००५ | रु.१७,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १६ | डॉ.अजयकुमार बा.धोंगडे, आर.एम.ओ. | ०७/१०/२००५ | रु.१८,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १७ | डॉ.अजित यशवंत पाटील, आर.एम.ओ. | १३/१२/२००५ | रु. २१.०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १८ | डॉ.रुपेश अशोक जडगे, आर.एम.ओ. | ०७/११/२००५ | रु. १८,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| १९ | डॉ.प्रणोती शिंगारे, आर.एम.ओ. | २०/०१/२००६ | रु.१८,०००/- | श्रीसाईबाबा हॉस्पिटल |
| २० | श्री अनिल आप्पा प्वार,सि.टी.स्कॅन टेक्नि. | २४/०९/२००५ | रु.८,५००/- | श्रीसाईबाबा हॉस्पिटल |

उपरोक्त शिवाय दि.१८/१२/२००५ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीमधील नेमणूकीसाठी निवड झालेले वैद्यकीय अधिकारी (०१) डॉ.ए.जे.नुलकर,जनरल सर्जन (०२) डॉ.अनिता वैगास, त्वचारोग तज्ञ यांना नेमणूकपत्र पाठविण्यात आलेले आहेत.

तसेच दि.१२/०१/२००६ रोजीच्या मुलाखतीमधील नेमणूकीसाठी निवड झालेले डॉ.मोहम्मद नदिम अहमद, परफ्युजनिस्ट, यांना नेमणूकपत्र पाठविण्यात आलेले असून ते सदर पदावर हजर झालेले आहेत,व डॉ.विजय नरोडे,सिनियर इंन्टेन्सीव्हीस्ट तसेच डॉ.विजय व्यवहारे परफ्युजनिस्ट व डॉ.शामसुंदर साबळे तसेच डॉ.सचिन उंडे,नेत्ररोग तज्ञ, यांची पूर्णवेळ कन्सल्टंट म्हणून नेमणूकीसाठी निवड झालेली असल्याने त्यांची नेमणूकपत्रे पाठविण्यात यावीत..

**०२/०३) मानद कन्सलटंट व व्हीजीटींग कन्सलटंट :-**

उपरोक्त शिवाय श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता व्हीजीटींग/ऑनररी कन्सलटंट पदांवर नेमणूक द्यावयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची माहिती पुढील प्रमाणे

| अ.नं | वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ.आश्वीन बी.मेहता | visiting Con.in Cardiology | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ०२ | डॉ.अनिल कुमार | visiting Con.in Cardiology | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ०३ | डॉ.एस.एस.भट्टाचार्या | visiting Con.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४. | डॉ.डी.एस.सक्सेना | visiting Con.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | डॉ.रमाकांत पांडे | visiting Con.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ६. | डॉ.जी.टी.हेगडे | visiting Con.in Onco Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ७ | डॉ.के ई.तुरेल | visiting Con.in Neuro Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ८. | डॉ.सी.इ.देवपुजारी | visiting Con.in Neuro Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ९. | डॉ.एच.आर.झुनझुनवाला | visiting Con.in Orth. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १० | डॉ.निलेश शहा | visiting Con.in Orth. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ११ | डॉ.समिर दळवी | visiting Con.in Spiral. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १२ | डॉ.ए.जी.नंन्दे | visiting Con.in Gen. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १३ | डॉ.एम.बी.चोपडा | Hon. Consultant in Cardiology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १४ | डॉ.व्ही.एम.विजन | Hon. Consultant in Cardiology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १५ | डॉ.सुनिल सोनवणे | Hon. Consultant in Cardiology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १६ | डॉ.ए.धर्माधिकारी | Hon. Consultant in Cardiology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १७ | डॉ.एस.एस.देशमुख | Hon. Consultant in Cardiology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १८ | डॉ.गिरीश सावंत | Hon. Consultant in Cardiology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| १९ | डॉ.अजय चौरसिया | Hon. Consultant in Cardiology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २० | डॉ.अनिरुध्द त्रिवेदी | Hon. Cons.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २१ | डॉ.ए.पी.देवधर | Hon. Cons.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २२ | डॉ.आर.एन.उंबरकर | Hon. Cons.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २३ | डॉ.अली बहेरीनवाला | Hon. Cons.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २४ | डॉ.अभय वालीया | Hon. Cons.in Cardiac Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २५ | डॉ.ए.डी.महाजन | Hon. Cons.in Urology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २६ | डॉ.आर.आर.पटणी | Hon. Cons.in Urology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २७ | डॉ.शरद सोमाणी | Hon. Cons.in Urology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २८ | डॉ.जे.वी.ढबालिया | Hon. Cons.in Urology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| २९ | डॉ.एस.ए.बोन्डार्डे | Hon. Cons.in Medical Oncology | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३० | डॉ.संजय शर्मा | Hon. Cons.in Oncosurgery | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३१ | डॉ.यु.व्ही.टाकळकर | Hon. Cons.in Oncosurgery | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३२. | डॉ.आर.आर.साऊजी | Hon. Cons.in Oncosurgery | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३३ | डॉ.धैर्यशिल एन.सावंत | Hon. Cons.in Oncosurgery | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३४ | डॉ.कुमतेकर,सोलापूर | Hon. Cons.in Oncosurgery | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३५ | डॉ.हिर्तेद्र गडकरी | Hon. Cons.in Neuro Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३६ | डॉ.वाय.बी.वरगंटवार | Hon. Cons.in Neuro Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३७ | डॉ.एस.एस.वराडे | Hon. Cons.in Neurology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३८ | डॉ.एन.जी.नाईक | Hon. Cons.in Plastic Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ३९ | डॉ.मनिष पटेल | Hon. Cons.in Plastic Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४० | डॉ.जे.जे.कुलकर्णी | Hon. Cons.in Plastic Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४१. | डॉ.के.के.अग्रवाल | Hon. Cons.in Plastic Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४२ | डॉ.सी.आर.तांबे | Hon. Cons.in Maxillofaical Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४३ | डॉ.सोनिया जिंदाल | Hon. Cons.in Maxillofaical Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४४ | डॉ.डी.बी.शिरसाठ | Hon. Cons.in Ortho. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४५ | डॉ.तुषार देवरे | Hon. Cons.in Ortho. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४६ | डॉ.एच.ए.चिनिवाला | Hon. Cons.in Ortho. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४७ | डॉ.मिस.धर्माधिकारी | Hon. Cons.in Radiology | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४८ | डॉ.मनोहर केतकर | Hon. Cons.in Gen. Medicine. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ४९ | डॉ.एस.आर.दिघोळकर | Hon. Cons.in Gen. Medicine. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५० | डॉ.के.व्ही.नेने | Hon. Cons.in Gen. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५१. | डा.राजेश माळी | Hon. Cons.in Gen. Surgery. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५२. | डॉ.एस. इंदूरकर | Hon. Cons.in Diabetology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५३ | डॉ.एन.बी.शहा | Hon. Cons.in Ophthalmology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५४ | डॉ.चौधरी | Hon. Cons.in Ophthalmology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५६ | डॉ.आर.बी.जैयस्वाल | Hon. Cons.in ENT. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५७ | डॉ.मिलींद नवलखे | Hon. Cons.in ENT. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५८ | डॉ.डी.डी.लाहीरे | Hon. Cons.in Anaesthesiology | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ५९ | डॉ.मधुमिता अग्रवाल | Hon. Cons.in Pediatrics. | श्री साईबाबा हॉस्पिटल |

| | | | |
|---|---|---|---|
| ६०. | डॉ.देवदत्त चाफेकर | Hon. Cons.in Nephrology. | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ६१ | डॉ.जितेंद्र खैरनार | Honorary Perfusionist. | श्री साईबाबा हॉस्पिटल |

उपरोक्त प्रमाणे नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत, त्याची नोंद घेण्यात आली.

**ब)**लेफ्ट.कर्नल एच.सी.तिवारी यांनी संस्थान रुग्णालयात प्रशासकीय अधिकारी या पदावर नेमणूक मिळणेकामी दि.०४/११/२००५ चे पत्राने विनंती केलेली असून या संदर्भात **दि.०५/११/२००५** रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ.तिवारी यांचे समवेत चर्चा झाली असून लेफ्ट.कर्नल.एस.सी.तिवारी यांना दरमहा रु.१५,०००/- मानधन देऊन,कंत्राटी पध्दतीने योग्य त्या पदावर एक वर्षासाठी नेमणूक द्यावी असे तोंडी चर्चेत सुचीत केलेले आहे.

संस्थान रुग्णालयासाठी आवश्यक असलेला व मान्यतेसाठी दि.२४/०१/२००६ रोजी सादर केलेल्या नवीन सेवक आकृतीबंधात उपरोक्त पदासाठीची शैक्षणिक पात्रता, M.B.B.S.With D.H.A./MHA/ M.Phil/PG (Preferred) अशी निर्धारीत केलेली असून,लेफ्ट.कर्नल तिवारी यांची शैक्षणिक पात्रता B.A.D.I.B.M.Dip.in Dental Higen. अशी आहे. तसेच त्यांचे आजमितीस वय ६९ वर्ष असे असून शासन नियमाप्रमाणे त्यांचे विहीत वयोमर्यादे पेक्षा अधिकचे वय आहे.

तरी लेफ्ट.कर्नल एच.सी.तिवारी यांना वरीलप्रमाणे कंत्राटी पध्दतीने नेमणूक दिल्यानंतर दोन्हीही हॉस्पिटलसंबंधी कार्यालयीन कामे व आवश्यकतेनुसार रुग्णालयामधील इतर काही कामे (वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये, नेमून देतील ती) त्यांचेकडे सोपविता येतील. ते वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये, यांचे अधिपत्याखाली कामे पहातील. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, लेफ्ट.कर्नल एच.सी.तिवारी यांना सहा महिन्यांकरीता दरमहा रुपये १५०००/- या एकत्रित मानधनावर तात्पुरती नेमणूक करण्यात यावी, अशी सर्वानुमते शिफारस करणेत आली.

**याचवेळी वरीलप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कामाचे स्वरुप व अधिकार याबाबत कन्सल्टंट डॉ.विनय कोठारी व वैद्यकीय उपसमिती सभेच्या विश्वस्तांनी निर्णय घ्यावा, असे ठरले.**

**क)** डॉ.एस.एस.डांगे,जनरल सर्जन यांना मानद सर्जन म्हणून संस्थान सेवेत पुनःश्च नेमणूक देण्यात येऊ नये, असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/अधिक्षक,आस्थापना)

**०६. श्री साईबाबा हॉस्पिटल सेवांचे दरांबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे सेवादरांबाबत, Ruby Hall Clinic, Bombay Hospital, Niramay Hospital, Deenanath Mangeshkar Hospital या रुग्णालयाच्या दरांबाबत तसेच संस्थानने आकारावयाच्या दराबाबतच्या प्रती सर्व विश्वस्तांना अभिप्रायासाठी पुरविण्यात याव्यात. त्यांच्या शिफारसीनंतर अंतिम निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**०७. श्री साईनाथ रुग्णालयातील बेडस् श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हलविणेबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये जुन्या रुग्णालयातील खालीलप्रमाणे बेडस् स्थलांतरीत करणेची उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| विभागाचे नांव | बेडची संख्या |
|---|---|
| आर्थोपेडिक | १० |
| मेडिसिन | २० |
| सर्जीकल | २० |
| एकूण | ५० |

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**०८. डॉ.विनय कोठारी यांचे रुग्णालय प्रकल्प अहवालाबाबत.**

दि.२७/१२/२००४ रोजीच्या सभेत विषय क्र.२१, निर्णय क्र.१९२ अन्वये नव्या इमारतीत हे २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय असावे, ज्यात सुपरस्पेशालिटी सेवा बरोबर सामान्य सेवाही सशुल्क देता याव्यात असे ठरविले.

या प्रकल्पाबाबत संपूर्ण अहवाल तयार करुन घ्यावा असे विश्वस्त सभेच्या दि. ०३/०५/२००५ रोजीच्या सभेत ठरले. त्यानुसार अशा कामातील एक तज्ञ डॉ. विनय कोठारी यांचेशी मा. अध्यक्ष व काही सभासदांनी चर्चा केली व तसा अहवाल त्यांनी लवकरात लवकर म्हणजे २ जून पुर्वी सादर करावा अशी त्यांना विनंती केली. या नंतर डॉ. विनय कोठारी यांनी दि. ०८/०५/२००५ रोजीच्या विश्वस्त सभेस उपस्थित राहून सभासंदाच्या प्रश्नांना समाधान कारक उत्तरे दिली व प्रकल्प अहवाल दि. ०२/०६/२००५ पूर्वी सादर करण्याचे कबूल केले.

यानुसार डॉ. कोठारी यांनी दि. ०१/०६/२००५ रोजी मुंबई कार्यालयात हा प्रकल्प अहवाल आराखडा सादर केला होता तो सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता. त्यानंतर डॉ.कोठारी यांनी ना नफा ना तोटा या तत्वावरील अंतिम अहवाल दि.१३.१२.२००५ रोजी सादर केलेला असून, त्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, तसेच डॉ.कोठारी आजचे सभेत समक्ष उपस्थित होते. सदर

अहवालाबाबत सविस्तर माहिती सभेस करुन दिली. सदर अहवालाची नोंद घेण्यात आली. डॉ.विनय कोठारी यांना मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.५.२००५ चे सभेतील निर्णय क्र.२१५ अन्वये ठरलेले मानधन रुपये २,५०,०००/- पैकी दिलेला ॲडव्हॉन्स रुपये १,००,०००/- वजा जाता त्यांची उर्वरित रक्कम आदा करण्यात यावी अशी या उपसमितीने शिफारस केली. तसेच अंतिम अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना पाठविण्यात याव्यात,असें सांगण्यात आले, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**०९. रुग्णालय एन्डोस्कोपीज इन्स्ट्रूमेंटस् दुरुस्तीबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरमधील एन्डोस्कोपी इन्ट्रुमेंट हे कार्ल स्टोअर्ज, जर्मनी हया कंपनीचे असून ते सन १९९९ साली कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे भारतातील अधिकृत विक्रेते मे. चिमको बायोमेडिकल यांचेकडून खरेदी करणेत आले होते. त्यातील एकूण ०३ इन्ट्रुमेंट दुरुस्तीसाठी मे. चिमको बायोमेडिकल इंजीनियरींग कंपनी, मुंबई, याचेकडील पत्र क्र. एसएसएस/ एसएसएच/ स्टोअर/ ११३९६/ ०४, दि. ०४.११.२००४ अन्वये पाठविले होते. कंपनीने वरील इन्ट्रुमेंट तपासून सदरचे इन्ट्रुमेंट दुरुस्ती होत नसल्यामुळे जुने इन्ट्रुमेंट परत करुन त्याबदली नवीन घ्यावे लागतील असे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने दि. १६.०८.२००५ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविलेले आहे.

| Sr. no. | Name of Instrument | Catalog no. | Qty. | Rate |
|---|---|---|---|---|
| 01 | Hook Scissor | 30421 EK | 1 | 25,960.00 |
| 02 | Bio Forceps | 27072 A | 1 | 29,150.00 |
| 03 | Bio Forceps | 27072 A | 1 | 32,780.00 |
| | | | Total Rs: | 87,890.00 |

उपरोक्त इन्ट्रुमेंट हे ऑपरेशन थिएटरमध्ये दैनंदिन शस्त्रक्रियांसाठी आवश्यक असतात. त्यामुळे ते तातडीने बदलून घेणे आवश्यक आहे. सदरचे इन्ट्रुमेंट मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी यांना परत करुन नवीन घेण्यासाठी एकूण रु.८७,८९०/-(अक्षरी रु. सत्त्याऐंशी हजार आठशे नव्वद मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

मे. चिमको बायोमेडिकल, मुंबई यांनी दि. १६.०८.२००५ च्या पत्रान्वये सदरची रक्कम रु. ८७,८९०/- आगाऊ पाठविण्यास कळविले आहे.

तरी सदर इन्ट्रुमेंट मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी यांना परत करुन नवीन त्याच प्रकारचे ०३ इन्स्ट्रुमेंट घेण्यासाठी सदरची रक्कम रु. ८७,८९०/- मे. कार्ल स्टोअर्ज, नवी दिल्ली यांना आगाऊ पाठविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**१०. दिनांक १२.०१.२००६ रोजी संस्थानचे मुंबई येथील कार्यालयात झालेल्या वैद्यकीय अधिकारी मुलाखतीचे इतिवृत्त /अहवाल -**

दिनांक १२.१२.२००५ चे वर्तमानपत्रात श्री साईबाबा रुग्णालयासाठीच्या काही पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार आलेल्या अर्जापैकी १३पात्र उमेदवारांना संस्थानचे मुंबई येथील कार्यालयात गुरुवार दिनांक १२.०१.२००६ रोजी दुपारी २.०० वाजता मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. या इतिवृत्ताच्या/अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन ते सोबत परिशिष्ट **"अ"** म्हणून ठेवण्यात आले आहे. या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात यावी, अशी शिफारस करण्यात आली.

**०१) <u>सिनियर इन्टेन्सिव्हिस्ट</u> ‑**

MD (Med.Anaesthesia) Dip.in intensive care 5 yrs experience preferable)

या पदासाठी डॉ.विजय नरोडे, MD (Anaes) हे एकच उमेदवार उपस्थित होते. त्यांची निवड करण्यात आली व त्यांना सहा महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात यावी. त्याच्या त्या काळातील कामाच्या स्वरुपावरुन पुढील नियुक्तीबाबत विचार करण्यात यावा, असे ठरले.

**०२) <u>परफ्युजनिस्ट -</u>**

**B.sc. Dip in perfusion Tech.**

या पदासाठी एकुण दोन उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. पैकी श्री विजय व्यवहारे ,BHMS PGCECPT हे उपस्थित होते. त्यांची परफ्युजनिस्ट या पदासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या सध्याच्या रुपये ११,०००.०० प्रतिमहा पगाराला संरक्षण देण्यात यावे, असे ठरले.

**०३) <u>डेप्युटी मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटर-</u>**

**M.B.B.S. M.Phil (Hospital Administration)**

या पदासाठी दोन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. या उमेदवारांपैकी एकच उमेदवार डॉ. बिपीन चेवले M.B.B.S, M.Phil होते. त्यांची निवड करण्यात आली. मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी हे पद डेप्युटी मेडिकल डायरेक्टर करावे अशी शिफारस केली आहे. या पदाला रुपये ३०,०००.०० इतके एकत्रित वेतन देण्यात यावे अशीही शिफारस त्यांनी केली. वरील पदावरील उमेदवारास दिनांक २८.११.२००५ पासून नियुक्ती देण्यात यावी अशी शिफारस मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी केली.

**०४) <u>जनरल सर्जन-</u>**

**M.S.Gen. Surgery 2 Yrs. Exp.Preferable**

या पदासाठी डॉ.एस.एस.साबळे, **M.S.Gen.** हे एकच उमेदवार मुलाखतीस उपस्थित होते. त्यांची नियुक्तीसाठी निवड करण्यात आली.त्यांची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली.

**०५)** कार्डीयाक सर्जन-ह्दय शस्त्रक्रिया तज्ञ या पदासाठी डॉ.महेंद्र मैराळ हे उमेदवार उपस्थित होते. त्यांची मुलाखत घेण्यात आली. परंतू याबाबत निर्णय न होऊ शकल्याने सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.

**अ)** या मुलाखतीचेवेळी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी Cardiac OT Store च्या मॅनेजरसाठी श्री दिलीप शर्मा यांची मुलाखत घेतली. त्यांची निवड करुन त्यांना रुपये १५,०००.०० एकत्रित मानधन देण्यात यावे असे आदेश दिले. त्यांची नियुक्ती दिनांक १४.१२.२००५ पासून देण्यात यावी अशी मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी शिफारस केली

**ब)** मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी स्टोअर्स मॅनेजर या पदासाठी श्री मुकेश शर्मा यांची मुलाखत घेतली. त्यांची निवड करुन त्यांना रुपये २५,०००.०० एकत्रित मानधन देण्यात यावे असे आदेश दिले. त्यांची नियुक्ती दिनांक १०.१२.२००५ पासून देण्यात यावी अशी मा.डॉ.पी.एल. तिवारी यांनी शिफारस केली.

**क)** मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी याचवेळी दिलेल्या तोंडी आदेशानुसार श्री सुरेंद्रकुमार पांडे यांना रुपये ५,०००.०० मासिक मानधनावर दिनांक ४.११.२००५ पासून नियुक्ती आदेश देण्यात यावा असे म्हटले आहे. तसेच श्री.मिलींद लालचंद सोनवणे यांनी कॅथलॅबसाठी टेक्नीकल असिस्टंट/ वॉर्डबॉय या पदासाठी अर्ज केला आहे त्यांनाही योग्य वेतनावर नियुक्ती करण्यात यावी असे ठरले.

उपरोक्तबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी दिनांक १६.०१.२००५ अन्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

" दिनांक १२.०१.२००६ रोजी मुंबई येथे झालेल्या मुलाखती संदर्भात आपले निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, जाहिरातीप्रमाणे ज्या पदासाठी मुलाखती घेतल्या त्यासाठी एकूण सहा लोक हजर होते. परंतु शासनास पाठविलेल्या (मंजूरीसाठी) आकृतीबंधात जी पदे उपलब्ध नाहीत त्या पदांकरीता मुलाखती घेतल्या गेल्या. ते नियमाला धरुन नाही त्यासाठी त्यांचा समावेश आकृतीबंधात करणे जरुरी आहे. शासन व संबंधित खात्याकडून आपणास त्यासाठी मंजूरी घेणे जरुरी आहे. मेडिकल डेप्यु डायरेक्टर या पदासाठी जाहिरात नाही. ज्या पदाची जाहीरात आहे त्यासाठी आपण यापूर्वीच मुलाखती घेऊन डॉ.पटवर्धन यांना नियुक्ती केलेली आहे. तेव्हा डॉ.बिपीन चेवले यांना दिली जाणारी नियुक्ती ही वादग्रस्त होऊ शकते. त्यांचा अनुभव लक्षात घेता एवढया जबाबदारीचे पदावर त्यांना नियुक्त करणे योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे अ,ब, क यांच्या नियुक्त्या या सुध्दा होत आहेत. त्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार योग्य नाहीत. त्यांना देऊ केलेले मानधन वाजवीपेक्षा जास्त आहे. ते संस्थानचे दृष्टीने नियमाला धरुन नाही. तरी क्र. ५ व क्र.१२ अ,ब,क यासाठी माझी सम्मती नाही तरी योग्य तोच निर्णय व्हावा असे कळविले आहे.

तसेच १२.०१.२००६ रोजी झालेल्या परफ्युजनिस्ट या पदाचे मुलाखतीस श्री मोहम्मद नदिम अहमद, नर्सिंग+परफ्युजनिस्ट टेक्नॉलॉजी हे उपस्थित नव्हते. त्यांची मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी दिनांक २७.०१.२००६ रोजी मुलाखत घेऊन त्यांना परफ्युजनिस्ट या पदावर नियुक्ती देण्यात यावी अशी शिफारस केली आहे.

वरीलपैकी डॉ.विजय नरोडे, सिनिअर इंटेसीव्हीस्ट, डॉ.एस.एस. साबळे, जनरल सर्जन, डॉ.विजय व्यवहारे व श्री.मोहम्मद नदिम अहमद परफ्यूजनिस्ट यांना डॉ.तिवारी यांनी शिफारस केल्याप्रमाणे विहित पद्धतीने नेमणूका देण्यात याव्यात. तसेच श्रीसाईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल लवकरात लवकर सुरु करावयाचे असल्याने अनुभवी स्टाफची आवश्यकता आहे. त्यामुळे डॉ.तिवारी यांनी शिफारस केल्यानुसार खालीलप्रमाणे सहा महिन्यांसाठी तात्पुरत्या नेमणूका देण्यात याव्यात असें ठरले.

| अ.नं | नाव व शैक्षणिक पात्रता | हुद्दा | नेमणूक तारीख | द्यावयाचे वेतन रुपये | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. बिपीन पी.चेवले M.B.B.S, M.Phil | डेप्यूटी मेडिकल डायरेक्टर | २८.११.२००५ | ३०,०००/- | बॉम्बे हॉस्पिटल |
| ०२. | श्री.दिलीप बी. शर्मा, B.Com. | स्टोअर्स ऑफिसर | १४.१२.२००५ | १५०००/- | बालाजी व बॉम्बे हॉस्पिटल |
| ०३. | श्री.मुकेश ए. शर्मा, B.Sc.M.B.A.D.M.M.D.H.A. | सिनि.मॅनेजर, मटेरियल ॲण्ड मार्केटिंग | १०.१२.२००५ | २५,०००/- | बॉम्बे हॉस्पिटल |
| ०४. | श्री.सुरेंद्रकुमार पाण्डेय, B.Com. | अकौंटंट | ४.११.२००५ | ५,०००/- | निदान डायग्नोस्टीक ॲण्ड हार्ट सेंटर लखनौ |
| ०५. | श्री.मिलिंद लालचंद सोनवणे, S.S.C | ज्यू. टेक्नीशियन कॅथलॅब | ७.१.२००६ | ४,०००/- | बॉम्बे हॉस्पिटल |

तसेच, दरम्यान वर्तमानपत्रात जाहीरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत, अशी शिफारस करण्यात आली. ती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/अधिक्षक,आस्थापना)

**११. दिनांक २४.०१.२००६ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थानचे मुंबई येथील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त-**

दिनांक २४.०१.२००६ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थानचे मुंबई येथील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या त्याची नोंद घेण्यात येऊन ते सोबत **परिशिष्ट "ब" म्हणून** ठेवण्यात आले आहे. या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**a**) श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागासाठी मशिनरी/उपकरणे खरेदीकामी आलेल्या १४ निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली

b) श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदी बाबत आलेल्या ७० निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो तज्ञ समितीची शिफारस घेऊन, व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली

c) श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी आवश्यक असणारे दोन पोर्टेबल (फिरते) व्हेन्टीलेटर्स मे.बायोमेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि., मुंबई यांचेकडून थेट खरेदी न करता याकामी कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये २,२८,०००/- चे खर्चास मान्यता देणेची शिफारस करण्यात आली.

d) श्री साईबाबा रुग्णालयासाठी आवश्यक असणारे ट्रान्सडयुसर मे. लाईफ केअर डिव्हाइसेस प्रा. लि. मुंबई यार्चेकडून थेट खरेदी न करता याकामी कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ४४,३१३.७५ चे खर्चास मान्यता देणेची शिफारस करण्यात आली.

e) रुग्णालयासाठी आवश्यक असणारे इ.एन.टी. इन्स्ट्रुमेंट मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचे इन्स्ट्रुमेंटची गुणवत्ता व टिकाऊ असल्याने त्यांचेकडून सदर इन्स्ट्रुमेंट खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण रुपये ६०५९८.१२ चे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस करण्यात आली.

f) इ.एन.टी इन्स्ट्रुमेंट (मायक्रो डेब्रायडर) खरेदीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार डॉ.पी.एल.तिवारी व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली.

g) कार्डियाक सर्जिकल सूचर्स मटेरिअल मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन,मुंबई या कंपनीचे उच्च गुणवत्तेची असल्याने सुचर्ससाठी ज्यांचे दर असतील त्यांचेकडून खरेदी करणेस तसेच त्यांचेकडे जे सुचर्स मिळणार नाही असे सुचर्स बी.ब्रॉन लि.,मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,१७,४६३/- चे खर्चास मान्यता देणेबाबतची शिफारस करण्यात आली.

h) कार्डियाक ऑपरेशन थिएटरसाठी कॅथेटर्स /स्टेंट /व्हॉल्व्ह इत्यादी रुग्णालय तातडीने सुरु करावयाचे असल्याने निम्नतम दराचा विचार न करता चांगल्या कंपनीचे साहित्य खालीलप्रमाणे शिफारस केल्याप्रमाणे खरेदी करणेची शिफारस करण्यात आली.

०१.या तक्त्यात मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांनी (A) मधील अ.नं. १ ते १६ तर (B) मधील अ.नं. १ ते १४, १६, १७, १८, १९, ३३, ३४, ३८, ३९, ४०, ४१ इत्यादींचे दर दिलेले आहेत. तरी त्यांचा पुरवठा आदेश मे. रेणुका सर्जिकल यांना देण्यास

०२.(B) मधील अ.नं. १५, २१, २४, २६, २७, २८ हे मे. कॉसमॉस सर्जिकल यांचेकडून (B) मधील अ.नं. २२, २३, २५ हे मे. पिनॅकल, मुंबई यांचेकडून

०३. (B) मधील अ.नं. ३५, ३६ हे मे. टीटीके हेल्थकेअर, मुंबई यांचेकडून

०४. (B) मधील अ.नं. ३७ हे मे. सेंट ज्युड, मुंबई यांचेकडून

०५. (B) मधील अ.नं. २९ हे मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून

०६. (B) मधील अ.नं. २०, ३०, ३१, ३२ हे बॉस्टन सायंटिफीक, मुंबई यांचेकडून

i) कार्डियाक ऑपरेशन थिएटरसाठी कन्झ्युमेबल/सर्जिकल मटेरिअल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, अशी शिफारस करण्यात आली.

j) श्री साईबाबा रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या उशा मे.इको फोम प्रॉडक्टस ॲण्ड सर्व्हीसेस यांचेकडून खरेदी न करता याकामी आलेल्या पूर्वीच्या निविदेतील दरांचा तुलनात्मक अभ्यास करुन निर्णय घेण्यात यावा.

k) श्री साईबाबा रुग्णालय इमारतीमधील दरवाजे व खिडक्यांना पडदे बसविणेकामी कर्टन रॉड व अनुषंगिक मटेरिअल कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे ९५,५००.०० चे खर्चास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली

l) श्री साईबाबा रुग्णालयासाठी कोडॅक डिजीटल एक्स-रे मशिन खरेदी करणेपूर्वी कन्सल्टंट डॉ.विनय कोठारी यांचा अभिप्राय घ्यावा व त्यांचे अभिप्रायानंतर अंतिम निर्णय घ्यावा अशी शिफारस करण्यात आली.

श्रीसाईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे काम प्रगतिपथावर असून, लवकरच रुग्णालय सुरु करावयाचे आहे. दैनंदिन कामकाजावर वैद्यकीयउपसमिती सदस्य डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी मार्गदर्शन करावे. तसेच कन्सल्टंट डॉ.विनय कोठारी यांनी त्यांचेकडील एक्सपर्ट वेळोवेळी पाठवून मार्गदर्शन करावे असे सर्वानुमते ठरले, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**विषय नं.०४** **श्रीसाईबाबा संस्थानसाठी खरेदी करावयाच्या शेतीमहामंडळाची व इतर शेतकऱ्यांच्या जमीनींबाबतचे विषयांवर चर्चा करणेकामी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर याचे उपस्थितीत दि.२४.०२.२००६ रोजी आयोजित केलेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.१०८.** श्रीसाईबाबा संस्थानसाठी खरेदी करावयाच्या शेतीमहामंडळाची व इतर शेतकऱ्यांच्या जमीनींबाबतचे विषयांवर चर्चा करणेकामी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर याचे उपस्थितीत दि.२४.०२.२००६ रोजी आयोजित केलेल्या स्थानिक समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, ते **सोबत परिशिष्ट "क" म्हणून** ठेवण्यात आले आहे. या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची मौजे निमगांव-कोऱ्हाळे, कनकुरी व शिरडी येथील उर्वरित खंडकऱ्यांच्या जमीनी भू-संपादनाने घेणे बाबत.**

१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची स्वतःच्या मालकिची मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील ४५ हे. ६४ आर जमीनी बाबद मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील निवाडा क्रमांक एल. ए. क्यु. एस. आर. १ /२००२ दि.३१/०८/२००५ अवये निवाडा जाहीर झालेला आहे.

२) शेती महामंडळाच्या उर्वरीत (खंडकऱ्यांच्या) जमिनीबाबद मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि. १०-१२/०४/ २००३ रोजी निर्णय क्रमांक १२५ खालील प्रमाणे झालेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होवून उच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणातील उर्वरीत ७६ हेक्टर १५ आर जमीन देखील संपादन करण्यास संस्थानची ( मा.उच्च न्यायालयाने अनुकूल कौल दिल्यास ) तयारी आहे. असे शेती महामंडळास कळविण्यात यावे, असे ठरले..."

उपरोक्त ठरावा प्रमाणे मा.मुख्य कार्यकारी (प्रशासक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस वशी०२/४३००/२००३ दिनांक १७/०५/२००३ अन्वये कळविलेले आहे. शेती महामंडळाच्या जमिनीबाबद मा.नामदार हायकोर्ट, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल झालेले रिट पिटीशन क्रमांक ३४९१/८९, ३३९५/९१, १६९/९४ व ३९९९/९८ चे निकाल झालेले आहेत. शेती महामंडळ व शासनाने शेती महामंडळाच्या जमिनी निर्गत करु नये म्हणून दिलेला अंतरीम आदेश रद्द झालेला आहे. स्थावर व्यवस्थापक, लक्ष्मीवाडी मळा, यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक लक्ष्मी / प्रशाजमीन/ सासशि/०४-०५/१९४ दि. १७/०८/२००४ अन्वये मौजे निमगांव कोऱ्हाळे, शिर्डी व कनकुरी येथील शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राची माहिती कळविलेली आहे.

मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाची ४५ हे. ६४ आर ( अतिक्रमीत क्षेत्र २१ आरचे ) जमीनीचा ताबा मिळालेला आहे. परंतू सदरचे क्षेत्र विखुरलेले असून काही गट नंबरचे क्षेत्र फारच छोटे आहे. त्यामुळे त्या ठिकाणी मोठी योजना राबविता येत नाही. त्यासाठी आणखी क्षेत्राची आवश्यकता आहे. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील एकंदर १७ गट नंबर मधील क्षेत्र हे. ६३ ०९ आर भू-संपादनाने मिळाल्यास सलग क्षेत्र (Compact Block) होईल. त्यामुळे सदरचे क्षेत्र घेणे आवश्यक आहे. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील प्रस्तावीत क्षेत्राची तीन विभागात वर्गवारी केली . त्याबाबद तपशील खालील प्रमाणे आहे. सोबत तक्ता जोडला आहे.

मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील जमीनीचा तपशील.

| अ.क्र. | तपशील | भू-संपादनाने घ्यावयाचे क्षेत्र हेक्टर - आर |
|---|---|---|
| अ | ज्या गट नंबर मधील काही क्षेत्र भू-संपादनाने मिळाले असून उर्वरित क्षेत्राची मागणी केली असे गट नं. ८५,२३८,२४५,२५०,३४ | १८-९१ |
| ब | पुर्वी भू-संपादनाने घेतलेल्या गट नंबर लगत असलेले गट नं. च्या क्षेत्राची मागणी ८६, १७१, १८०, १८१/१, १८१/२, ८९, १७०, १८४, ९०/२, ८४/१, १८८/१. | ४३-७७ |
| क | अ व ब मध्ये प्रस्तावीत केलेल्या गट नंबर लगत असलेला गट ंबर | ००-४१ |
| | | ६३ -०९ |

मौजे कनकुरी येथील जमिनीचा तपशील.

| अ.क्र. | गट नंबर | तपशील | क्षेत्र हेक्टर आर. |
|---|---|---|---|
| १ | ८८,१०७ | कनकुरी, पिंपळवाडी व संस्थान संयुक्त पाणी पुरवठा यांजनेच्या साठवण तलावाजवळ या जमिनी आहेत. भविष्यात वाढीव पाणी पुरवठा योजना अंमलात आणण्यास ह्या दोही गटाच्या क्षेत्राचा साठवण तलावासाठी उपयोग होईल. | ५-९९ |
| २ | १०४ | संस्थानच्या विविध उपक्रमासाठी उदा. कर्मचारी निवास अथवा इतर कामासाठी उपयोगी आहे. | ० -६६ |
| | | | ६- ६५ |

मौजे शिर्डी येथील जमीाचा तपशील.

| अ.क्र. | स.नंबर | तपशील | क्षेत्र हेक्टर आर. |
|---|---|---|---|
| १ | १५९ व १६१ | सदरचे स.नं. एकमेकास लागुन आहेत. सदरचे क्षेत्र संस्थानच्या विविध उपक्रमासाठी उदा. शैक्षणीक संकुल, भक्त निवास अथवा अन्य प्रयोजासाठी उपयुक्त आहे. | ११ - ८२ |

मौजे निमगांव - कोऱ्हाळे, कनकुरी व शिर्डी येथील उपरोक्त महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी भू-संपादनाने घेणे बाबद मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २/१०/२००५ रोजी च्या सभेत निर्णय क्रमांक ६४६ खालील प्रमाणे झालेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होवून उपरोक्त पैकी मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील हेक्टर ६३ -०९ आर शिर्डी येथील हेक्टर ११ - ८२ आर , कनकुरी येथील हेक्टर ०६ - ६५ आर अशी एकूण हेक्टर ८१ - ५६ आर शेती महामंडळाची असलेली जमीन भूसंपादनाने घेण्यात यावर, असे ठरले..."

५)मा.व्यवस्थापन समितीच्या उपरोक्त निर्णयाप्रमाणे मा. मुख्य सचिव (प्रधान सचीव आवश्यक आहे.) महसूल व वा विभाग (एल ७ शाखा ) मंत्रालय मुंबई यांना पत्र क्रमांक एसएसएस वशी ०२/१२७४२/२००५ दिनांक ५/११/२००५ रोजी शेती महामंडळाची उर्वरीत हे.८१ - ५६ आर जमीन भू-संपादनाने घेणेबाबद प्रशासकीय मंजूरी देण्याबाबद विनंती केलेली आहे. त्यानंतर पत्र क्रमांक एसएसएस वशी२/१४७६२/२००५ दिनांक २०/१२/२००५, एसएसएस वशी२/१४८१/२००६ दि. २/२/२००६ रोजी स्मरणपत्र पाठविले आहे. परंतू अद्यापपावेतो शासनाकडून प्रशासकीय मंजूरी मिळालेली नाही.

६) मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे दिनांक २५/११/२००५ रोजी भू-संपादन प्रस्ताव पाठवित होतो त्यांचेकडील पत्र क्रमांक भू-संपादन /कार्या १६/३/४/०६ दिनांक ३/१/२००६ ने शासनाकडून भू-संपादना बाबद प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर भू-संपादनाचा प्रस्ताव पाठवावा असे सुचित केले आहे.

आजचे सभेत शेती महामंडळ व शासनाचे खालील सरकारी अधिकारी उपस्थित होते.

| अ.नं. | अधिकाऱ्याचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री बाळासाहेब ह, गांधळे,मु.का. (प्रशासन) |
| ०२. | श्री राजेंद्र शंकरराव क्षीरसागर, उप विभागीय अधिकारी, संगमनेर |
| ०३. | श्री संजीव सु.पलांडे, उप विभागीय अधिकारी, कर्जत |
| ०४. | श्री बी.ए.पालवे, जि. पु. अधिकारी,अहमदनगर |
| ०५. | श्री एम.आर.घोडे, तहसिलदार, कोपरगांव |
| ०६. | श्री कुंदनकुमार सोनवणे, तहसिलदार,राहाता |
| ०७. | श्री भागवत डोईफोडे,तहसिलदार, श्रीरामपूर |
| ०८. | श्री एस.एस.भिसे, स्थावर व्यवस्थापक,हरिगांव |
| ०९. | श्री एस.बी.आढाव, स्थावर व्यवस्थापक,टिळकनगर फार्म |
| १०. | श्री आर.पी.हजारे, स्थावर व्यवस्थापक,चांगदेव नगर मळा |
| ११. | श्री व्ही.एस.पाटील प्रभारी स्थावर व्यवस्थापक, बेलवंडी मळा |
| १२.. | श्री आर.पी.पाटील, स्थावर व्यवस्थापक,साकरवाडी |
| १३ | श्री रा.स.आगवणे,अधिक्षक, भूमी अभिलेख,अहमदनगर |
| १४. | श्री डी.एल.घोडके, ता.नि.भू.अ, श्रीरामपूर |
| १५. | श्री आर.एस.बाबर, ता.नि.भू.अ, कोपरगांव |

प्रथम मा.जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त क्षेत्रापैकी शासकीय विश्रामगृहाजवळील १५ एकर क्षेत्र वाढीव विश्रामगृह व हेलिपॅड करता देण्यात येईल असे सभेस सांगितले. याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी विश्रामगृहाजवळील जागा साईभक्तांकरीता भव्य साईउद्यान विकसित करणेचे प्रस्तावित आहे. करीता शासनाने वाढीव विश्रामगृह व हेलीपॅडसाठी इतरत्र जागा घ्यावी अशी आग्रही सूचना केली. याबाबत चर्चा होऊन, हेलिपॅड संस्थानने शेती महामंडळाकडून घेतलेल्या जागेत स.नं. १८३ मध्ये व शासकीय विश्रामगृहाजवळ वाढीव सूटव इतर सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी पाच एकरपेक्षा कमी क्षेत्र घ्यावे. त्यास मा.जिल्हाधिकारी यांनी सहमती दर्शविली. उर्वरित क्षेत्र संस्थानकरीता बगीचा विकसीत करणे, विविध उपक्रम राबविणेसाठी संस्थानला देता येईल असे मा.जिल्हाधिकारी यांनी सभेस सांगितले.

हेलिपॅडच्या जागेची कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर हे समक्ष पहाणी करुन आवश्यक ती जागा निश्चित करतील.

**०२) मौजे शिरडी येथील श्री प्रभाकर गोविंद कोते व इतर यांची सर्व्हे नं.१०७ मधील जमीनीबाबत.**

श्री. प्रभाकर गोंविंदराव कोते व इतर ०१) यांची स.नं १०७ पैकी जमीन संस्थानचे जमीनी लगत आहे. प्रस्तुतची जमीन ( २ हेक्टर ४० आर ) विकत घेणेबाबत श्री. प्रभाकर गोविंदराव कोते व श्री. अशोंक विठ्ठल गोंदकर यांनी दिनांक २१/०५/२००५ रोजी इकडेस अर्ज दिलेला आहे. तसेच दि २६/०७/२००५ चा अर्ज इकडेस प्राप्त आहे. प्रस्तुत जमीन खरेदी करणेचे बाबत दिनांक ०६/०८/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ३ खालीलप्रमाणे झाला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन श्री. कोते यांचे जमीनीचे टाऊन प्लॅनिंग नुसार मूल्यांकन करुन जमीन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव पुनश्च व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत यावा.. "

उपरोक्त ठरावाप्रमाणे श्री. कोते यांचे जमिनीचे टाऊन प्लॅनिंग नुसार मूल्यांकन करून जमीन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव पुनश्च व्य.समितीचे सभेपुढे सादर करावयाचे आहेत. त्याप्रमाणे मूल्यांकन प्राप्त

करणेसाठी मा. नगररचना विभाग यांचेकडे दिनांक २०/०८/२००५, दिनांक १६/०९/२००५, दि २१/१०/२००५, १८/१०/२००६, दि ३०/०१/२००६ व दि ०२/०२/२००६ व समक्ष वेळोवेळी संपर्क / पाठपुरावा केलेला आहे. याकामी संबंधीत जागेचा नकाशा तसेच इंडेक्स प्राप्त झालेनंतर त्यांचे खात्यांकडून व्हॅल्युएशन प्राप्त होत आहे. टी.पी. ऑफीस, अहमदनगर कडे सदर माहितीची पूर्तता केलेनंतरही त्यांचे कार्यालयाकडून किंमतीची माहिती प्रत्यक्ष प्राप्त होणेस थोडाफार कालावधी लागणार आहे. ही बाब विचारांत घेता संस्थानने दरम्यानचे काळात संस्थान रेकॉर्डला उपलब्ध असलेले इतर जमीनीचे दरांबाबत माहिती संकलित केलेली असून सदर माहिती खालील जमिनीचे संदर्भात आहे.

<table>
<tr><td>१) संस्थानचे साईनगर स्टॉफ क्वार्टरर्सचे शेजारचे जमीन सर्व्हे नं १२४,१२५,१२६,<br>अ) आरक्षण क्रमांक ३९</td><td>आरक्षण क्रमांक ३९ क्षेत्र ४ हेक्टर ७५ आर ८७ चौ.मी.आरचा भू संपादन प्रस्ताव (दि २४/०१/०५ चा) संस्थान मार्फत सादर केलेला प्रस्ताव मा. भू संपादन विभागाकडे चालू असून सदर जमिनीचे भू संपादनासाठी संस्थानने रु. ४,२८,४८,३००/- जमीनीची किंमत + जमीन मालकांस दिलासा म्हणून ३० % रक्कम रुपये २७०५५/- नोटीफिकेशन तारीख २४/०७/२००५ ते दि ३१/१२/२००५ इतर घटकाची रक्कम धरुन रुपये १,४४,०७२/- + ३ % आस्थापना चार्जेस ४३२२/- अशी रक्कम अदा करावी लागली आहे. त्या हिशोबाने प्रति आर किंमत रुपये १,४८,३९४/- मात्र निश्चित होत आहे.</td></tr>
<tr><td>ब) आरक्षण क्रमांक ३४</td><td>आरक्षण क्रमांक ३९ चे शेजारीच आरक्षण क्रमांक ३४ ३ हेक्टर ४४ आर जमीन भू संपादनासाठी संस्थानकडून प्रस्तावित आहे.सदर जमीनीपैकी ३ हेक्टर ८८ आर २७ चौ.मी. श्री. सुवालाल लोढा व इतर यांची जमीन संस्थान प्रति आरला रुपये १,५०,०००/- मात्र किंमत देऊन विकत घेत आहे. त्याबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचा दिनांक ०८/०५/०५ चा ठराव झालेला आहे. सदर जमीन संस्थानचे साईनगर परिसराजवळ आहे.</td></tr>
<tr><td>२) मा. सह जिल्हा निबंधक वर्ग १ अहमदनगर यांचेकडील मूल्याकंन</td><td>मा. सहा. जिल्हा निबंधक वर्ग , अहमदनगर यांचेकडून रेडी रेकनर बाबत माहिती प्राप्त झाली आहे. त्यामध्ये स.नं १०७ चा दर दर चौरस मिटरला रुपये ११००/- आहे म्हणजे साधारणत प्रत्येक आरला १,१०,०००/- दर येत आहे जमिनीचे भूसंपादनासाी सदर दर विचारात घेतलेस यावर ३० % सोलॅटियम अशी वाढीव (रुपये ३३०००/- ) किंमत जमीन मालकांस मिळू शकते. या व्यतिरिक्त १२ % अतिरिक्त घटकांची रक्कमही जमीन मालकांस द्यावी लागेल. भू संपादनाची कार्यवाही ३ वर्षात झालेस ३९,६००/- रक्कम अतिरिक्त घटकाची मिळू शकते म्हणजेच १,१०,०००/-+३३,०००/- +३९,६००/- = १,८२,६००/- मिळू शकतात. भू संपादनाची कार्यवाही २ वर्षात पूर्ण झालेस अतिरिक्त रक्कम रुपये २६,४००/- मिळू शकते.</td></tr>
<tr><td>३) सर्व्हे नं. १०८ श्री. बच्छानी यांचे जमिनीचे मूल्यांकन</td><td>श्री. प्रभाकर गोविंद कोते यांचे जमिनीचे जवळ श्री. बच्छानी यांची सर्व्हे नं. १०८ जमीन आहे सदर जमीनीचे भू संपादन प्रकरण संस्थानने दाखल केलेले आहे.<br>मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी दि १७/१२/२००३ रोजी पत्रान्वये मौजे शिर्डी येथील स.नं १०८ जमिनीबाबत ( श्री बच्छाणी यांची जमीन ) कळविलेल्या मूल्यांकनाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.<br><table><tr><td>अ.नं</td><td>तपशिल</td><td>रक्कम</td></tr><tr><td>०१</td><td>स.नं १०८ चा प्रती आर दर</td><td>१,६०,०००/-</td></tr><tr><td>०२</td><td>३०टक्के दिलासा रक्कम</td><td>४८,०००/-</td></tr><tr><td>०३</td><td>१२ टक्के रक्कम (६-०६-०२ ते ३१-८-०३-१५ महिन्यासाठी )</td><td>२४,०००/-</td></tr><tr><td>०४</td><td>एकूण</td><td>२,३२,०००/-</td></tr><tr><td>५</td><td>वरील रक्कमेवर ३ टक्के आस्थापना खर्च</td><td>६,९६०/-</td></tr><tr><td>६</td><td>प्रत्येंक आरला येणारी एकूण किंमत</td><td>२,३८,९६०/-</td></tr></table>सर्व्हे नं.१०८ ही जमीन बिनशेती झालेली आहे ती नगर -मनमाड रोडला सन्मुख आहे. त्यामुळे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी स.नं १०८ बाबत दर आरला १,६०,०००/- किंमत केली आहे. त्यावर ३० टक्के दिलासा रक्कम व १२ टक्के अतिरिक्त घटक व ३टक्के आस्थापना चार्जेस धरुन येणारी किंमत रुपये २,३८,९६०/- प्रती आर येत आहे. स.नं १०७ हा संस्थानचे मिळकतीस लागून असून स.नं १०८ च्या पश्चिमेस आहे.</td></tr>
</table>

<table>
<tr><td>४) स.नं १०७ बाबत मूल्यांकन</td><td>स.नं १०७ चा दर आरला १,१०,०००/- व स.नं. २००६ मधील स.नं १०८ बाबत रेडीरेकनर मध्ये प्रत्येक आरला रक्कम रुपये १,१५,०००/- दर दर्शविलेला आहे.<br>उपरोक्त जमीन खरेदी खताबाबत जमीन मालकाकडून प्रस्तावित आहे मात्र संस्थानने भू संपादनाने घेणेबाबत प्रस्तावित केल्यास त्याबाबत संस्थानला प्रति आर जमीन मालकास दयावा लागणारी जमिनीच्या किंमतीबाबत ( संभाव्य ) तपशिल खालीलप्रमाणे येऊ शकते.
<table>
<tr><th>अ.नं</th><th>तपशिल</th><th>रक्कम</th></tr>
<tr><td>०१</td><td>जमिनीचा रेडीरेकनर प्रमाणे दर</td><td>१,१०,०००/-</td></tr>
<tr><td>०२</td><td>जमीन मालकाला दयावी लागणारी ३० टक्के दिलासा रक्कम</td><td>३३,०००/-</td></tr>
<tr><td>०३</td><td>एकूण</td><td>१,४३,०००/-</td></tr>
<tr><td>०४</td><td>शासनाला दयावी लागणारी ३ टक्के आस्थापना खर्चाची रक्कम</td><td>४,२९०/-</td></tr>
<tr><td>०५</td><td>संस्थानला प्रति आर दयावी लागणारी किंमत</td><td>१,४७,२९०/-</td></tr>
</table>
भू संपादनामध्ये जमिनीचा ताबा घेतलेल्या तारखेपासून निवाडा होईपर्यंत १२ टक्के अतिरिक्त घटकाची रक्कम आकारली जाते. खरेदी खतामध्ये ज्या दिवशी ताबा घेतला जातो त्या दिवशी खरेदी खत केले जाते. व जमीन मालकाला रक्कम दिली जाते. त्यामुळे अतिरिक्त घटकाची १२ टक्याची रक्कम हिशोबात धरली नाही. मात्र भू संपादन निवाडा जाहीर करणेस जास्तीत जास्त ३ वर्ष मुदत नियमाप्रमाणे आहे. सदर मुदतीचा विचार करता १२ टक्के रक्कम रुपये प्रति आर ३९,६००/- होत आहे सदरची रक्कम विचारात घेता प्रति आरला रक्कम रुपये १,८६,८९०/- द्यावी लागणार आहे. उपरोक्त जमिनी भू संपादनाने घ्यावयाचे ठरल्यास भू संपादनाचा निवाडा जाहीर होऊन ताबा मिळणेस बराच कालावधी लागणार आहे.शिवाय भू संपादन निवाडयामध्ये जमिनीची किंमत मान्य नसल्यास भू संपादन कायदा कलम १८ खाली जमीन मालक किंमत वाढवून मिळणेसाठी कोर्टात संदर्भ करण्याचा संभव आहे. व कोर्टानी जमिनीची किंमत वाढवून मिळणेसाठी कोर्टात संदर्भ करण्याचा संभव आहे. व कोर्टानी जमिनीची किंमत वाढवून दिली तर ती देणे क्रमप्राप्त होणार आहे. जमीन खरेदी केल्यास जमिनीचा ताबा लगेच मिळणार आहे व जमीन मालक कोर्टात जाणार नाही.प्रस्तुत प्रकरणी जमीन मालकांचा जमीन खरेदी देणेबाबत मुळ प्रस्ताव आहे.</td></tr>
<tr><td>४) स.नं १०७ बाबत मूल्यांकन</td><td>उपरोक्त जमीन ही निवासी झोनमध्ये आता आलेली आहे. त्यामुळे या जमिनी बांधकाम करावयाचे झाल्यास नगरपंचायतीची परवानगी मिळणे सुकर झाले आहे. जमीन निवासी झोनमध्ये आल्याने आता जमिनीची किंमत वाढणार आहे.</td></tr>
</table>

अर्जदार श्री. प्रभाकर कोते व श्री. अशोक विठठल गोंदकर यांनी त्यांचे अर्जात प्रस्तुत जमिनीचा बिनशेती प्रस्ताव चालू असल्याचे कळविले आहे. तसेच जमीनीमध्ये असलेले बोअरचे पाण्याचा हक्क व्यवहारानंतरही त्यांचेक्डे ठेवणेबाबत विनंती केलेली आहे. याबाबत नगर पंचायतीकडून माहिती मागविणेत आली असता या क्षेत्रातून २४ मीटर रुंद विकास योजना आरक्षित रस्त्यामध्ये ९०० चौ.मी. क्षेत्र बाधीत होत आहे. रस्ता रुंदीकरता व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्र हे रहिवासी विभागात समाविष्ट असल्याची माहिती प्राप्त आहे. त्यावरुन अर्जदारांने श्री प्रभाकर गोविंद कोते यांनी विक्रीसाठी प्रस्तावित केलेले जमीनीचे क्षेत्रात रस्त्याचे क्षेत्र समाविष्ट आहे असे दिसून येते.

श्री. अशोक गोंदकर यांचे वडीलांनी अर्ज देऊन जमीन त्यांचे नावावर असल्याचे आता कळविले असून प्रकरणी पत्रव्यवहार त्यांचे नावावर करणेस कळविले आहे त्यांचे क्षेत्रातून रस्ता जात असेल तर मोजणीच्या नकाशाची पूर्तता श्री. प्रभाकर गोविंद कोते यांचेकडून होत आहे.

खालील खातेदारांनी त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या जमिनी संस्थानला खरेदी देण्याबाबत अर्ज दिलेला आहे.

| अ.नं | खातेदारांचे नांव | स.नं | क्षेत्र हेक्टर आर | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रभाकर गोविंदराव कोते - इतर | १०७/१४ | ०-६१ | |
| २ | श्री. विठठल तुकाराम गोंदकर - इतर | १०७/६ | ०-८० | यांचे स.नं.चे क्षेत्र १ हे. ०३ आर आहे. |
| | एकूण | | १.४१ | |

शिर्डी साई ट्रस्ट पट्टीपुलम,तामिळनाडू यांनी सुमारे १०,००० साईभक्तांची निवासाची व्यवस्था, अनाथ आश्रम , ध्यानमंदीर बांधकामासाठी संस्थानकडून जागा उपलब्ध करुन मिळणेस विनंती केली आहे. बांधकामाचा खर्च त्यांचे मार्फत करण्यात येणार आहे. करीता जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

श्री प्रभाकर गोविद कोते व श्री विठ्ठल तुकाराम गोंदकर यांनी दिनांक २०/०२/२००६ चे पत्रान्वये रुपये- ७० लाख प्रती एकर याप्रमाणे किंमत मिळणेस विनंती केली आहे.

मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, वाटाघाटीने किंमत ठरविणे योग्य आहे. मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.कावी/एलएक्यू/एसआर/१०/२००० दिनांक १७.१२.२००३ रोजीच्या पत्रान्वये मे.साई गोपी असोसिएटस व मे.साई गोपी रिसोर्टस यांची शिर्डी येथील स.नं.१०८ चा प्रती आर रुपये १,६०,०००/- हा दर कळविलेला आहे.

सन २००६ च्या रेडी रेकनर मध्ये स.नं.१०७ चा प्रती आर रुपये १,१०,०००/- दर दाखविलेला आहे. हा दर विचारात घेऊन त्यावर भू-संपादन प्रकरणी द्यावी लागणारी ३० टक्के दिलास रक्कम व शासनास द्यावी लागणारी ३ टक्के आस्थापना रक्कम विचारात घेता प्रती आर रुपये १,४७,२९०/- हा दर येता.

त्यावर त्यांनी श्री.प्रभाकर गोविंदराव कोते व श्री.विठ्ठल तुकाराम गोदंकर यांना किती किंमत अपेक्षित आहे याची विचारणा केली त्यावेळेस त्यांनी रुपये ७० लाख प्रती एकराला किंमत मिळावी असे सांगितले म्हणजे प्रती आर रुपये १,७५,०००/- किंमत पाहिजे असे सांगितले त्यावर मा.जिल्हाधिकारी साहेब

यांच्या असे निदर्शनास आणले की, संस्थान श्री.सुवालाला लोढा व इतर यांची सर्वे.नं.१२५ मधील जमीन रुपये १,५०,०००/- प्रती आर दराने खरेद करणार आहे. मा.जिल्हाधिकरी साहेब यांनी स.नं.१०७ मधील जमीन रुपये १,५०,०००/- प्रती आर या दराने खरेदी करणेस सहमती दर्शविली.

आजचे सभेत श्री.प्रभाकर गोविंदराव कोत व श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर हे उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा केली असता त्यांची जमीन रक्कम रुपये १,५०,०००/- प्रती आर या दराने खरेदी देण्यास संमती दिली.

याबाबत आजचे सभेत सविस्तर चर्चा झाली. उपरोक्त खातेदार तसेच त्यांचे व संस्थानचे मिळकती (स.नं.१०७) शेजारील खातेदार श्री.कैलास गोविंदराव कोते व सौ.सुमित्रा कैलास कोते यांची खालील नमूद जमीन ध्यान मंदीर, साईभक्तांची निवासस्थान व्यवस्था, अनाथ आश्रम इत्यादी विविध उपक्रमांसाठी उपयुक्त राहील अशीही चर्चा झाली. खालील नमूदकेलेल्या खातेदारांची जमीन भू-संपादन कायद्याच्या माध्यमातून कन्सेन्ट अवॉर्ड ने घेण्यात यावी असे ठरले.

| अ.नं. | खातेदाराचे नाव | सर्वे नं. | क्षेत्र हेक्टर आर | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.प्रभाकर गोविंदराव कोते | १०७/१४ | ०-६१ | |
| ०२. | श्री.विठ्ठल तुकाराम गोंदकर | १०७/६ | ०-८५ | स.नं.क्षेत्र एकूण क्षेत्र हे.१-०३ आर आहे. |
| ०३. | सौ.सुमित्रा कैलास कोते | १०७/४<br>१०७/१० | ०-२७<br>०-५९ | |
| ०४. | श्री.कैलास गोविंदराव कोते | १०७/११ | ०-७२ | |
| | | एकूण | ३-०४ | |

मा.कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त खातेदारांची जमीन भू-संपादन कायद्याच्या माध्यमातून कन्सेन्ट अवार्डने घेणेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस भू-संपादनाचा प्रस्ताव पाठवावा.

भू-संपादनाच्या बाबतीत येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

**०३) मे.साई गोपी असोसिएटस् व मे.साई गोपी रिसोर्टस् प्रा.लि. यांची जमीन गट नं.१०८/१/१ ते १०८/१/४ क्षेत्र हेक्टर ०३-७८ आर १७ चौ.मी.जागेबाबत.**

मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे मे.साई गोपी असोसिएटस व मे. साई गोपी रिसोर्टस प्रा.लि. यांची खाली नमूदकेलेली जमीन शैक्षणीक उपक्रम राबविणे व शैक्षणीक विकासात्मक योजणे साठी भू-संपादन करुन मिळावी म्हणून मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे इकडील पत्र क्रमांक एसएसएस वशी-२/११६६/९९ दिनांक २९/१२/१९९९ ने प्रस्ताव पाठविलेला होता.

| अ.क्र. | सर्व्हे नं. | क्षेत्र हेक्टर आर. चौ.मी. |
|---|---|---|
| ०१) | १०८/१/१ | ००-२४-८५ |
| ०२) | १०८/१/२ | ००-५५-३२ |
| ०३) | १०८/१/३ | ०१-१४-०० |
| ०४) | १०८/१/४ | ०१-१४-०० |
| | एकुण | ०३-७८-१७ |

मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक भूस/कार्या-१६/अ/५६/ २००० दिनांक ८/२/२००० अन्वये भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ५२अ प्रमाणे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे सदरचे प्रकरण सोपविलेले आहे.

सदर प्रकरणा मध्ये भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ६ ची अधिसूचना दिनांक १७/४/२००३ रोजी प्रसिध्द झालेली आहे. भू-संपादन कायदा कलम ९(१)(२) व कलम ९(३)(४) ची नोटीस दिनांक ७/५/२००३ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक १२-१३/७/२००३ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रमांक २८८ खालील प्रमाणे झालेला आहे.

"...प्रकरण ०५ स.नं. १०८/१/१ ते १०८/१/४ क्षेत्र हे. ३-७८ आर १७ चौ.मी. शैक्षणीक उपक्रमासाठी संपादित करावयाची जमीनीची किंमत ८,५९,२०,२२४/- एवढी फार मोठी होत असून त्यामध्ये प्रत्यक्ष निवाड्याचे वेळी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर भू-संपादनाचे प्रकरण सोडून देऊन ते रद्द करण्यात यावे असे ठरले..."

सदर ठरावा प्रमाणे सदरचा भू-संपादनाचा प्रस्ताव मागे घेण्यात येत असून तो रद्द करण्यात यावा असे मा. जिल्हाधिकारी, अ.नगर यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस वशी-०२ / ७१७२/२००३ दि. २७/०८/२००३ ने कळविलेले आहे.

भू-संपादनाचा प्रस्ताव दिल्या नंतर भू-संपादन मंडळाने सदरचा प्रस्ताव रद्द केला किंवा मागे घेतला तरी देखील शासन, महसूल व वन विभाग, ठराव क्रमांक एल.क्यु.एन.४३७-अ-२ दि.१३/१२/१९७५ अन्वये जर भू-संपादनाच्या प्रकरणा मध्ये भू-संपादन कायदा कलम ६ ची नोटीफीकेशन झाली असेल तर निवाड्याच्या प्रस्तावीत रकमेच्या ३टक्के आस्थापना चार्जेस शासनाला द्यावे लागतात. मा.उपविभागीय

अधिकारी, श्रीरामपूर भाग , श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावी/ एल.ए. क्यु./ एस.आर/१४/२००० दि. १७/१२/२००३ अन्वये नुकसान भरपाईची रक्कम ८,७०,८३,२६३/- (आठ कोटी, सत्तर लाखा, त्र्यांऐशी हजार, दोनशे त्रेसष्ठ मात्र ) होत असून त्याच्या ३ टक्के आस्थापना चार्जेसची रक्कम २६,१२,४९८/- ( सव्वीस लाख , बारा हजार ,चारशे अठ्ठ्यान्नव मात्र) होत आहे. असे कळविले आहे. तसेच सदरची रक्कम शासनाकडे भरावी असेही कळविले आहे.

मा. जिल्हाधीकारी, अहमदनगर यांना अर्धशासकीय पत्र क्रमांक एस.एस.एस. वशी-०२/१९८२/ २००५ दि. २३/०२/२००५ अन्वये सदरची रक्कम माफ करण्यात यावी म्हणून विनंती केली होती. परंतू त्यांनी त्यापूर्वीच त्यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक मह/कार्या /२०/४६५/२००४ दिनांक ०५/२/२००५ अन्वये सदरची रक्कम भरावी असे कळविलेले आहे. सदर प्रकरणी भू-संपादन प्रकरण मागे घेतल्याने आता आस्थापना चार्जेस रक्कम रु.२६,१२,४९८/-(सव्वीस लाख ,बारा हजार ,चारशे अठ्ठ्यान्नव मात्र ) भरावे लागणार आहेत.

संस्थानचे सध्या जमीन विकत घेण्याचे धोरण आहे. उपरोक्त जागा ही साईबाबा संस्थानच्या शैक्षणीक संकुला शेजारी आहे. त्यामुळे सदरची जमीन भू-संपादनाने घेतली तर पुढे शैक्षणीक विकासासाठी तीचा उपयोग होणार आहे.

मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.कावी-२/७३०/०५ दि.१/०८/२००५ रोजीच्या पत्रात नमूदकेले आहे की मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील दिनांक १६/७/२००५ चे पत्रा नुसार गट नं. १०८ मधील संपादना खालील जमीनीचा ताबा घेण्याच्या कार्यवाहीस शासनाने स्थगीती दिलेली आहे.

याबाबद खालील बाबींवर निर्णय होणेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०२/१०/२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत विषय ठेवणेत आला होता.

०१) स.नं. १०८/१/१, १०८/१/२, १०८/१/३, १०८/१/४ क्षेत्र हे.३-७८ आर १७ चौ.मी. जमीन भू-संपादनाने घेणे बाबदची कार्यवाही रद्द करणे बाबद.मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि. १२-१३/७/२००३ रोजी झालेल्या निर्णय क्रमांक २८८ (५) रद्द करुन त्या ऐवजी प्रस्तुत जमीन भू-संपादनाने घेणे अथवा न घेणे.

०२) जमीन भू-संपादनाने घेणे झाल्यास पुर्वीच्या प्रकरणातील आस्थापना चार्जेसची रक्कम रु. २६,१२,४९८/- न देता त्याऐवजी फेर भू-संपादन प्रकरणा प्रमाणे आस्थापना चार्जेसची रक्कम घेणे बाबद मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेशी पत्र व्यवहार करणे.

०३) जमीन भू-संपादनाने घेणे न झालेस /न ठरल्यास आस्थापना चार्जेस बाबतीत तगादे चालू असलेल्या भू-संपादन प्रकरणातील आस्थापना चार्जेसची रक्कम माफ करणेबाबत मा.शासन / मा.जिल्हाधिकारी यांचेकडे विनंती करणेबाबत.मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०२/१०/२००५ रोजी सभेत निर्णय क्रंमाक ६२३ खालील प्रमाणे झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन ,जमीन भू-संपादनाचा ३ % आस्थापना चार्ज मात्र करणेबाबत मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना पुनश्च विनंती करावी ,असे ठरले .... ".

वरील निर्णयाप्रमाणे मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना आस्थापना चार्जेस मात्र करणेबाबद दिनांक २३/११/२००५ च्या पत्रान्वये विनंती करणेत आलेली आहे.मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दिनाक २३/१२/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे.सदरचा प्रस्ताव रद्द करावयाचा झालेस रक्कम रुपये- २६,१२,४९८/- आस्थापना चार्जेसची रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे.

मात्र मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावि/ भूस/१३६५/२००५ दिनांक ३१/१२/२००५ रोजीचे (प्रत्यक्षात सदरचे पत्र दिनांक २४/०१/२००६ संस्थानला प्राप्त झाले) पत्राने कळविले आहे की "... सदर प्रकरणी शासन निर्णय दिनांक १४ जून २००१ नुसार मोबदला रक्कमेच्या २/३ इतकी रक्कम बिनव्याजी ठेव म्हणून जमा करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अंदाजे मोबदला रक्कम रुपये- १०,५४,८१,१३६/- पैकी २/३ रक्कम रुपये- ७,०३,२०,७५३/- तसेच आस्थापना खर्चाची रक्कम रुपये- ३१,६४,४३३/- अशी एकूण रक्कम रुपये-७,३४,८५,१८६/- जमा केल्यास सदर प्रकरणी भू-संपादनाचे संदर्भात पुढील कार्यवाही करता येईल..."

मौजे शिरडी येथील स.नं.१०८/१/१,१०८/१/२,१०८/१/३ व १०८/१/४ क्षेत्र हेक्टर ०३-७८ आर १७ चौ.मीटर जागा शैक्षणिक संकुलासाठी आवश्यक असल्याने किंवा संस्थानच्या उपक्रमासाठी भू-संपादनाने घेणे उचित होणार आहे.पुर्वी नुकसान भरपाईची रक्कम रुपये-८,७०,८३,२६३/- व त्यावर आस्थापना चार्जेसची रक्कम रुपये- २६,१२,४९८/-कळविलेले आहे. मात्र दिनांक ३१/१२/२००५ रोजीच्या पत्रात नुकसान भरपाईची रक्कम रुपये-१०,५४,८१,१३६/- कळविली आहे.वर नमूद केलेल्या नुकसान भरपाईच्या रक्कमा हया वेगवेगळया असल्या तरी त्या अंदाजे आहे. प्रत्यक्षात नुकसान भरपाईची रक्कम वाढण्याची शक्यता आहे. व तद् अनुषंगाने आस्थापना खर्चाची रक्कम वाढण्याची शक्यता आहे.

०१) स.नं. १०८/१/१, १०८/१/२, १०८/१/३, १०८/१/४ क्षेत्र हे.३-७८ आर १७ चौ.मी. जमीन भू-संपादनाने घेणे किंवा संस्थानला विविध प्रोजेक्टसाठी स.नं. १०८/१/१ ते १०८/१/४ क्षेत्र हेक्टर ०३ -७८

आर व १७ मीटर जागेची अत्यंत आवश्यकता आहे.सदरची जमीन व संस्थानची जमीन सं.नं.१०९ व १०८ लगत आहे. सदर जमीन भू-संपादनाने मिळण्यास बराच कालावधी लागणार आहे.याबाबद मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी नुकसान भरपाईची रक्कम रुपये- १०,५४,८१,१३६/- कळविलेली आहे.

मा. सह.जिल्हा निबंधक,अहमदनगर यांचेकडील सन २००६ चे रेडिरेकनरचा सर्व्हे नंबर १०८ चा दर प्रती आर रुपये- १,१५,०००/- इतका कळविलेला आहे.सदरची जमीन भू-संपादनाने घ्यावयाची ठरली तर त्याचे मूल्यांकन खालील प्रमाणे होईल.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये- |
|---|---|---|
| ०१ | सर्व्हे नंबर १०८ चा सन -२००६ चे रेडिरेकनर प्रमाणे प्रती आर दर | १,१५,०००/- |
| ०२ | ३०% दिलासा रक्कम | ३४,५००/- |
| ०३ | एकूण | १,४९,५००/- |
| ०४ | शासनाला द्यावी लागणारी ३% आस्थापना खर्चाची रक्कम | ४,४८५/- |
| ०५ | संस्थानला प्रती आरला द्यावी लागणारी रक्कम | १,५३,९८५/- |

भू-संपादनामध्ये जमीनीचा ताबा घेतलेल्या तारखेपासून निवाडा होई पर्यंत १२% अतिरिक्त घटकाची रक्कम आकारली जाते. खरेदीखतामध्ये ज्या दिवशी ताबा घेतला जातो.त्याच दिवशी खरेदी खत केले जाते, व जमीन मालकाला रक्कम दिली जाते.त्यामुळे अतिरिक्त घटकाची १२% ची रक्कम हिशोबात धरलेली नाही.मात्र भू-सपांदन निवाडा जाहीर करणेस जास्तीत जास्त ३ वर्षे मुदत नियमाप्रमाणे आहे.सदर मुदतीचा विचार करता १२ % प्रती आर रक्कम रुपये- ५३,६४०/- होत आहे.सदरची रक्कम विचारात घेता प्रती आर रक्कम रुपये- २,०७,६२५/- द्यावी लागणार आहे.

०१) श्री शिवकुमार मोरुमल बच्छाणी, ०२) श्री किशोर मोरुमल बच्छाणी विश्वस्त मे.साई गोपी असोशियटस व मे.साई गोपी रिसोर्टर्स प्रा.लि.मुंबई यांचेशी वाटाघाटी करुन किंमत ठरविणे योग्य आहे. सदर वाटाघाटी करतांना खाली नमूद केलेल्या रक्कमा जमिनिच्या किंमतीतून वजावट करणे आवश्यक राहील.

| अ.नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी दिनांक ३१/१२/२००५ रोजीच्या पत्राने कळविलेली आस्थापना चार्जेसची रक्कम | ३१,६४,४३३/- |
| ०२ | खरेदी खतासाठी ५ % प्रमाणे स्टॅम्पची रक्कम | ५२,७५,०००/- |
| ०३ | खरेदी खतासाठी १ % प्रमाणे नोंदणी फीची रक्कम | १०,५५,०००/- |
| | एकूण रक्कम | ९४,९४,४३३/- |

०१) श्री शिवकुमार मोरुमल बच्छाणी, ०२) श्री किशोर मोरुमल बच्छाणी विश्वस्त मे.साई गोपी असोशिएटस व मे.साई गोपी रिसोर्टर्स प्रा.लि.मुंबई यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदर जागेची भूसंपादनाचे प्रकरण चालू होते सदर जागा संस्थानला शैक्षणिक संकुल व इतर कारणांसाठी आवश्यक आहे. त्यानंतर भूसंपादनाचा प्रस्ताव मागे घेणेबाबत दिनांक १२-१३.०७.२००३ रोजीच्या सभेत निर्णय झालेला आहे. मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील दिनांक ३१.१२.२००५ रोजीच्या पत्रात स.न. १०८/१/१,१०८/१/२, १०८/१/३ व १०८/१/४ क्षेत्र हेक्टर ०.३.७८ आर १७ चौ मिटर जागेची किंमत रुपये १०,५४,८१,१३६.०० कळविलेली आहे. ही बाबत मा.जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणली. तसेच साई गोपि असोसिएटस यांनी दिनांक २३.०२.२००६ रोजी फॅक्सने सदरची जमीनीची किंमत रक्कम रुपये १८ कोटीची मागणी केली आहे ही बाब निदर्शनास आणली.

श्री.साई गोपी असोसएटर्स, यांचे प्रतिनिधी श्री शर्मा उपस्थित होते त्यांना शासनाने उपरोक्त जमीनीची किंमत रुपये १०,५४,८१,१३६.०० केलेली आहे. त्यावर त्यांनी त्यांची निश्चित मागणी काय आहे याची विचारणा मा.जिल्हाधिकारी यांनी केली. त्यावर श्री शर्मा यांनी १८ कोटीची मागणी आहे त्यात कमी जास्त होणार नाही असे सांगितले. यावर मा.जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितलेली भूसंपादनाच्या प्रकरणांमध्ये किंमत निश्चित झाल्यावर उभय पक्षाचा समझोता झाल्यावर कन्सेंट अवार्ड करता येईल व त्यामध्ये वेळही वाचेल यावर मा.जिल्हाधिकारी यांनी सदरहू जमीन कन्सेंट अवार्डने घेण्यात यावी, असे सुचविले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू जमीन कन्सेन्ट अवार्डने घेण्यात यावी असे ठरले. मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू जमीन आता कन्सेन्ट अवॉर्डने घेत आहे असा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना पाठवावा.

**०४) सर्व्हे नं.२/२, २/३ व ३/४ (लक्ष्मीनगर) मधील क्षेत्र हेक्टर ०१-८८ आर मालकी महाराष्ट्र सरकार यांची (स्मशानभूमी वगळून) जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांना मोफत मिळणेस व लक्ष्मीनगर वसाहत पुनर्वसनासाठी आरक्षण क्रं.२३ सर्व्हे नं. ५४, ५५ जागेबाबत.**

मौजे शिरडी येथील गट क्रमांक २/२, २/३ व ३/४ येथील जमीनी हया महाराष्ट्र सरकार यांच्या मालकीच्या असून त्या शिर्डी नगर पंचायत हद्दीत आहेत.

१) स.न. २/२ क्षेत्र ०-२५ आर - मालकी -महाराष्ट्र सरकार- भूमिहीन घरकुले साठी
२) स.नं .३ क्षेत्र ०.१५ आर- मालकी- महाराष्ट्र सरकार- दहा व दफन भूमीसाठी
३) स.नं .३/४ क्षेत्र हेक्टर १.४८ आर- मालकी -महाराष्ट्र सरकार- भूमीहीन शेतमूजर घरकुले योजनासाठी

उपरोक्त प्रमाणे हेक्टर १.८८ आर असलेल्या जमिनीवर सध्या लक्ष्मीनगर नावाने भूमिहीन - शेतमजूर यांचेसाठी वसाहत आहे. शिरडी ग्रामपंचायत यांचे काळापासून १०१ भूमिहीन शेतमजुरांना अधिकृत घरकुलासाठी जागा वाटप केली असून येथे लक्ष्मीनगर नावाने वसाहत वसलेली आहे. लक्ष्मी-नगर ही वसाहत शिर्डी शहराच्या उत्तरेस असून वसाहतीच्या उत्तरेस नाला आहे. सदर वसाहत नाल्याच्या कडेनेच वसलेली आहे. लक्ष्मीनगर ही वसाहत संस्थानच्या प्रसादालयाच्या शेजारीच आहे. त्यामुळे भविष्यात या जमिनीचा संस्थानला वेगवेगळया विकास कामासाठी उपयोग होऊ शकतो त्यामुळे सदर जमीन संस्थान साठी भू-संपादीत करणे योग्य राहील.

लक्ष्मीनगर येथील एकूण जमीन १ हेक्टर ८८ आर असून त्याची सह निंबधक ,अ.नगर यांचेकडील शिघ्रगणकानुसार ५,०७, ६०,०००/-आहे.

१) स्मशानभूमी क्षेत्र हेक्टर ०.४८ आर ची जागेची किंमत सह निंबधक ,अ.नगर यांचेकडील शिघ्रगणकानुसार १,२९,६०,०००/- आहे.
२) स्मशानभूमी वगळता लक्ष्मीनगर जागेची किंमत सह निंबधक ,अ.नगर यांचेकडील ३,७८,००,०००/- आहे.

शिर्डी विकास योजनेतील आरक्षणात वसाहती अंतर्गत पूर्व पश्चिम १८ मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्यास जोडून १२ मी. रुंदीचा पूल नाल्यावरुन स्मशानभूमीकडे प्रस्तावित केलेला आहे. सदर वसाहतीची जागा ही साईबाबा संस्थानच्या साईप्रसाद परिसरालगत व मुख्य रस्त्यावर आहे हया जागेचा साईभक्तांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थानला उपयोग करता येईल. भविष्यातील नियोजनासाठी सदर जागेची आवश्यकता आहे.

सदरची जागा महाराष्ट्र शासनाची आहे संस्थानला लक्ष्मीनगर येथील जागा मोफत मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तसेच शिरडी विकास आराखडयात फेरबदल प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत यांचेकडून सादर करता येईल. लक्ष्मीनगर येथील रहिवाशांचे पुनर्वसन करणेसाठी आरक्षण क्र २३ मध्ये १ हेक्टर ८९ आर क्षेत्र आरक्षित आहे. तेथे लक्ष्मीनगर येथील रहिवाशांचे पुनर्वसन करता येईल. सदर आरक्षण विकसित करणेसाठी सध्या शिर्डी नगरपंचायत विकसन यंत्रणा आहे.

आरक्षण क्रमांक २३ ( बेघरांसाठी घरे ) स.नं ५४ ,५५ मधील खाजगी जमीन मालकापैकी काही जमीन मालकांनी जमीन विकत देणेसाठी अर्ज सादर केले आहेत. जमीन मालकांनी नमूद केलेले क्षेत्र आरक्षण क्रमांक २३ बेघरांसाठी घरे क्षेत्र हेक्टर १.८९ आर, आरक्षण क्रं. २५ क्रिडांगण, दक्षिण -उत्तर १८.०० मीटर प्रस्तावित रुंद रस्त्यापैकी व निवासी क्षेत्रापैकी आहे. सदरचे आरक्षण संस्थान मार्फत विकसित करणे विचाराधीन आहे.

अर्जदारांचे जमीनी बाबतची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | जमीन धारकाचे नांव | स.नं. | क्षेत्र ७x१२ प्रमाणे | आरक्षण व इतर माहिती. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.गणपत कारभारी गोंदकर, रा. शिरडी | ५५/२<br>५५/१० | ०.१८ आर<br>०.३८ आर<br>०.५६ आर | आरक्षण क्रमांक २३,२५ - १८ मीटर रुंद रस्ता व निवासी क्षेत्रापैकी<br>१) गौतम बॅंक यांची ५,००,०००/- बाकी आहे.<br>२) साईनागरी पतसंस्था यांची १२,५०,०००/-+ व्याज बाकी आहे.<br>३) रेडीरेकनर प्रमाणे किंमत- ८९,६०,०००/- ( रेडीरेकनर - प्रमाणे किंमत प्रती चौ.मीटर रुपये - १,६००/-)<br>४) एकूण क्षेत्रापैकी आरक्षण क्रं. २३ मधील क्षेत्र हेक्टर ०-१२-५० आर आहे |
| ०२ | सौ.पुजा प्रताप जगताप, रा. शिर्डी | ५५/१४<br>५५/१६ | ०.२५ आर<br>०.०६ आर<br>०.३१ आर | आरक्षण क्रमांक २३, - १८ मीटर रुंद रस्ता<br>१) रेडीरेकनर प्रमाणे किंमत - ४९,६०,०००/-( रेडीरेकनर प्रमाणे किंमत प्रती चौ.मीटर रुपये १६००/- प्रमाणे )<br>२) एकूण क्षेत्रापैकी आरक्षण क्रं. २३ मधील क्षेत्र हेक्टर ०-१९-८० आर आहे |
| ०३ | सौ. कमल गोपीनाथ म्हस्के रा शिरडी | ५५/३४<br>५४/४६ | ०-२३ आर<br>०.०६ आर<br>०.२९ आर | आरक्षण क्रमांक २३, - १८ मीटर रुंद रस्ता<br>१) रेडीरेकनर प्रमाणे किंमत स.नं. ५५ प्रती चौ.मी. रुपये १६००/- प्रमाणे एकूण किंमत रुपये ३६,८०,०००/-<br>२) रेडीरेकनर प्रमाणे किंमत स.नं. ५४ प्रती चौ.मी.१८००/- रु.प्रमाणे एकूण रु.१०,८०,०००/-अ.नं. ३ व ४ ची एकूण किंमत ४७,६०,०००/-<br>३) एकूण क्षेत्रापैकी आरक्षण क्रं. २३ मधील क्षेत्र हेक्टर ०-१५-३० आर आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | श्री. भाऊसाहेब म्हाळू काटकर, रा. शिरडी | ५४/३५<br><br><br><br><br><br><br>५५/२ | ०.०४ आर<br><br><br><br><br><br>०.३३ आर<br><br>०.३७ आर | आरक्षण क्रमांक २५ - निवासी क्षेत्रापैकी<br>१) रेडीरेकनर प्रमाणे किंमत स.नं. ५४ प्रती चौ.मी.१८००/-रु प्रमाणे एकूण रु. ७,२०,,०००/-<br>२) रेडीरेकनर प्रमाणे किंमत स.नं. ५५ ची प्रती चौ.मी. रुपये १६००/-प्रमाणे एकूण किंमत रुपये ५२,८०,०००/-अ.नं. २ व ३ ची एकूण किंमत ६०,,००,०००/-<br>३) सदर क्षेत्र आरक्षण क्रं. २३ मध्ये येत नाही. |
| ०५ | श्री.सोमनाथ म्हाळू काटकर, रा. शिरडी | ५५/१५ | ०.३० आर | आरक्षण क्रमांक २५<br>१) रेडीरेकनर प्रमाणे किंमत स.नं. ५५ ची प्रती चौ.मी. रुपये १६००/-प्रमाणे एकूण किंमत रुपये ४८,००,०००/-<br>२) सदर क्षेत्र आरक्षण क्रं. २३ मध्ये येत नाही. |
| ०६ | श्री.वंसत आनंदराव घुगे.<br>सौ. पुष्पलता अशोकराव आव्हाड, रा. शिरडी | ५५/१५ | ०.०४ आर | आरक्षण क्रमांक २५<br>१) रेडीरेकनर प्रमाणे किंमत स.नं. ५५ ची प्रती चौ.मी. रुपये १६००/-प्रमाणे एकूण किंमत रुपये ६,४०,०००/-<br>२) सदर क्षेत्र आरक्षण क्रं. २३ मध्ये येत नाही. |
| ०७ | श्री. रावसाहेब तात्याजी गोंदकर रा शिरडी | ५५/१२ | २-७३ आर<br>पो वि ०.०२<br>२.७५ | आरक्षण क्रमांक २३, २५ - १८ मीटर रुंद रस्ता व निवासी क्षेत्रापैकी<br>१) रेडीरेकनर प्रमाणे किंमत स.नं. ५५ ची प्रती चौ.मी. रुपये १६००/-प्रमाणे एकूण किंमत रुपये ४,४०,००,०००/-<br>२) एकूण क्षेत्रापैकी आरक्षण क्रं. २३ मधील क्षेत्र हेक्टर ०-५४-६० आर आहे |
| | एकूण क्षेत्र | | हे.४.६२ आर | |
| | रेडीरेकनर प्रमाणे एकूण किंमत | | | रुपये ७,४१,२०,०००-०० |

स.नं. ५४ व ५५ मधील जमिनी लक्ष्मीनगरमधील रहिवाशांच्या पूनर्वसन करणेसाठी खरेदी करणेबाबत चर्चेत ठरले आहे.

सदर आरक्षण संस्थानचे माध्यमातून विकसन करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांची विकसन यंत्रणा म्हणून नेमणूक होणेसाठी शिर्डी नगरपंचायत यांनी विकास आराखडयामध्ये फेरबदल प्रस्ताव करणे आवश्यक आहे. सदर जमीन खरेदी करणेसाठी संबंधीत जमीन मालकांशी चर्चा करून निर्णय होणेस विनंती. विकसनयंत्रणा बदलणे व विकास आराखडयात फेरबदल करणेबाबतचा प्रस्ताव शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांना संस्थानने जा.क्रं.एसएसएस/वशी-बाधंकाम/१४३७२/२००५ दिनांक १०/१२/२००५ रोजी पाठविणेत आला आहे.

अर्जदारांनी वरील प्रमाणे क्षेत्र हेक्टर ५.०८ आर आहे. पैकी अ.नं. ०१ ते ०५ एकूण हेक्टर १.८३ आर देण्यास तयार आहे.

सर्व सबंधित जमीन मालकांची जमीन भूसंपादनाने वा वाटाघाटीने जमीन खरेदी करणेबाबत उचित कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले की,स.न. २/२,२/३ व ३/४ या जमीनी संस्थानला मोफत मिळाव्यात म्हणून शासन व जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच आरक्षण क्र.२३ मधील जमीन खरेदी देण्याची तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे जमीन घेण्यात यावी. आरक्षण क्रमांक २३ ची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी असे करणेबाबत शिरडी नगरपंचायतीने पाठपुरावा करावा त्यानुसार आजचे सभेत चर्चा होऊन, आरक्षण क्रमांक २३ मध्ये लक्ष्मीनगर मधील नागरीकांचे पुनर्वसन करणेसाठी शासन व जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. उपरोक्त जागा शिर्डी गावठणापासून जवळच्या अंतरावर आहे. त्यामूळे सध्याची मोक्याची संस्थानला लगत असलेली जागा साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी मिळेल. सदरची जागा संस्थानला अत्यंत आवश्यक आहे.करीता वरीलप्रमाणे जमीन मालकांशी वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे प्रती आर रुपये १,२५,०००.०० प्रमाणे जमीन खरेदी करणेस, याकामी आवश्यक स्टॅम्प फी, नोंदणी फी व इत्यादी त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच आरक्षण क्र.२३ मधील आवश्यक क्षेत्र इतर मूळ जमीन मालक देण्यास उत्सुक नाहीत. करीता सदर जमीन मिळणेसाठी भू-संपादनासाठी व स.नं. २/२,२,३ व ३/४ या जमीनी संस्थानला मोफत मिळाव्या याकरीता मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

**०५) आरक्षण क्रमांक ३४ सर्वश्री सुवालाल अमोलकचंद लोढा व इतर दोन यांची जमीन खरेदी बाबत.**

१) आरक्षण क्रमांक ३४ दवाखाना विस्तारीकरणासाठी संस्थानला राखीव आहे. मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर, भाग श्रीरामपूर, यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावि-/भूस/२४/२००५ दिनांक २५/०२/२००५ अन्वये मोजणी मध्ये फेर भू-संपादनाचा प्रस्ताव पाठविणेबाबद सुचविलेले आहे. त्यांच्या

सुचनेप्रमाणे दिनांक १४/०३/२००५ अन्वये हेक्टर ०३-८८ आर २७ चौ.मीटर भू-संपादनाचा प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे.

यामध्ये सदर आरक्षण क्रमांक -३४ मध्ये भू-संपादनात श्री पृथ्वीराज लोढा हेक्टर ०१-०८आर, श्री जसराज लोढा हेक्टर ०१-१२ आर श्री सुवालाल लोढा हेक्टर ०१-१७ आर व श्री अमोलक्चंद लोढा हेक्टर ००-०१ आर असे हेक्टर ०३-३८ आर क्षेत्र आहे. श्री लोढा कुटूंबियांचे व्यतिरिक्त इतर २३ लोकांचे क्षेत्र हेक्टर ००-५०आर २७ चौ.मी.चा समावेश आहे.

२)श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा, श्री जसराज अमोलकचंद लोढा व श्री सुवालाल अमोलकचंद लोढा यांनी त्यांची आरक्षण क्रमांक ३४ मध्ये असलेली स.नं.१२५ मधील जमीन संस्थानने प्रत्येक आरला रक्कम रुपये- १,५०,०००/- या दराने खरेदी करावी असा अर्ज मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८/०५/२००५ रोजी

झालेल्या सभेत दिला व श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा, श्री जसराज अमोलकचंद लोढा व श्री सुवालाल अमोलकचंद लोढा यांनी त्यांचे एकूण क्षेत्र हे. ०३-५०-०० हे रुपये- १,५०,०००/- प्रति आर याप्रमाणे विकत देण्यास तयार दर्शविली. तसेच या जमिनीत असणा-या विहीरीतून १/२ इंची पिण्याचे पाण्याचे कनेक्शन घेण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती केली.

भू-संपादनाचा निवाडा पूर्ण होऊन ताबा मिळणेसाठी किती कालावधी लागणार हे निश्चित नाही. खरेदी खतामुळे जमिनीचा ताबा लगेच मिळणार असून वाढीव रक्कम मिळणेसाठी जमीन मालक कोर्टात जाणार नाहीत. मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक०६/०५/२००५ रोजी झालेल्या सभेत याबाबद निर्णय क्रमांक २४२ खालील प्रमाणे झालेला आहे.

०१)"...श्री साईबाबा संस्थानला रुग्णालयाचे विस्तारीकरणासाठी सदर जमिनीची आवश्यकता असल्याने श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा ,श्री जसराज अमोलकचंद लोढा व श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा यांचे एकूण क्षेत्र हेक्टर ०३-५० आर रुपये-१,५०,०००/- प्रति आर याप्रमाणे विकत घेण्यात यावे.

०२) खरेदी खतासाठी स्टॅम्प डयुटी व इतर प्रासंगिक खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

०३) अर्जदार यांनी जमीन कसणाऱ्या विहीरीतून १/२ इंची पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मिळावे, म्हणून केलेल्या विनंतीबाबत संस्थानचे वकीलांचा अभिप्राय घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीत निर्णय घेण्यात यावा , असे ठरले .... "

३) उपरोक्त बाबींचा विचार करता खरेदी खत व त्यांचे मुल्यांकनाचे दृष्टीने खालील प्रमाणे माहिती संकलीत केलेली आहे.

०१) उपरोक्त जमीनीच्या शेजारचे आरक्षण क्रमांक ३९ चा प्रारुप निवाडा.

०२) सह. जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील बाजार मूल्य माहिती (सन २००६ बाजार मूल्य तक्त्या नुसार )

०३) आ.क्र.३४ चा प्रारुप निवाडा :-

<u>उपरोक्त जमीनीचे शेजारचे आरक्षण क्रमांक ३९ व त्या बाबतचा प्रारुप निवाडा.</u>

आरक्षण क्रमांक ३४ दवाखाना विस्तारीकरणासाठी स.नं. १२५ पैकी व १२६ पैकी क्षेत्र हे.३-८८ आर २७ चौ.मी. विकासआराखड्यात आरक्षीत आहे.याच आरक्षणाचे शेजारी आरक्षण क्रं.३९ मध्ये स.नं.१२४ पैकी , १२५ पैकी व १२६ पैकी क्षेत्र हेक्टर ०४-७५ आर ८७ चौ.मीटर देखिल शिरडी विकास आराखडयात संस्थानसाठीच आरक्षित आहे.व त्याची क्षेत्र भू-संपादीत होत आहे.

कार्यालयीन माहिती प्रमाणे आरक्षण क्रमांक ३९ च्या प्रारुप निवाडयामध्ये क्षेत्र हेक्टर ०४-७५ आर ८७ चौ.मीटर असून जमीनीची किंमत ४,२८,४८,३००/- धरण्यात आलेली आहे.त्याप्रमाणे प्रति आरला रक्कम रुपये- ९०,७४२/- हा दर येत आहे. त्यावर ३०% दिलासा व रक्कम रुपये- १२% अतिरिक्त घटकाची रक्कम +(अधिक ) आस्थापना चार्जेस धरुन प्रती आरला रक्कम रुपये- १,४८,३९४/- हा दर येत आहे.

<u>मा.सह.जिल्हा निबंधक, वर्ग-१, अहमदनगर यांचे मूल्यांकन :-</u>

स.नं.१२५ चा दर प्रती आरला रक्कम रुपये- १,१८,१७०/- कळविलेला आहे.त्यात ३०% दिलासा रक्कम व आस्थापना चार्जेस धरुन दर आरला रक्कम रुपये- १,५७,१६६/- दर येत आहे.

<u>आरक्षण ३४ चा निवाडा व आरक्षण ३९ निवाडा व सह.जिल्हा निबंधक वर्ग-१,अहमदनगर यांनी कळविलेला दर याबाबत तुलानात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.</u>

| तपशिल | आरक्षण क्रं.३९ | आरक्षण क्रं.३४ | सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी कळविलेला दर |
|---|---|---|---|
| प्रारुप निवाडा दिनांक | २४/०१/२००५ | १०/१०/२००४ | सन -२००६ |
| कलम ६ ची नोटिफिकेशनची तारीख | १९/०६/२००२ | २९/१२/२००० | ---- |
| जमीनीचे एकूण क्षेत्र | हेक्टर ०४-७५ -८७ | हेक्टर ०३-४४-०० | ---- |
| जमीनीची एकूण किंमत | ४,२८,४८,३००/- | २,११,५६,०००/- | ---- |
| प्रत्येक आरला येणारी किंमत (अ ) | ९०,०४२/- | ६१,५००/- | १,१८,१७०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० % दिलासा रक्कम रुपये (ब ) | २७,०१५/- | १८,४५०/- | ३५,४५१/- |
| नोटिफिकेशनची तारीख दि.२४/०७/२००२ ते ३१/१२/२००४ पर्यंत १२ % इतर घटकासाठी (क ) | २७,०१५/- | ३३,२१०/-(दि. २९/१२/२००० ते दिनांक ००/०६/२००५ पर्यंत. | १२ % इतर घटकाची रक्कम हिशोबात धरली नाही. |
| एकूण किंमत :- | १,४४,०७२/- | १,१३,१६०/- | १,५३,६२१/- |
| ३ % आस्थापना चार्जे | ४,३२२/- | ३,३९५/- | ३,५४५/- |
| संस्थानला प्रत्येक आरला द्यावी लागणारी किंमत | १,४८,३९४/- | १,१६,५५५/- | १,५७,१६६/- |

वर नमूद केलेल्या तक्त्यामध्ये आरक्षण क्रमांक ३४ चा दर हा दिनांक २९/१२/२००० च्या नोटिफिकेशनच्या तारखेच्या वेळेचा असल्याने कमी आहे.आरक्षण क्रमांक ३४ चा सुधारीत प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना पाठविण्यात आलेला आहे.त्यामध्ये भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ६ ची नोटिफिकेशन निघणार आहे.त्यामुळे प्रती आरच्या दरामध्ये निश्चित वाढ होणार आहे.

वर नमूद केलेला दर विचारात घेता मौजे शिरडी येथील स.नं.१२५ बाबत प्रती आरला रक्कम रुपये-१,५०,०००/- दर योग्य आहे.

सदरचा दर विचारांत घेऊन उपरोक्त खातेदारांचे एकूण क्षेत्र ७/१२ प्रमाणे हे.०३ व ५७ आर खरेदी करण्यात येणार आहे.मात्र प्रत्यक्ष ताबा हे.०३-४९ आर जमिनीचा मिळणार आहे.याबाबत सविस्तर तक्ता खालील प्रमाणे आहे.अ.नं.१ व २ चे क्षेत्र हे.००-०८ आर हे चारीत गेले असल्याने त्याचा ताबा मिळणार नाही. व त्याची रक्कमही अदा करण्यात येणार नाही.

| अ.नं. | खातेदाराचे नांव | स.नं. | विकत घ्यावयाचे क्षेत्र हेक्टर आर | प्रत्यक्ष ताब्यात येणारे क्षेत्र हेक्टर आर | रकाना ४ व ५ मध्ये फरक असण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री सुवालाल अ.लोढा | १२५/८ | ०१-२१ | ०१-१७ | ००-०४ हे क्षेत्र चारीकडे गेले आहे. त्या ताब्यात येणार नाही.पंरतू खरेदी खतात नोंद घेणे आवश्यक आहे. |
| ०२ | श्री जसराज अ.लोढा | १२५/७ | ०१-१६ | ०१-१२ | ००-०४ हे क्षेत्र चारीकडे गेले आहे.त्या ताब्यात येणार नाही.पंरतू खरेदी खतात नोंद घेणे आवश्यक आहे. |
| ०३ | श्री पृथ्वीराज अ.लोढा | १२५/६ | ०१-२० | ०१-२० | यात डी.पी.रोड कडे जाणारे क्षेत्र विकत घेतले आहे,व त्याचा ताबा घेण्यात येत आहे |
| | | एकूण | ०३-५७ | ०३-४९ | |

आरक्षण क्रमांक ३४ मध्ये श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा यांचे मालकीचे एकंदर हेक्टर ०१-२० आर क्षेत्रापैकी निव्वळ रुग्णालयासाठी हेक्टर ०१-०८ आर समाविष्ट आहे. सदर स.नं.१२५/६ मधील प्रस्तुतचे हेक्टर ०१-०८ आर जमीन खरेदी केल्याने हेक्टर ००-१२ आर जमीनीचा तुकडा राहणार आहे. सदर हेक्टर ००-१२ आर क्षेत्र शिरडी विकास आराखडा अंतर्गत रस्त्यासाठी आरक्षित आहे.सदर क्षेत्रा लगत संस्थानने स.नं.१२४/१/अ खरेदी केलेला आहे.त्यामध्ये सध्या गोदाम बांधलेले आहे.सदर क्षेत्र खरेदी केले नाही, तर श्री पृथ्वीराज अमलोकचंद लोढा यांचे ताब्यात हेक्टर ००-१२ आर क्षेत्र राहून वहिवाटीस राहणार आहे. त्यासाठी रस्ता वगैरे प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे.याबाबीचा विचार करुन डी.पी.रोडमध्ये जाणारे हेक्टर ००-१२ आर क्षेत्रासह एकंदर हेक्टर ०१-२० आर जमीन खरेदी करण्यात येत आहे.

खालील प्रमाणे जमीन मालकांना देण्यात येणाऱ्या जमीनीच्या किंमतीची रक्कम, स्टॅम्प खर्च, व नोंदणी फी याबाबत संक्षिप्त तपशील आहे.

०१)खरेदी जमीन मालकांना अदा करावयाची रक्कम रुपये- ५,२३,५०,०००/-(अक्षरी रुपये-पांच कोटी, तेवीस लाख पन्नास हजार ) फक्त आहे.

०२)खरेदी खताच्या स्टॅम्पसाठी रक्कम रुपये-२६,१७,५००/-(अक्षरी रुपये- सव्वीस लाख,सतरा हजार, पांचशे ) मात्र खर्च येणार आहे.

०३)खरेदी खतासाठी नोंदणी फी रक्कम रुपये- ५,२३,५००/-(अक्षरी रुपये- पांच लाख, तेविस हजार, पांचशे) मात्र खर्च येणार आहे.

संस्थान व जमीन मालक यांचे दरम्यान प्रत्यक्ष क्षेत्राचा ताबा घेणे - देणेवर उपरोक्त अदाई रक्कमेमध्ये थोडाफार फरक होऊ शकतो.

०४) श्री अमोलकचंद राजरुप लोढा यांची जमीन स.नं.१२५/५ क्षेत्र हेक्टर ००-०१ आर (विहीरीसह) खरेदी करावयाचे आहे.श्री अमोलकचंद राजरुप लोढा हे मयत असून त्यांचे वारसाची नोंद करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.सदर नोंद मंजूर झाल्या नतंर प्रस्तुत जमीनीचे खरेदी खत करण्यात येणार आहे.

०५)आरक्षण क्रमांक ३४ मधील स.नं.१२५/७ मधील श्री नवनाथ बहिरु चौधरी व इतर ४ यांची प्रत्येकी एक आर जमीन अशी एकूण ५ आर जमीन आहे. त्या सर्वांनी त्यांचे क्षेत्र प्रती आर रुपये- १,५०,०००/- या

दराने संस्थानने खरेदी करावे असा दिनांक ०२/०२/२००६ रोजी अर्ज दिलेला आहे, व त्याप्रमाणे त्यांचेशी चर्चा देखिल झालेली आहे, व त्यांनी संमती दिलेली आहे. श्री नवनाथ बहिरु चौधरी व इतर ४ यांची ही प्रत्येकी एक आर जमीन प्रती आर रुपये- १,५०,०००/- या दराने खरेदी करणेत येत आहे. मा.जिल्हाधिकारी यांनी आरक्षण क्रमांक ३९ मध्ये प्रारुप निवाड्यामध्ये प्रती आर झालेली किंमत विचारात घेता व आरक्षण क्रमांक ३४ ची जमीन लगत आहे. ही वस्तूस्थिती विचारात घेता स.नं. १२५ प्रती आर रुपये रुपये १,५०,०००/- ठरविलेली किंमत योग्य आहे असे मत व्यक्त केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरची जमीन श्री साईबाबा रुग्णालय, साईनगर, शिर्डी बसस्थानक तसेच नगर-मनमाड रस्त्यापासून जवळ आहे. तसेच संस्थान ज्या इतर जमीनी भूमीसंपादनाच्या माध्यमातून घेत आहे. त्याच्या लगतची आहे. सदर जमीन रुग्णालयाचे विस्तारीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहे. साईनाथ हॉस्पीटल सध्या धर्मशाळा इमारतीत आहे. ते तेथून स्थलांतरीत करणेही आवश्यक आहे. भूमीसंपादनाबाबत आजपर्यन्तचा अनुभव लक्षात घेता भुमीसंपादनाचे माध्यमातून जमीन मिळण्यास विलंब लागतो. त्यामूळे विकास कामे हाती घेण्यास विलंब होतो. तसेच जमीनीच्या किंमतीतही वाढ होत आहे. या सर्व बाबींवर साधाक बाधक चर्चा होऊन, श्री लोढा यांचे समवेत वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे प्रत आर रुपये १,५०,०००.०० या दराने खरेदीस मान्यता देण्यात आली. तसेच या क्षेत्रात असलेले श्री नवनाथ बहिरु चौधरी व इतर इतर ४ यांची प्रत्येकी १ आर जमीनही याच दराने खरेदी करण्यात यावी. सर्व जमीन खरेदीसाठी स्टॅम्प फी, नोंदणी फी इत्यादी सर्व खर्च संस्थानमार्फत करावा, असे ठरले.

(कार्यवाही-विधी अधिकारी/बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०५. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता जानेवारी, २००६.**

**(ब) माहे जानेवारी, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जानेवारी, २००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जानेवारी, २००६ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.१०९. (A)**माहे जानेवारी, २००६ मधील जमा-खर्चाचे तक्ते, जानेवारी, २००६मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाचे तक्ते माहे २५ फेब्रुवारी,२००६ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे जानेवारी, २००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेली देणगी, माहे जानेवारी, २००६मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंचा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे जानेवारी, २००६ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. १०९. (B).** माहे जानेवारी, २००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३ रुग्णालयातील रुग्णांना माहे जानेवारी,२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. १०९. (C).** माहे जानेवारी, २००६ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. माहे जानेवारी, २००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. १०९. (D).** माहे जानेवारी, २००६मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. १०९. (E).** बांधकाम प्रगती स्वतंत्र अहवाल व अंतीम बील अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. अंतीम बील अहवालात नमूद केल्याप्रमाणे दि.३०/९/२००६ अखेर विश ॲण्ड ऑन असो. यांना मुदतवाढ देणेबाबत नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०६. पाणी तपासणी अहवाल**

**निर्णय क्र.१०९. (F).** माहे जानेवारी, २००६ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे. एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०६. ३५ एसी नुसार देणगी स्विकारणेच्या नियोजनाबाबत.**

**निर्णय क्र ११०.** आयकर अधिनियम ३५ एसी अंतर्गत देणगी रक्कम आयकरामधून १०० टक्के सूटमिळावी, यासाठी संस्थानने National Committee for Promotion of Social and Economical Welfare, Department of Revenue, Ministry of Finance, New Delhi यांना संस्थानचा Development of Integrated Socio-Economical Health, Education and Essential Facilities for Sai Bhakta's & Community at Large हा प्रस्ताव सादर केला होता. संस्थानचा सदर प्रस्ताव नॅशनल कमिटीने मंजूर करुन एसओ१३५ (ई) दिनांक ३ फेब्रुवारी २००६ प्रमाणे अधिसूचना जारी करुन संस्थानला आयकर अधिनियम कलम ३५एसी अंतर्गत रुपये ७५ कोटी देणगी रुपाने स्वीकारण्यास मंजूरी मिळाली आहे.

आयकर कलम ३५ एसी अंतर्गत देणगी स्वीकारण्याची कार्यपध्दती सदरील कलमात नमूदकेलेल्या विविध तरतुदीनुसार पुढीलप्रमाणे ठेवावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

०१) सदर प्रकल्पाचे मुख्य अधिकारी (Principal Officer) म्हणून मा. कार्यकारी अधिकारी यांना नेमण्यात येईल. या प्रकल्पांअंतर्गत देणगीदार साईभक्तांना देण्यात येणारे सर्टीफिकेट ५८ए, वार्षिक विवरण पत्रके व इतर संबंधीत कागदपत्रावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार मा. कार्यकारी अधिकारी यांना राहील.

०२) या प्रकल्पांअंतर्गत मिळालेली देणगी रक्कम व त्यामधून झालेला खर्च यांचे वार्षिक विवरण पत्र विहीत मुदतीमध्ये नॅशनल कमिटी, नवी दिल्ली यांना सादर करण्याचे काम या प्रकल्पासाठी नेमण्यात आलेले प्रकल्प सल्लागार श्री अभय शास्त्री, चार्टर्ड अकौन्टन्ट, पुणे हे करतील.

०३) या प्रकल्पाअंतर्गत देणगी मिळणारी संपूर्ण रक्कम व त्यामधून होणारा खर्च हा स्वतंत्र दाखविण्याची तरतूद आयकर कायद्यामध्ये असल्याने ही रक्कम जमा करण्यासाठी आंध्र बँक, शाखा शिर्डी येथे संस्थानचे स्वतंत्र बचत खाते उघडावे लागणार आहे. या खात्यावर जमा झालेल्या रकमेमधून सदर प्रकल्पांवर होणारा खर्च करता येईल.

०४) आयकर अधिनियम ३५ एसी अंतर्गत देण्यात येणारी संस्थानची अधिकृत देणगी पावती व ५८ए सर्टीफिकेट हे फक्त संस्थानच्या शिर्डी कार्यालयातील अधिकृत संगणक प्रणालीव्दारेच देण्यात येईल.

०५) देणगी स्वरुपातील जमा होणारी रोख रक्कम, चेक अथवा धनादेश यांची पावती देणगी जमा होताच त्वरीत संस्थानच्या देणगी काऊंटर नं. १ वर काम करणाऱ्या कायम कर्मचाऱ्यामार्फतच दिली जाईल. देणगीदार भक्तास आठ दिवसानंतर प्राप्त झालेल्या देणगी रकमेचे ५८ए अंतर्गत सर्टिफिकेट मा. कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने, सदर भक्ताच्या पत्त्यावर पोष्ठाने पाठविण्यात येईल.

०६) सदर प्रकल्पांअंतर्गत देणगी रक्कम स्वीकारतांना आयकर कायदा १९६१ कलम ३५ एसी अंतर्गत असलेल्या विविध तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

याचवेळी मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांनी समक्ष दिल्ली येथे जाऊन, ३५ एसी अंतर्गत अधिक माहिती या कार्यालयाकडून प्राप्त करावी, असें ठरलें.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०७. संस्थानने नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षकांचे एकत्रित मानधनाबाबत.**

**निर्णय क्र. १११.** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५ नोव्हेंबर, २००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६९४ अन्वये, सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी, अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंट, कोपरगांव व श्री शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंटस, पुणे या दोन संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबाबतचे कार्यादेश त्यांना देण्यात आले असून, माहे नोव्हेंबर, २००५ मध्ये दोन्ही संस्थांनी प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात केलेली आहे.

उपरोक्त निर्णयान्वये लेखापरिक्षणाचे कामकाजासाठी गटप्रमुख-वरिष्ठ लेखापरिक्षक यांना रु.४००/- तर कनिष्ठ लेखापरिक्षक (आर्टिकलशीप करणारे प्रशिक्षणार्थी) यांना रु.२००/- मात्र प्रति मनुष्यदिन याप्रमाणे मानधन देण्यात यावे, जाणे-येणेकामी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी. तसेच लेखापरिक्षणाच्या कालावधीत त्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था, संस्थान निवासस्थान व प्रसादालयात मोफत करण्यात यावी, आणि प्रत्येक कामकाजासाठी मनुष्यदिन (Mandays) निश्चित करुन देण्यात यावेत, असेही ठरले होते.

त्यास अनुसरुन, संस्थानच्या प्रत्येक विभागासाठी आवश्यक असणारे मनुष्यदिन काढण्याचे कामकाज हाती घेण्यात आले होते. परंतु अंतर्गत लेखापरिक्षक नेमण्याची ही पहीलीच वेळ असल्याने मनुष्यदिन ठरविणे अवघड आहे. लेखापरिक्षणासाठी मनुष्यदिन ठरविणे व त्यानुसार लेखापरिक्षकांचे बील तयार करणे हे कामकाज खूपच किचकट/क्लिष्ट स्वरुपाचे होत असल्याने त्यात ब-याच अडचणी येत आहेत.

त्यासाठी उपरोक्त दोन्ही संस्थांना लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी, सर्व खर्चांसह (Including all expenses) एकत्रित वार्षिक फी म्हणून एकूण रु.१,००,०००/- मात्र प्रत्येकी मानधन देणे योग्य होईल, असे नम्र मत आहे.

तरी अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजाकरीता, सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त केलेल्या उपरोक्त दोन्ही संस्थांना मनुष्यदिनाऐवजी, एकत्रित रुपये १,००,०००.०० (रुपये एक लाख मात्र ) (सर्व खर्चांसह)

उपरोक्त प्रमाणे वार्षिक मानधन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०८. मौजे निमगांव-को-हाळे गट नं.८०,८५ मध्ये नियोजित प्रसादालय बांधकामाकरीता आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ११२.** शेती महामंडळाकडुन ताब्यात घेतलेल्या मौजे निमगाव को-हाळे गट नं. ८०, ८५ मधील जमिनीवर प्रसादालयासाठी सर्व सोयीं सुविधांयुक्त अशी प्रशस्त नवीन इमारत बांधकामास व्यवस्थापन समितीचे दि.०३/०५/२००५ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.१८२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन सदर प्रकल्पासाठी ठेकेदारांचे पूर्व पात्रता (Pre Qualification) अर्ज मागविण्यात आले. त्यासाठी २१ ठेकेदारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई यांचे शिफारशीनुसार खालील पात्र ०९ ठेकेदारांना निविदा घेणेकामी निविदा सूचनांचे (Notice inviting Tender) पत्र पाठविण्यात यावे असे दि. १८/१२/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७३८ अन्वये ठरले होते. त्यानुसार खालील ठेकेदारांना पत्र पाठविणेत आले.

०१. युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि, मुंबई
०२.आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स अॅण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे
०३.बी.जी. शिर्के, कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.पुणे
०४.बी.ई. बिलीमोरीया अॅण्ड कं. लि., पुणे
०५.नॅशनल प्रोजेक्टस् कंन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन लि., परळी वैजनाथ (बीड)
०६.जेएमसी प्रोजेक्टस् (इंडिया ) लि., अहमदाबाद
०७.शापूरजी पालोनजी अॅण्ड कं.लि., मुंबई
०८.आर.एल.दलाल अॅण्ड कं. प्रा.लि., मुंबई
०९.गॅमन इंडिया लि., मुंबई

निविदा सादर करण्याची अंतिम मूदत दिनांक २०/०२/२००६ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील ठेकेदारांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | युनिटी इन्फ्राप्रोजेक्टस् लि, मुंबई |
| ०२ | बी.जी. शिर्के, कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.पुणे |
| ०३ | आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स अॅण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे |
| ०४ | बी.ई. बिलोमोरीया अॅण्ड कं. लि., पुणे |

वरील चार निविदाव्यतिरिक्त शापुरजी पालोनजी अॅण्ड कं. लि., मुंबई यांचेकडील एक बंद पाकीट दि. ०१/०२/२००६ रोजी प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले असून त्यास तांत्रिक मान्यता प्राप्त होणे आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त निविदा न उघडता सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करण्यात यावा व मान्यता मिळालेनंतर कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेल्या सहा ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०९. श्री हनुमान मंदिराचा जिर्णोध्दार करणे बाबत.**

**निर्णय क्र. ११३.** शिर्डी येथील श्री हनुमान मंदिराचे बांधकाम हे लाकडी खांब, लाकडी पट्ट्या व विटमातीचे आहे. हे बांधकाम अनेक वर्षे जुने झाल्यामुळे पावसाळ्यात मंदिरामध्ये पाण्याची गळती होते.तसेच सदर मंदिर यापूर्वी नगरपंचायतीच्या ताब्यात असल्याने मंदिराची देखभाल योग्य प्रकारे न झाल्याने भिंती व दरवाजे अस्वच्छ झाले आहेत. सदरचे हनुमान मंदिर सध्या संस्थानचे ताब्यात देण्यात आले असून दैनंदिन देखभाल, पूजाअर्चा संस्थानमार्फत करण्यात येत आहे. या संपूर्ण मंदिराचा जिर्णोद्धार करणे आवश्यक आहे. यासाठी लागणारा सर्व खर्च सुरत येथील साईभक्त श्री महेश व मेहूल गुप्ता (शगुन साडी अॅण्ड ड्रेसेस, सुरत) हे करण्यास तयार आहेत असे त्यांनी दि. २२/०९/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५/११/२००५ चे सभेतील निर्णय क्र. ६७३ अन्वये हनुमान मंदिराचे जिर्णोद्धार करण्याचे ठरले आहे. हनुमान मंदीर हे समाधी मंदिर परिसरालगत आहे. करीता सदर मंदिराचे नूतनीकरण हे समाधी मंदीर परिसराशी सुसंगत व्हावे, यासाठी मंदीर परिसराचे आर्किटेक्ट माथूर अॅण्ड कापरे असो., नवी दिल्ली यांचेकडून आराखडा व एस्टीमेट मागविण्यात आले आहे. याकामी त्यांनी अंदाजे रु. १८,३०,२३६.०० मात्र खर्च अपेक्षित असल्याचे दि. २७/०२/२००६ कळविले आहे.

आर्किटेक्ट यांनी खालील बाबी विचारात घेउन प्लॅन व एस्टीमेट तयार केले असल्याचे कळविले असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

०१.सध्याचे मारुती मंदीराचे छताची उंची कमी असल्यामुळे त्रासदायक व गर्दी झाल्यासारखे वाटते.

०२.आर्किटेक्ट यांनी मंदीराच्या छताची उंची १५' फूट ठेवलेली आहे.

०३.सध्याचे मंदीराचा विस्तार करण्यास जागा उपलब्ध नाही. त्यामुळे मंदीराचे तेवढ्याच जागेत जिर्णोद्धार करावा लागेल.

०४.मंदिराचे व्हेन्टीलेशन व इलेव्हेशन करीता समोरील बाजूस सॅण्ड स्टोन जाळी बसविणे.

०५.स्वच्छतेचा विचार करता मंदिराचे आतील फ्लोरींग व डॅडो वेगवेगळ्या रंगाचे ग्रेनाईट/मार्बल बसविता येतील. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१०. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ते विकसित करणे बाबत**

**निर्णय क्र. ११४.** उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, व अध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी नगरपंचायत हद्दीतील खालील कामे शिरडी शहराच्या व साईभक्तांचे सोयी सुविधांच्या दृष्टीने हाती घेणेबाबत व खालील कामाकरीता अंदाजे रु. ४.११ कोटी इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था मार्फत उपलब्ध करुन मिळणेस विनंती केली आहे.

शिर्डी नगरपंचायत यांचे खालील तपशिलानुसार रस्त्यांचे खडीकरण डांबरीकरण, विद्युत व्यवस्था, रिटेनिंग बांधकाम भुयारी गटार, हिन्दु स्मशान भूमी विकसीत करणे इत्यादी कामे करण्याचे मुख्याधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे.

| अ. नं. | रस्त्यांचे नाव व तपशिल | अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|
| १ | शिर्डी - बन रस्ता रुंदीकरणांतर्गत खडीकरण व डांबरीकरण करणे. (कॉंक्रीटीकरणापासुन पुढे बिरोबा मंदिरापर्यंत) तसेच विद्युत व्यवस्था करणे.( २.०km x ३.७m ) | ३३.५५ लक्ष |
| २ | पिंपळवाडी रस्ता ते चौफुली पर्यंतचा रस्ता ( जुना पिंपळवाडी रस्ता ते बिरोबा मंदिराकडे जाणारा रस्ता) रुंदीकरणांतर्गत खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच विद्युत व्यवस्था करणे. ( १.२km x ३.७ m ) | १८.३१ लक्ष |
| ३ | शिर्डी - निमगांव शीव रस्ता (पश्चिम बाजू) रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच विद्युत व्यवस्था करणे. ( १.०km x ३.७m ) | १६.७१ लक्ष |
| ४ | शिर्डी - रुई शीव रस्ता कंपोष्ट डेपो पर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे. (१.५ km x ३.७m ) | १५.८४ लक्ष |
| ५ | कंपोष्ट डेपो रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते कंपोष्ट डेपो) रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. तसेच विद्युत व्यवस्था करणे. (०.९ km x ३.७m) | २२.७८ लक्ष |
| ६ | स्वामी रिसोर्ट ते पानमळा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे व विद्युत व्यवस्था करणे. (०.५ kmx ५.० m) | १०.८० लक्ष |
| ७ | शिर्डी साकुरी शीव रस्ता (पुर्व व पश्चिम बाजू) रुंदीकरणा साठी डांबरीकरण करणे तसेच विद्युत व्यवस्था करणे. ( २.८km x ५.५m ) | ३१.१६ लक्ष |
| ८ | नाला क्र.३४ साठी कनकुरी रस्त्यापासुन जुन्या रिटेनिंग वॉल पर्यंत रिटेनींग वॉल बांधकाम करणे. ( ८०० mt. ) | १००.६१ लक्ष |
| ९ | नाला क्र.३४ च्या लगत कनकुरी रस्ता ते नगर-मनमाड रस्त्यापर्यंत ६०० मी.मी. व्यासाची भुयारी गटर करणे. (११०० mt.) | १६.२९ लक्ष |
| १० | जुना पिंपळवाडी रस्त्यास दोन्ही बाजुने भुयारी गटर करणे. (पुष्पांजली चौक ते लुटे वस्ती नाला) | ३०.०० लक्ष |
| ११ | पुनमनगर ते कोते वस्ती पर्यंत रस्ता (गणेशबंधाऱ्यालगतचा रस्ता) खडीकरण व डांबरीकरण करणे. (१.० km x ३.७ m) | १७.०७ लक्ष |
| १२ | नगर-मनमाड रस्त्यास दोन्हीबाजुने भुयारी गटर करणे. | २७.०० लक्ष |
| १३ | हिंदु स्मशान भुमीचा विकास करणे. | २९.०० लक्ष |
| १४ | नगर-मनमाड रस्ता (गांधी वस्ती ते बिरेगांव नाला) भुयारी गटर करणे. | ४२.१२ लक्ष |

प्रस्तावाची एकूण अंदाजे रक्कम **रु.४.११ कोटी**.

उपरोक्त पैकी अ.नं. ३ मध्ये नमूद केलेला शिर्डी - निमगांव रस्ता (पश्चिम बाजू) १००० मी. पैकी ४४० मी. चे खडीकरण व डांबरीकरण करणेचे काम संस्थान मार्फत निमगांव कोऱ्हाळे येथील घेतलेल्या शेती महामंडळाकडील जमिनीसाठी करावयाचे रस्त्यांमध्ये घेण्यात आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांची कामे शिर्डी शहराच्या तसेच साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टीने विकसीत करणेकामी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी ) अधिनियम, २००४ मधिल खालील पोट-कलम २१(२) नुसार राज्य शासनाची पुर्व मंजुरी घेणेस मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावावर चर्चा होऊन, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.११. शिर्डी ते साकुरी रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र. ११५.** श्री साईबांबाचे शिर्डीपासून साकुरी ५ कि.मी. अंतरावर असून तेथे श्री साईबाबांचे समकालीन संत श्री उपासनीबाबा महाराज व श्री गोदावरी माताजी यांचे समाधी स्थान व कन्याकुमारी संस्थान आहे. शिर्डी येथे येणारे बहुतांश साईभक्त साकुरी येथे दर्शनासाठी येत असतात.

नगर मनमाड राज्यमार्गापासून साकुरीस जाणारा जुना रस्ता असून पूर्वीपासून शिर्डी ते साकुरी अशी घोडा-टांगे यांची वहातूक होत असे. आता भक्तांची इतरही वहाने सदर रस्त्याने जात येत आहेत. सदर रस्ता

अत्यंत खराब झाला आहे. त्यामुळे दर्शनास जाणाऱ्या भक्तांना फार त्रास होतो. करीता सदर रस्त्याचे डांबरीकरण संस्थान मार्फत करण्यात यावे अशी विनंती सरपंच ग्रामपंचायत कार्यालय, साकुरी तसेच श्री उपासनी कन्याकुमारी स्थान, साकुरी, व श्री. दंडवते, साकुरी यांनी केली आहे.

संस्थानतर्फे रस्त्याचे विकासाकरीता खर्च करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ पोट-कलम (२) नुसार राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावावर चर्चा होऊन, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१२. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिवापर्यन्त) कॉंक्रीटीकरण करणे कामासाठी आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र. ११६.** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नऊ रस्त्यांची कामे शिर्डी शहराच्या विकासाच्या दृष्टीने संस्थान मार्फत हाती घेणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी विनंती केली होती. सदरच्या प्रस्तावास व याकामी रु.४.२२ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०३/२००५ चे सभेत नि.क्र. १०८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी सदर नऊ रस्त्यापैकी ७०० मी. लांबीचा व ६.०० मी. रुंदीचा रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता ) कॉक्रीटीकरण करुन मिळणेबाबत रु. ४६,१३,५४०.०० खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर केला होता त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०९/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५७२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

यापुर्वी याकामी वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मूदतीत फक्त ०२ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/१२/२००५ चे सभेत उघडण्यासाठी सादर करण्यात आल्या असता, याबाबत सविस्तर चर्चा होवून दोनच निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे आलेल्या दोन्ही निविदा रद्द करुन पुन्हा नव्याने वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन फेरनिविदा मागविण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार पुन्हा वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि.१९/०१/२००६ ते दि. २७/०१/२००६ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.१८/०२/२००६ अखेर होती.

खालील ठेकेदारांनी विहित मूदतीत कोऱ्या निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१.मे. जय कन्स्ट्रक्शन, अकोले जि.अ.नगर
२.मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अ.नगर
३.मे.वाघ बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स, कोपरगांव
४.मे. महेश हिरामण बऱ्हे, मु.पो.थेरगांव, चिंचवड - ३३
५.मे.एन.जी. ढोकणे, मु.पो. उंबरे ता. राहुरी

उपरोक्त ०५ ठेकेदारांपैकी खालील ०२ ठेकेदारांनी विहित मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

१.मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अ.नगर
२.मे.महेश हिरामण ब-हे, मु.पो. थेरगांव, चिंचवड - ३३

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था अधिनियम, २००४ मधील कलम २ (२) अन्वये उपरोक्त रस्त्याचे काम संस्थानचे निधीतून हाती घेणेसाठी मान्यता मिळणेकामी जा.नं.एसएसएसटी/वशी-बांधकाम/ १०५४६/ दि. २२/०९/२००५ चे पत्राव्दारे मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा आजचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेत आल्या असता निविदा सादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अ.नगर | ४७ % अधिक |
| ०२. | मे.महेश हिरामण ब-हे, मु.पो. थेरगांव, चिंचवड - ३३ | अपात्र |

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगाव शिवापर्यंत) कॉंक्रीटीकरण करणेऐवजी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे. याकामी आवश्यक एस्टिमेट तयार करुन पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१३. शिर्डी शिंगणापूर रस्त्याचे सुधारणा करणेकरीता संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र. ११७.** शिर्डी व शिंगणापूर या प्रसिद्ध तिर्थ क्षेत्राचे ठिकाणी दररोज राज्यातून व परराज्यातून भाविक मोठ्या प्रमाणात येतात. सद्यस्थितीत शिर्डीहून शिंगणापूरला जाण्यासाठी राहुरी मार्गे ७६ कि.मी. जावे लागते तसेच शिर्डी ते राहुरी हा रस्ता रा.मा.क्र.१० चा भाग आहे. या रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणात जड वाहतुकीची वर्दळ असते. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहनाची कोंडी होते व अपघात होतात.

प्रस्तावीत शनिशिंगणापूर श्रीरामपूर - शिर्डी या रस्त्याची लांबी ७० कि.मी. भरते . या रस्त्यामुळे शिंगणापूर व शिर्डी ही प्रसिध्द देवस्थाने जवळच्या मार्गाने जोडली जाणार आहेत. तिर्थक्षेत्र जोडण्याचे काम

राज्यशासन व केंद्रशासनातर्फे हाती घेण्यात येणार आहे. या कामी काही निधी शनि शिंगणापूर देवस्थान व काही निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी द्यावा असे प्रस्तावीत आहे. त्यामुळे अंदाजे रक्कम रु. १८.१० कोटी खर्चाचे ३०% निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०५/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र. २१९ अन्वये तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, यांचे मान्यतेकरिता जा.नं.एसएसएसटी/७१५१/०५ दि. ०८/०७/२००५ चे पत्रान्वये १८.१० कोटी खर्चाचे ३०% निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

दि. १६/०६/२००५ चे पत्रान्वये, अधिक्षक अभियंता, अ.नगर यांनी संस्थानने देऊ केलेली रक्कम रु. ५.०० कोटी व श्री. शनिशिंगणापूर संस्थानने देऊ केलेली रक्कम रु. ३.०० कोटी व शासनाचा ३०% सहभाग गृहीत धरुन, सदर रस्त्यावरील वहातूक, वर्दळ विचारात घेता हा प्रकल्प खाजगीकरणाअंतर्गत सुसाध्य होत नाही. तसेच त्यांनी मा.अध्यक्ष यांचे नावे असलेल्या पत्रान्वये कळविले आहे की, संस्थानची रस्ता होणेबाबतची आस्था पहाता एकूण अंदाजीत रकमेच्या ५०% रक्कम प्राप्त झाल्यास हा प्रकल्प शासनाच्या ३०% सहभागाव्दारे खाजगीकरणा अंतर्गत साध्य होउ शकतो, असे कळविले आहे.

मा.कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सा.बां) यांनी दिनांक २७.०२.२००६ चे पत्रान्वये या प्रकल्पाची अंदाजे खर्चाची रक्कम रु.१८.१० कोटीवरुन रु.२८.११ इतकी वाढलेली असल्यामुळे व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मागणीप्रमाणे संस्थानकडून रु.१०.०० कोटी निधी देणेबाबत निर्णयार्थ प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सदर फेरप्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, यांचेकडे सादर करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१४.** **नवीन रुग्णालय इमारतीमधील दरवाजे व खिडक्यांना पडदे बसविणेकामी कर्टनरॉड खरेदीकामी आलेल्या कोटेशन्सवर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ११८.** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दरवाजे व खिडक्यांना पडदे बसविणेसाठी खालील मटेरीअलची आवश्यक्ता आहे.

| S.No. | Particulars | Qty | Unit |
|---|---|---|---|
| 01 | Powder coated Aluminium fluted curtain pipe rail in approved shade, 25mm dia., Medium class of required length ranging from 1.22 m to 3.66 m, weight per piece of 12 feet shall be 680 to 700gm. | 1017.00 | Rmt. |
| 02 | Decorative brass golden polished curtain pipe brackets weighing approximately 400 to 450 gm per pair (2 nos). | 460. | Pair. |
| 03 | Decorative brass powder coated middle support bracket in approved shade, weighing approximately 50 gm per no. | 210. | Nos. |
| 04 | PVC curtain rings in plain ivory shade. Medium Quality. | 625. | Dozen. |
| 05 | Nettle Fold full threaded Screws 25/6. | 04. | Pack of 1000 nos. |

वरीलप्रमाणे कर्टन पाईप, ब्रॅकेट, कर्टन रिंगचे मटेरीअल खरेदी कामी पुरवठादारांकडून संस्थानने दाखविलेल्या मटेरीअलचे नमुन्याप्रमाणे सिलबंद कोटशन्स मागविण्यात आले होते. ते. मा.व्य. समितीचे स्थानिक समितीपुढे दि. ०१/०२/२००६ रोजी उघडण्यात येउन अलंकार कार्पोरेशन, राहाता यांचे निम्नतम दराचे कोटेशन मंजूर करण्यात आले होते.

परंतु, अलंकार कार्पोरेशन, राहाता यांनी नमुन्याप्रमाणे मटेरीअल उपलब्ध नसून त्याचे दर वेगळे असल्याचे सांगितले. त्यामुळे नव्याने कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव |
| ०२ | क्वालिटी हार्डवेअर, नाशिक |
| ०३ | फातेमा ट्रेडींग कं., नाशिक |
| ०४ | शिरोडे हार्डवेअर स्टोअर्स, कोपरगावं |
| ०५ | अलंकार कार्पोरेशन, राहाता |
| ०६ | पटेल प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, शिर्डी |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशन सादरकर्त्यांना आजचे सभेपूढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत-

| अ.नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव | २,९७,१२८.०० | २,३३,९७१.६० |
| ०२ | क्वालिटी हार्डवेअर, नाशिक | १,४७,९३३.०० | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | फातेमा ट्रेडींग कं., नाशिक | १,२४,९७२.३७ | अनुपस्थित |
| ०४ | शिरोडे हार्डवेअर स्टोअर्स, कोपरगावं | १,५२,४२६.२५ | १,२१,९४१.०० |
| ०५ | अलंकार कार्पोरेशन, राहाता | १,७७,९१०.०० | अनुपस्थित |
| ०६ | पटेल प्लायवूड ॲण्ड हार्डवेअर, शिर्डी | १,२३,१३३.७५ | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.०४ चे निविदासादरकर्ते, शिरोडे हार्डवेअर स्टोअर्स,कोपरगांव यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन त्यांना श्रीसाईबाबा हॉस्पिटल दरवाजे खिडक्यांना पडदे बसविणेकामी कर्टन पाईप,ब्रॅकेट, कर्टन रिंग पुरविणेकामी आदेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१५. श्रीसाईबाबांचे जीवनावर आर्ट गॅलरी बाबत.**

**निर्णय क्र. ११९.** श्री साईबाबांचे जीवनावर आर्ट गॅलरी तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि. १८/०७/२००५ चे सभेत श्री. सुनील शेगांवकर, पुणे व श्री.सपार, सोलापूर यांना ३'x४' या आकाराचे पेटींगची संख्या निश्चित करुन दोन्ही आर्टिस्टना समप्रमाणात काम विभागून देण्यात यावे. व याकामी येणा-या एकूण खर्चाचा तपशिल दोन्ही आर्टिस्टकडून घेण्यात यावा, असे ठरले.

तसेच स्थानिक तैलचित्र कलाकार श्री. हेमंत वाणी, शिर्डी यांचेकडून दि. ०२/१०/२००५ चे सभेत निर्णय क्र. ६४९ अन्वये ३'x४' साईजची १० तैलचित्रे काढून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर तिनही आर्टिस्ट यांनी खालील प्रसंगाप्रमाणे चित्रे चित्रित करणार असल्याचे कळविले आहे.

१.श्री. सुनील शेगांवकर, पुणे
२.श्री. व्ही.व्ही. सपार, सोलापूर
३.श्री. हेमंत वाणी, शिर्डी

**श्री. शेगांवकर, पुणे यांनी खालील प्रसंगाप्रमाणे चित्रे चित्रित करणार असल्याचे कळविले आहे.**

१.म्हाळसापती साईबाबांना "या साई " म्हणून संबोधतांना.
२.श्रीरामाच्या रुपाचे साईबाबांचे दर्शन.
३.चाँद पाटील यांना बाबांच्या कृपेने हरवलेली घोडी सापडते.
४.सर्प व बेडूक यांच्या पुनर्जन्मावर साईबाबांनी सांगीतलेली गोष्ट.
५.पेटलेली धुणी, धुणीचा पेट, उदीचे महत्व व साईबाबा
६.श्रीराम नवमी उत्सव.
७.साईबाबा जात्यावर दळण दळतांना
८.मुसळधार पाउस आल्यावर साईबाबा पावसाला शांत करतात.
९.बायजाबाई साईबाबांसाठी भाकरी आणते.
१०.साईबाबा गावात भिक्षा मागतांना
११.साईबाबांच्या कृपेने महारोगी बरा होतो.
१२.साईबाबांच्या पायाखालून गंगा- यमुना वाहू लागते.
१३.दिपावलीत- पाण्याच्या पणत्या साईबाबाच्या कृपेने पेटू लागतात.
१४.साईबाबांना चांदोरकर गीतारहस्य ग्रंथ भेट देतात
१५.अरुंद लाकडी फळीवर बाबा झोपतात.
१६.साईबाबा गावातील मंडळीशी चर्चा करतांना
१७.रामनवमी निमित्त दासगणू महाराज किर्तन करतात व साईबाबा ऐकत असतात.
१८.सर्व देवदेवतांच्या विराट स्वरुपात साईबाबा.
१९.सप्तश्रृंगी देवीचे दर्शन, काका वैद्य नवस, माधवराव व साईबाबा.
२०.खुशालचंदकडे बाबांनी दिक्षितांना राहण्यास पाठविले.
२१.बाबांसमोर वाघ सुध्दा नम्र झाला.
२२.बाबा गरीब लोकांना / भक्तांना अन्नदान करतांना.
२३.रंजल्या गांजल्यांची सेवा करतांना साईबाबा.
२४.पांडुरंगाच्या रुपात साईबाबांचे दर्शन.
२५.साईबाबांची दिंडी / मिरवणूक
२६.श्रीसाईबाबा चावडीत बसले असतांना दिक्षीत येतात.
२७.साईबाबा- काशीराम व बायजाबाई यांना उपदेश करतांना. चाँदभाई - पोपट व साईबाबा
२९.जामनेरला चांदोरकराच्या लेकीकडे रामगिरी बुवांच्या हस्ते उदी पाठवितात.
३०.साईबाबांची पाद्य पूजा.
३१.विजयानंद सन्यासी व साईबाबा.
३२.सखाराम औरंगाबादकर व त्याच्या पत्नीला संतानप्राप्तीसाठी नारळ ओटीत टाकतांना
३३.शेटजीची परीक्षा - डोक्यावर वीट ठेवून नदीत डुबकी मारायला बाबा सांगतात.
३४.बाबांच्या व्दारकामाईत सर्व धर्माचे भक्तगण जमलेले आहेत.
३५.डेंगळे पाटलाच्या वाड्यासमोर बाबा कुत्र्याला अन्न टाकतात.
३६.साईबाबा एका शेतक-याला लाठीचा सटका मारतांना
३७.दाक्षिणात्य कुटूंब बाबांच्या दर्शनाला येतात, त्यांना उपदेश देतांना
३८.रामदासींची विष्णू सहस्त्रनाम पोथी बाबा माधवरावांना देतात. त्यामुळे रामदासी क्रोधीत होतो.
३९.बोकडाच्या मानेवर सुरी चालवायला सांगून बाबा माधवरावांची परिक्षा घेतात.

४०.साईबाबा दगड आणि माती यामधला फरक समजावून सांगतांना.
४१.दाक्षिणात्य कुटूंब साईबाबांसमोर भजन गातांना.
४२.डेंगळे पाटील साईबाबांची सेवा करतांना
४३.तमासगिरीन बाबांकडे येते.
४४.म्हाळसापती, साईबाबा व बायजाबाई एका प्रसंगात
४५. झाडांना पाणी घालतांना साईबाबा
४६. बायजाबाई झाडू घेउन अंगण स्वच्छ करतांना व साईबाबा
४७. साईबाबा भक्तांकडून स्वतःपोथी वाचून घेतांना / पारायण करतांना
४८. समाधी मंदिराची तयारी/ मुरलीधर मंदिराची तयारी.
४९. साईबाबांचे शेवटचे क्षण त्यावेळी जमलेला समुदाय.
५०. साईबाबांच्या समाधीच्या क्षणी जमलेले भक्तगण
५१. साईबाबांचे वेगवेगळ्या प्रसंगाचे म्युरल/ अद्‌भुत चित्रण

**याबाबत त्यांनी प्रत्येक प्रसंगचित्राची साईज ८'x५' (कॅनव्हासवर) रुपये ५०,०००.०० प्रति नग याप्रमाणे खर्च कळविले आहे. श्री. सपार, सोलापूर यांनी खालील प्रसंगाप्रमाणे चित्रे चित्रीत करणार असल्याचे कळविले आहे.**

**१. 'प्रथम दर्शन '**

श्री साई महाराज जंगलात झाडाखाली बसले आहेत. चांदभाईंचा हरवलेला घोडा महाराजांपाशी उभा आहे. चांदभाई महाराजांना घरी येण्याचा आग्रह करीत आहेत.

**२.'आवो साईबाबा '**

श्री साई महाराज प्रथमच शिर्डीला आले. तेथे खंडोबाच्या देवळात गेले असता त्यांना म्हाळसापती नावाचे गृहस्थ भेटले. महाराजांचा डोक्यावर कफनी, टोपी व धोतर असा पोशाख पाहून म्हाळसापतींनी त्यांना 'आवो साईबाबा' असे संबोधले. तेंव्हापासून महाराजांना 'साईबाबा' असे नाव पडले.

**३.'अजब तेरी करणी साई '**

श्री साईबाबांनी मंदिरातील दिवे पाण्याने पेटविले व ते रात्रभर जळत होते.

**४.'न देखिले कोणी'**

श्री साईबाबा झोपताना लाकडी फळी उंच भिंतीवर चिंधीच्या सहाय्याने अडकवत व चारी बाजूला दीप लावून त्या फळीवर झोपत असत. पण त्यांना चढताना व उतरतांना कोणीही पाहिले नाही.

**५.'रामनवमीची मिरवणूक'**

रामनवमीला महाराजांची प्रथमच मिरवणूक काढण्यात आली.

**६.'मनीची इच्छा जाणे साई '**

नानासाहेब चांदूरकर पंढरपूरास जायला निघाले. ते शिर्डीस येण्याआधीच त्यांचा दर्शनाचा मानस ओळखून बाबांनी त्यांना पंढरीचे दर्शन दिले.

**७.'मंदिर बांधावे'**

बापूसाहेब बुट्टीना स्वप्नात दर्शन देउन त्यांना मंदिर बांधण्याची आज्ञा दिली.

**८.'उपकाराची परतफेड'**

देहावसनाच्या आधी लक्ष्मीबाई बाबांना रोज भाकरी आणून खाउ घालत असे. तिला बाबांनी आपल्या कफनीतून चार- पाच रुपये दिले.

**९.'मशिदीत रामायणाचा पाठ'**

देहावसनाच्या आधी वझे नावाच्या भक्ताकडून बाबांनी मशिदीत रामायणाचा पाठ करुन घेतला.

**१०.'विठ्ठल दर्शन'**

अध्याय ४: दास गणूस बाबांच्या व्दारे विठ्ठल दर्शन.

**११.'ॐ भवति भिक्षां देहि '**

अध्याय ८: बाबा गावच्या चार घरी भिक्षा मागत

**१२.'चंदनाचा त्रिपुंड्र'**

अध्याय ११: दादांचे स्नेहि पंडित शिर्डीला गेले बाबांच्या दर्शनाच्यावेळी त्यांनी प्रथम बाबांच्या कपाळावर चंदनाचा त्रिपुंड्र लावला.

**१३.'जातपात ना माने साई '**

अध्याय १२: श्री साईबाबांनी घोलपबाबांच्या स्वरुपात (भगवी वस्त्रे व भगवी छाटी ) दर्शन देउन मुळे यांच्या मनातील उच्चवर्णाभिमान घालवला.

**१४.'अनुग्रह'**

अध्याय २७: रामदासाच्या नकळत त्याच्या पोथ्यांमधून विष्णुसहस्त्रनामाची पोथी घेउन श्री बाबांनी शामरावला अनुग्रह दिला.

**१६.'रामरुप दर्शन'**

अध्याय २९: दांपत्यास रामरुपी दर्शन दिले.

**१७.'मॉ का बुलावा'**

अध्याय ३०: सप्तशृंगीदेवीचा काकाजींना स्वप्नात दृष्टांत. बाबांना देवीची येउन भेटण्याची आज्ञा.

**१८.'समारंभ सोहळा'**

अध्याय ३७: श्री साईचा समारंभ सोहळा

**१९.'पक्वान्न भोजन'**

अध्याय ३८: हंडीमध्ये जेवण शिजवून सर्वाना विविध पक्वान्नांचे भोजन दिले.

**२०.'चरणसेवा करीन'**

अध्याय ५०: गीतेतील पाठ पुटपुटणारा नाना नावाचा भक्त होता. त्याला गीतेचा सारांश समजावून अनुग्रह दिला.

**२१.'परमात्म्याशी मिलाप'**

श्री साई महाराज आपल्या सर्व भक्तांचे भले चिंतून परमेश्वराच्या भेटीस गेले.

**याबाबत त्यांनी प्रत्येक प्रसंगचित्राची साईज ३'x४' असून ऑईल पेटींग मध्ये असेल यासाठी रुपये ५०,०००/- प्रती चित्र याप्रमाणे खर्च कळविला आहे.**

०३) श्री. हेमंत वाणी, शिर्डी यांनी खालील प्रसंगाप्रमाणे चित्रे चित्रीत करणार असल्याचे कळविले आहे.

१. बाबांनी दळणाचे पीठ वेशीवर टाकूण गावातील महामारी घालविली हे दाखविण्यासाठी ज्याप्रमाणे गहु जात्यावर भरडावे लागतात त्याच प्रमाणे वै-याला सुधा भरडणे (मानवजातीला) आवश्यक असते.

२. बाबांचे चमत्कार पाहून त्याविषयी पोथी स्वरुपात लिखान करण्यासाठी हेमाडपंतांनी बाबांची आज्ञा मागितली.

३. एकदा दासगणूंची इच्छा झाली कि, प्रयाग तिर्थस्नान करायचे (काशीजवळ जिथे गंगा यमुना सरस्वती या तीन नद्याचां सगंम होतो असे क्षेत्र) तर बाबांनी गंगा, यमुना शिर्डीला बोलावून आपल्या पायाच्या दोन्ही अंगठयामधून पाझरविल्या व त्यातुनच दासगणुंचे प्रयाग स्नान झाले. त्यात बाबा व्दारकामाईत बसलेले, दासगणू महाराज व भक्तगण.

४. चांदभाईची हरवलेली घोडी बाबांच्या आवाजाने परत आली.

५. लेंडीबागेचे निर्माण रोज कच्च्या घागरीने पाणी आणून रोपे वाढविली व लेंडीबागेचे निर्माण केले तो प्रसंग

६. दिवाळी उत्सवाकरीता गावातील सर्व वाण्यांनी तेल देण्याचे नाकारल्या नंतर पाण्याने दिवे पेटविले.

७. बाबा व्दारकामाई मध्ये नृत्य करतांनाचा प्रसंग

८. बाबांचे वय २० शिर्डीत आल्यानंतर खंडोबा मंदीराचे भक्त म्हाळसापती बाबांना 'आओ साई' असे म्हणून बोलावतांना

९. धोती, पोती खंडयोग, बाबा कधी कधी स्नानाच्या वेळी आपल्या पोटातील सर्व आताडे बाहेर काढीत ते स्वच्छ धुवून टाकून टांगून ठेवत व नंतर पुन्हा आत स्वच्छ करुन टाकत असत.

१०. बाबा गावातून जातांना व भिक्षा पात्र त्यांच्या हातामध्ये त्यामध्ये तुकाराम महाराजांचे उदाहरण

११. मशिदीमध्ये चार हात लांब व एकच वीत रुंद लाकडी फळी होती. दोन्ही टोकांना चिंध्यांनी बांधून ती झोपळयासारखी टांगलेली होती.अशा फळीवर बाबा झोपत असत.

१२. एकदा शिरडी गावात वादळ आले नंतर मुसळधार पाऊस सुरु झाला पिकलेली शेती वाहून गेली. लोक घाबरले व सर्वजण व्दारकामाईत बांबाकडे धावत आले. अगदी गुरे, शेळ्या अन्य पाळीव प्राणी व्दारकामाईत आले. बाबांनी फक्त हात वरती करुन पाऊस थांबविला. यावरुन त्यांची पंचभूतावरील सत्ता सिध्द होते.

१३. एकदा दासगणू महाराज कीर्तन करण्यासाठी पगडी कुर्ता धोतर अशा प्रकारे कीर्तन करण्यासाठी अगदी नवरदेवाप्रमाणे आले. तेव्हा बाबांनी त्यांना सांगितले की कीर्तन हे अगदी नवरदेवासारखे कपडे न घालता बाह्य रंगाचे प्रदर्शन न करता केले पाहिजे बाबा कीर्तन व्दारकामाईतून ऐकताना व दासगणू फक्त धोतरावर कीर्तन करतांनाचा प्रसंग.

१४. ज्याला ब्रम्हज्ञान पाहिजे त्याकडे स्वार्थाचा लवलेशही नसावा हे बाबांनी सांगितले.

१५. मारुतीच्या देवळात मिरीकर व शामा देशपांडे झोपलेले व साप येतो शामा देशपांडे बघतात व मिरीकरांना सावध करुन बाजुला करतात. व शामा देशपांडेना बाबांनीच मिरीकरांबरोबर पाठविलेले असते.

१६. समाधी जवळ बाबा लोकांना आशिर्वाद देतानी व सर्व लोक आजुबाजुला (भक्तगण ) दर्शन घेतानी.

१७. एकदा व्दारकामाईत एक वाघ आला त्याला बाबांनी मुक्ती दिली आजूबाजूला घाबरलेले लोक

१८. नानासाहेब चांदोरकरांची मुलगी प्रसुतीचे वेळी अडली असताना केवळ उदीच्या पाण्याने निर्विघ्न प्रसुत झाली. बाबा रजपुतांच्या पेहरावात.

१९. बाबा रुग्णांची सेवा करतांना व उदी लावतांना व देतांना बाबा.

२०. भक्तांचे इच्छेनुसार बाबांनी आपल्या हयातीत व्दारकामाई ते चावडी असा पालखीचा उत्सव सुरु केला.

२१. बाबांनी अन्नदानाचे महत्व ठसविले आहे.

२२. नानासाहेब चांदोरकरांना गितेच्या श्लोकाचा अर्थ समजावून सांगतांना बाबांना सस्कृंत भाषा अवगत होती. भक्तांना ज्ञान देउन अज्ञान दूर करीत असत.

२३. बापुसाहेब बुटींना वाड्याचे निर्माण करण्यासाठी सांगून व त्यांचे काम लेंडीला जाता येता बाबा बघत

असत.

२४. अतंकाळ जवळ आल्यानंतर सामान्य माणसाने देवाच्या नामस्मरणात राहिल्यास त्यास मुक्ती मिळते. हे दाखविण्यासाठी बाबांनी १४ दिवस महानिर्वाणाला असतांना वझे नावाच्या भक्तांस रामविजय ग्रंथ वाचावयास लावला.

२५. बाबांनी विरभद्राप्पा व बसप्पा यांची बेडूक व सापाची तिन जन्माची कहाणी कथन केली तो प्रसंग

**याबाबत त्यांनी प्रत्येक प्रसंगचित्राची साईज ३'x४' असून कॅन्हास पेटींग मध्ये असेल यासाठी रुपये २५,०००/- प्रती चित्र याप्रमाणे खर्च कळविला आहे.**

याबाबत पुरातन वास्तुतज्ञ डॉ. गोरक्षकर, मंबई यांनी दि.१७/०२/२००६ अन्वये खालीलप्रमाणे तीनही कलाकारांना विषय देण्यात यावे असे कळविले आहे.

**अ) हेमंत वाणी,शिर्डी**

१. खंडोबाच्या देवळात आगमन
२. भिक्षा मागतांना
३. घागरीतून लेंडीबागेस पाणी घालतांना
४. विरभद्राप्पा (बेडूक-साप ) अ. ४७/७०
५. सप्तश्रृंगी देवीचे दर्शन अ. ३०
६. व्दारकामाईत वाघाचे निर्वाण अ. ३१/१४०

**ब) सुनिल शेगावकर, पुणे**

१.पाण्याचे दिवे पेटवले
२. आंगठ्यातून गंगा यमुना (अ.२२/२०)
३. बाबा वादळ शांत करताना (अ. ११/१४४)
४. वाड्याचे निरीक्षण करतांना
५. विष्णु सहस्त्र नामाची पोथी
६. चंदनाचा त्रिपुंड (अ. ११/५१)

**क) श्री. व्ही.व्ही. सपार, सोलापूर**

१. चांदभाईची घोडी
२.लाकडी फळीवर झोपतांना (अ.१० व ४५)
३. अन्नदान
४. दासगणूंचे कीर्तन
५. चावडीचा उत्सव (अ. ३७/१२०)
६. महामारीची साथ व निवारण

तसेच श्री गोरक्षकर, यांनी या व्यतिरिक्त खालील १५ विषय दिलेले आहेत

१. महामारीची साथ - दळण
२. धुनीचा पेट
३. भागोजी शिंदेला औषध लावतांना
४. बोकडाच्या मानेवर सुरी (अ. २३/१२८)
५. घोलपांच्या रुपाने मुळयांना दर्शन (अ.१२/८९)
६. चंदनाचा त्रिपुंड (अ.११/५१)
७. बाबा व गंगागीर बाबा भेट
८. गोपाळराव गुंड व रामनवमी जत्रा
९. राधाकृष्ण आई व काकड आरतीची सुरुवात
१०. दासगणुनां दिक्षीतांच्या घरच्या मोलकरणी दुने
११. कुत्र्याला अन्न (अ.९ वा/ १२०) अ.४२/१००
१२. व्दारकामाई - मिरीकर माधवराव - महती (अ.२२/४६)
१३. उदीचा महिमा (कोणते कथेत आहे घ्यावा ) अ.३३ / अ.१०/१५६
१४. श्री वासुदेवानंद सरस्वती कथा (अ.५१/१२५)
१५. बापूसाहेब बुटींचे स्वप्न वाडा बांधण्याबद्दल क. ३९

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गोरक्षकर यांनी नियोजित आर्ट गॅलरीसाठी पेंटींग्ज तयार करणेकामी वरीलप्रमाणे विषय सुचविले होते. याबाबत चर्चा केली असता श्री सुनिल शेगावकर यांनी ८'x५' साईजचे पेंटीग्जसाठी दिलेला रुपये ५०,०००.०० प्रति पेंटीग दर कमी स्वरुपाचा आहे. अशाप्रकारे ४० पेंटींग्ज तयार करुन घेणेकरीता एकूण रुपये २० लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. एकूण ४० पेंटींग्जपैकी २० पेंटींग्ज श्री शेगावकर यांचेकडून त्यांनी देऊ केलेल्या दरांमध्ये करुन घेण्यात यावेत. तसेच उर्वरित २० पेंटीग्जपैकी श्री सपार व श्री हेमंत वाणी यांचेकडून प्रत्येकी १० पेंटींग्ज, श्री शेगांवकर यांनी देऊ केलेल्या ८'x५' साईज व दरात तयार करुन घ्यावेत. याकामी विषयांची निवड करणे व तयार करण्यात येणाऱ्या

पेंटींग्जची तपासणी श्री.गोरक्षकर यांचेकडून करुन घेण्यात यावी व याकामी त्यांना योग्य ते मानधन देण्यात यावे,असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१६. द्वारकामाईचे दक्षिण बाजूकडील नाट्यगृहाचे जागेवर व चावडीचे पूर्व बाजूस शिल्प उभारणेबाबत.**

**निर्णय क्र. १२०.** शिरडी शहरातील रथ-पालखी रस्ताचे संपादीत क्षेत्रातील बांधकामे तसेच अतिक्रमणे काढण्याची कारवाई शासनातर्फे मे,२००४ मध्ये करण्यात आली. त्यावेळी चावडीचे लगत पूर्व बाजुकडील अतिक्रमणेही काढण्यात आली. ही मोकळी झालेली जागा चावडीचे लगत पूर्व बाजूस मोक्याचे ठिकाणी आहे. या जागेवर सुशोभिकरणाचे दृष्टीने काय विकास करता येईल, यासंबंधी श्री.प्रमोद कांबळे, अहमदनगर यांनी सदर जागेची पहाणी केली. त्यानंतर या जागेवर करणेसाठी शिल्पाचे संकल्पित रेखाचित्र त्यांनी दिले आहे.

दिनांक १९/१०/२००४ रोजी मा.कार्यकारी अधिकारी व मा.व्यवस्थापन समिती सदस्यांनी श्री.प्रमोद काबंळे यांचे अहमदनगर येथिल आर्ट स्टुडीओला भेट दिली व तेथिल कलाकृतींची पहाणी केली. त्यावेळी चावडीजवळील व द्वारकामाई जवळील प्रस्तावित शिल्पाचे संकल्पनेबाबतही चर्चा करणेत आली. या शिल्पात निरनिराळ्या धर्माची, पंथाची व्यक्तिरेखा त्यांच्या प्रार्थनापद्धतीप्रमाणे प्रार्थना करताना दाखविल्या आहेत. तसेच धबधबा व प्रकाशयोजनेचा समावेश केलेला आहे.

दिनांक १२/११/२००४ चे पत्राद्वारे श्री.प्रमोद कांबळे यांनी चावडीजवळील शिल्पाचे रु. २७,७०,०००/- व द्वारकामाई जवळील शिल्पाचे रु. २३,१५,०००/- चे कोटेशन सादर केले होते.

बांधकाम, शिल्पकाम, प्लंबिंगचे काम व लाईट फिटींग ही कामे एकमेकांना पूरक व एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यामुळे बांधकाम,प्लंबिंग,लाईट फिटींग या कामांनासुद्धा त्यांच्या मार्गदर्शनाची गरज आहे. उभारणी करताना आवश्यक असल्यास कामात कोणते बदल करावयाचे याचे निर्णय त्यांना ऐनवेळी कामाचे ठिकाणी घ्यावे लागणार आहेत. शिल्पाचा हवा असलेला अचूक परिणाम साधण्यासाठी या शिल्पाची सर्व उभारणी त्यांचे मार्गदर्शनाखाली टीमवर्क पद्धतीने होणार आहे. म्हणून या सर्व कामांचे एकत्रित कोटेशन दिले असल्याचे श्री.प्रमोद कांबळे यांनी त्यांचे उपरोक्त पत्रात नमूद केले असल्याचे कळविले होते. या शिल्पासाठी करावयाच्या बांधकाम, प्लंबिंग, लाईट फिटींग या कामांच्या कोटेशनमधिल रकमा त्यांचे डिटेल्स मिळाल्यानंतर तपासता येतील. शिल्पकाम हे कलाकुसरीचे काम असल्याने त्याची कोटेशनमधिल रक्कम ही समक्ष चर्चेद्वारे अथवा समान दर्जाच्या कलाकारांकडून तुलनात्मक कोटेशन्स मागवून ठरविता येईल.

याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७/११/२००४ चे सभेत सादर करण्यात आला होता. यावर चर्चा होउन आर्टिस्टश्री. प्रमोद कांबळे यांना आर्किटेक्टचे मदतीने सिव्हील वर्क, प्लंबींग, फाउटन, इलेक्ट्रीकल्स इ. कामचे वेगवेगळया भागात तपशिलवार माहिती व शिल्पाचे कामासाठी अपेक्षीत खर्चाचे विगतवारीसह चर्चेसाठी व्यवस्थापन समितीच्या सभेत बोलविण्यात यावे असे ठरले आहे.

दि.२४/०२/२००६ रोजी मा.जिल्हाधिकारी, मा.अध्यक्ष महोदय, समिती सदस्य श्री. कैलास कोते व डॉ.एकनाथ गोंदकर, आर्टिस्ट प्रमोद कांबळी यांचे उपस्थितीत चावडी व व्दारकामाई जवळ शिल्प उभारणेबाबत पहाणी व चर्चा झाली. त्यावेळेस असे ठरविण्यात आले की, श्री.कांबळी यांचेसह क्रिएटिव्ह आर्ट, पुणे आणि धनंजय आर्ट, बेंगलोर या दोन आर्टिस्ट कडूनही कोटेशन मागविण्यात यावीत व त्यांनी सादर केलेले दर कला संचनालय, मुंबई यांचेकडून तपासणी करुन काम करुन घेण्यात यावे, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१७. गुरुस्थान मंदिरासमोरील तळघराबाबत.**

**निर्णय क्र. १२१.** गुरुस्थान समोर २० मीटर x १२.८५ मीटर मोजमापाचे तळघर मंदीर परिसराचे नूतनीकरण व विकास कामे करताना सन १९९९ मध्ये बांधण्यात आले आहे. सदरच्या तळघराचा उपयोग मंदीराचे स्टोअरसाठी करण्यात येत आहे. दि. ११/०२/२००६ रोजी याबाबत मा.अध्यक्ष व समिती सदस्य मा.डॉ.गोंदकर यांचे समवेत चर्चा झाली आहे. सदरचे तळघर जमिनीपासून ६'-९" उंच आहे. सदरची उंची जमीन लेव्हल पर्यंत करुन साईभक्तांसाठी मोठी जागा उपलब्ध होउन दर्शनाला येणाऱ्या साईभक्तांची योग्य व पुरेशी व्यवस्था होईल. मंदीर परीसराचे आर्किटेक्ट माथुर ॲण्ड कापरे यांचे दि.२३/०२/२००६ रोजीचे भेटीत जागेची पहाणी करुन चर्चा केली. यासाठी आवश्यक सुधारीत प्रस्ताव त्यांचे मार्फत सादर करण्यात येत आहे.

तरी गुरुस्थान समोरील तळघराची उंची जमीन लेव्हल पर्यंत करणेस तत्वतः मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावावर चर्चा होऊन, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१८. बी.एस्.सी.नर्सिंगचे सरावासाठी प्रवरा इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, लोणी येथील विद्यार्थ्यांना श्रीसाईनाथ रुग्णालयात परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र. १२२.** श्री राजेंद्र विखे पाटील, विश्वस्त व सेक्रेटरी, कॉलेज ऑफ नर्सिंग, प्रवरा इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, यांनी No. PIMS:CON:06-8707, February 1,2006. रोजीचे पत्रान्वये, उपरोक्त संस्थेत प्रशिक्षण घेणा-या बी.एस्सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना श्री साईनाथ रुग्णालयात वर्षातून दोन महिने कालावधीकरिता सरावास परवानगी मिळणेबाबत कळविले आहे.

यापुर्वी संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्था,कोपरगांव, श्री विवेकानंद नर्सिंग होम ट्रस्ट, श्री शिवाजीनगर, राहुरी फॅक्टरी, महाराष्ट्र टेनिंग कमर्शियल इन्स्टीट्यूट, शिरडी या संस्थेमध्ये नर्सिंगचे प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार विनामोबदला श्रीसाईनाथ रुग्णालयात सरावासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. सदरचे संस्थेमधील प्रशिक्षणार्थ्यांची जाण्या - येण्याची व्यवस्था

संबंधित संस्थेमार्फत केली जाते. यास अनुसरुन उपरोक्त संस्थेत प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना श्री साईनाथ रुग्णालयात सरावासाठी विनामोबदला परवानगी देता येईल.

तरी कॉलेज ऑफ नर्सिंग, प्रवरा इन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स या संस्थेत प्रशिक्षण घेणा-या बी.एस्सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णालय विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या दृष्टीने सोईस्कर अशा वेळी वर्षातून दोन महिने कालावधीकरिता विनामोबदला सरावास परवानगी देणेस, मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.१९.** **श्री साईबाबा रुग्णालयातील सेंट्रल एअर कंडीशनिंग व फॉलसिलींगचे जादा कामाचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र. १२३.** अ) श्री साईबाबा रुग्णालयातील सेंट्रल एअर कंडीशनींगचे काम मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०५/२००५ निर्णय क्र. १८७ अन्वये एकूणरु. ४८,६३,६१७/- चे काम मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई या कंपनीस इकडील जा. क्र. ५०५७ दि. १३/०५/२००५ ने देण्यात आलेले आहे.

त्यानुसार मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांनी रुग्णालयात सेंट्रल एअर कंडीशनींगचे काम सुरु केलेले होते व ते काम आता अंतिम टप्प्यात आहे.

ब) तद्नंतर रुग्णालयातील दोन आय.सी.सी.यु., कॅथलॅब, वॉर्डमध्ये फॉल्स सिलींगचे काम मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांना मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/१०/२००५ निर्णय क्र. ५८७ अन्वये एकूण रु. ९,४५,०००/- चे काम देण्यात आलेले होते. ते देखील अंतिम टप्प्यात आहे.

क) वरील दोन्ही प्रकारची कामे चालू असताना वेळोवेळी दिलेल्या भेटीत मा. विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी साहेब यांनी खालीलप्रमाणे कामात सुधारणा/अतिरीक्त काम संस्थानचे बांधकाम व विद्युत अभियंता, वरिष्ठ प्रशासक यांचे समवेत मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांना करावयास सांगितले होते.

**<u>वाढीव कामासंबंधी विवरण खालीलप्रमाणे -</u>**

१) विदयुत विभाग - अ) जुने रुग्णालय येथे स्थलांतरीत होणार असे गृहीत धरुन Split A/C ची बाहेरची दोन युनीटे वापरण्यात येतील असे ऑर्डरमध्ये म्हटले होते, यासंबंधी विदयुत विभागाशी चर्चा केल्यानंतर आपले A/C Unit कामातून जातील व पुन्हा वापरता येणार नाहीत या दृष्टीने २ Units बसविण्यात यावेत असे सांगण्यात आले. यास मा. विश्वस्तांनी संमती दिली होती.

ब) केबल खरेदी व फॉल्स सिलींगमधील लाईट खरेदीबद्दल मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी व विदयुत अभियंता यांची चर्चा झाली होती. ही खरेदी मोठया रक्कमेची असल्यामुळे त्यासाठी बराच वेळ लागेल असे विदयुत अभियंता यांचे म्हणणे पडले. काम लवकर व्हावे या दृष्टीने ते मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांना करु दयावयाचे असे मा. विश्वस्तांनी विचारल्यावर त्यास होकार देण्यात आला. त्यानुसार मा. विश्वस्तांनी हे काम त्यांना करावयास सांगितले.

२) बांधकाम विभाग - मा. विश्वस्तांच्या भेटीच्या वेळी बांधकाम अभियंता यांना मा. विश्वस्तांनी Vinyl Flooring संबंधी व Cath Lab साठी Lead शीटचा पुरवठा करण्यासंबंधी आदेश दिले होते. त्या वेळीही बांधकाम अभियंत्यांच्या संमतीने हे काम मा. विश्वस्तांनी मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांना सांगितले होते. या संबंधीचे व्यवहार बांधकाम खात्याकडून अपेक्षित होते.

३) कार्डीयाक ओ.टी. व कॅथलॅब यांना जोडणाऱ्या पॅसेजमध्ये फॉल्स सिलींग आवश्यक आहे असे मा. विश्वस्तांनी मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांना सांगितले व ते वाढीव बीलात धरु व आपण ते करुन घ्यावे, असे आदेश दिले आहेत.

वरीलप्रमाणे अ.नं. १ ते ३ या अतिरीक्त कामासह मे. एअरबॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांनी एकूण रु. ८२,५३,१९४/- चे बील सादर केलेले आहे.

| | |
|---|---|
| १) पुरवठा आदेश क्र. ५०५७ दि. १३/०५/२००५ अन्वये सेंट्रल एअर कंडीशनींगचे काम | रु. ४८,६३,६१७.७५ |
| २) पुरवठा आदेश क्र. १२१८१ दि. २४/१०/२००५ अन्वये फॉल्स सिलिंगचे काम (७००० स्क्वेअर फुट) | रु. ९,४५,०००.०० |
| | रु. ५८,०८,६१७.७५ |
| सादर केलेल्या बीलांची रक्कम | रु. ८२,५३,१९४.०० |
| वजा कार्यादेशाप्रमाणे कामाची रक्कम | रु. ५८०८६१७.७५ |
| जादा कामाची रक्कम | रु. २४,४४,५७६.२५ |

वरीलप्रमाणे कार्यादेशातील काम व अतिरीक्त केलेले काम याकामी विद्युत व बांधकाम अभियंता व रुग्णालय बायोमेडीकल इंजिनीअर हे संपूर्णपणे झालेल्या कामाची सर्व तांत्रिक पडताळणी केलेनंतरच अतिरीक्त कामाची त्याप्रमाणे रक्कम त्यांना अदा करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, मे. एअर बॉर्न क्लीनलीनेस, मुंबई यांनी केलेल्या फॉल्स सिलींग व सेंट्रल एअर कंडिशनिंग व व्हिनायील फ्लोअरिंग या सर्व कामाचे तांत्रिक पडताळणी करुन केलेल्या कामाप्रमाणे जी काही देय रक्कम होईल, ती त्यांना अदा करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/वरिष्ठ प्रशासक रुग्णालये)

**विषय नं.२०. सेल काऊंटर मशिनसाठी लागणारे केमिकल्स खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. १२४.** श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नुकतेच नवीन PCE-२१० मॉडेलचे सेल काऊंटर दोन मशिन मे.ए.जी.डायग्नोस्टीक, हैद्राबाद, यांचेकडून खरेदी करण्यात आलेले आहे. सदर दोन मशिनची किमंत रु.९,५०,०००/-इतकी आहे. सदरचे मशिन घेऊन बसवून कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदर मशिनसाठी लागणाऱ्या केमीकल्सची दि.१२.०१.२००६ च्या पत्रान्वये प्रयोगशाळा विभागाने मागणी केलेली आहे. सदर केमीकल्स हे फक्त ज्या कंपनीचे मशिन आहे त्याच कंपनीचे वापरावे लागते दुसरे केमीकल्स चालत नाही. त्यामुळे पुरवठाधारकांकडूनच सदरचे केमीकल्स खरेदी करावे लागतील. त्यानुसार सदर पुरवठाधारकांशी केमीकल्सची विचारणा केली असता त्यांनी त्यांचे आपले भागातील अधिकृत विक्रेते मे. युनिव्हर्सल केमीकल्स, नाशिक यांच्याकडून केमीकल्स खरेदी करणेबाबत त्यांचे दि.१४.०१.२००६ चे पत्रान्वये सांगितले आहे.

त्यानुसार युनिव्हर्सल केमीकल्स,नाशिक यांचेकडून केमीकल्सच्या दरपत्रकांची मागणी केली असता त्यांनी दि.१७.०१.२००६ चे पत्रान्वये दरपत्रक पाठविले असून खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | केमीकल्सचे नांव | मागणी | प्रती नग | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | Autodil २० Ltr. | १२ | १६८८ | २०२५६.०० |
| २ | Autoclean २ Ltr. | ६ | ५७९ | ३४७४.०० |
| ३ | Autolyse ५००ml | ८ | २५४३ | २०३४४.०० |
| | | **एकूण किंमत रुपये-** | | **४४०७४.००** |

सदरचे केमीकल्स खरेदीसाठी अंदाजे रु.४४,०७४/- चा खर्च अपेक्षित आहे. सन २००६-०७ या आर्थिक वर्षात मागणी घेऊन वार्षिककेमीकल्स खरेदी करता येईल. ती केमीकल्स उपलब्ध होईपर्यंत मे.युनिव्हर्सल केमीकल्स,नाशिक, यांचेकडून वेळोवेळी अलाहिदा प्रस्ताव ठेऊन केमीकल्स खरेदी करावी लागणार आहे.

तरी सध्या वरीलप्रमाणे केमीकल्स खरेदीस व याकामी येणारे रु.४४,०७४/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, वार्षिक खरेदीमध्ये सदरच्या केमीकल्सची मागणी करण्यात येऊन ती उपलब्ध होईपर्यंत वरील दराने आवश्यक तितकेच केमीकल्स खरेदी करण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.२१. प्रयोगशाळा विभागाकरिता लागणारे मशिनरी/उपकरणे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १२५.** श्री साईनाथ रुग्णालयाच्या प्रयोगशाळा विभागात दैनंदिन तपासण्याकरीता खरेदी करावयाचे मशिनरी / उपकरणे इत्यादीसाठी अंदाजे रु. ३३,८०,०००/- चे खर्चास व खरेदीस मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/११/२००५ चे सभेत निर्णय क्रमांक ६६६ अन्वये मंजुरी मिळालेली होती.

त्यानुसार दि. १४/११/२००५ चे मंजुर टिपणीन्वये सदरचे खरेदीकामी सकाळ, लोकमत, लोकसत्ता, दैनिक सामना, टाईम्स ऑफ इंडिया व इंडियन एक्सप्रेस, मुंबई आवृत्तीमध्ये जाहीरात देण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ११/१२/२००५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे मुंबई व शिर्डी कार्यालय मिळून ३० निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यापैकी एकूण १४ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. मेडी स्पेस इन्स्टुमेंट इंडियालि. (मिल), मुंबई |
| ०२. | मे. बायो-रॅड लॅबोरॅटरीज, मुंबई |
| ०३. | मे. बायर हेल्थकेअर, बडौदा |
| ०४. | मे. आर्क डायग्नोस्टीक प्रा. लि., मुंबई |
| ०५. | मे. मोदी एंटरप्रायजेस इंडीया, मुंबई |
| ०६. | मे. युनीक डायग्नोस्टीक ॲन्ड सायंटीफिक, मुंबई |
| ०७. | मे. एजी डायग्नोस्टीक, मुंबई |
| ०८. | मे. सी. अभयकुमार ॲन्ड कं., मुंबई |
| ०९. | मे. जासबीन एंटरप्रायजेस, पुणे |

| | |
|---|---|
| १०. | मे. लिलॅक मेडीकेअर प्रा. लि., मुंबई |
| ११. | मे. जेएसपी सर्जिकल, नाशिक |
| १२. | मे. एस.एस.मार्केटींग, औरंगाबाद |
| १३. | मे. कनसेप्ट इंटीग्रेशन प्रा. पुणे |
| १४. | मे. युनीव्हर्सल केमीकल्स, नाशिक |

वरीलप्रमाणे एकूण१४ सिलबंद निविदा हया दि.२४.०१.२००६ चे मुंबई येथे झालेल्या वैद्यकीय उपसमितीच्या सभेपुढे समक्ष उघडुन घेण्यात आल्या होत्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून तो रुग्णालयातील पॅथोलॉजीस्ट डॉ.सौ.इरा भारद्वाज यांना दाखवण्यात आला आहे. त्यांनी प्राप्त झालेल्या निविदामधील दर व तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन काही मशिनरी / उपकरणांच्या बाबतीत निम्नतम दरांची शिफारस न करता तांत्रिक बाबींचा विचार करुन शिफारस केलेली आहे.

सोबतच्या तक्त्यातील अ.नं. १४ - Min Vidas या मशिनसाठी ज्या दोन निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत ते आपल्या मागणीनुसार नाहीत म्हणून ते घेण्याची शिफारस केलेली नाही.

अ.नं. १५ - HB Variant Analaysis System चे बाबतीत एकूण ३ निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत त्यामध्ये ज्या प्रकारच्या तपासणी ($HBA_1C$) आपण मागणी केली होती ती आलेली नाही . ती आपण सध्या नुकतेच प्राप्त झालेल्या मशिनवर देखील ( Biochemistry Autoanalyzer) करु शकतो. त्यामुळे त्यांनी अजून सुधारित मॉडेल घेण्याबाबतची शिफारस केलेली आहे. त्याची किमंत देखील प्राप्त झालेल्या दरांपेक्षा कमी आहे. (अंदाजे रु. ६ लाख)

म्हणजे अ.नं.१४ व १५ ही मशिन्स त्यांचे म्हणणेनुसार खरेदी करु नये, असे सुचविले आहे. तर अ.नं. १ ते १३ ही त्यांनी सुचविल्या प्रमाणे खरेदी करावीत. त्यांचे शिफारशीनुसार सदरचे खरेदीकामी रु.२०,०६,११०/- इतका खर्च येणार आहे.

वरील खरेदीकामी एकूण १४ निविदा सादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी आजचे सभेपुढे बोलविण्यात आले होते. त्यापैकी खालील १० निविदासादरकर्ते चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** |
|---|---|
| १ | मे. युनीव्हर्सल केमीकल्स, नाशिक |
| २ | मे. लिलॅक मेडीकेअर लि., मुंबई |
| ३ | मे. सी. अभयकुमार अॅन्ड कं., मुंबई |
| ४ | मे. आर्क डायग्नोस्टीक, मुंबई |
| ५ | मे. जे.एस.पी. सर्जिकल, नाशिक |
| ६ | मे. बायर डायग्नोस्टीक, ठाणे |
| ७ | मे. मेडीस्पेक इन्स्ट्रुमेंटस, मुंबई |
| ८ | मे. जसबीन एंटरप्रायजेस, मुंबई |
| ९ | मे. युनीक बायोसिस्टीम, मुंबई |
| १० | मे. बायो रेड लॅबोरेटरीज, मुंबई |

सदर निविदा सादरकर्त्यांबरोबर चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या व त्यांचेकडून बंद पाकीटात चर्चा/वाटाघाटीनंतरची सूट लेखी स्वरुपात घेण्यात आली. तज्ञांसमोर वाटाघाटी झाल्या त्यानुसार फेर तुलनात्मक तक्ता तयार करुन मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांना दाखवून त्यांचे शिफारसींनुसार निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**विषय नं.२२. सुपरस्पेशालिटी रुग्णालयासाठी मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १२६.** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे मशिनरी/उपकरणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या ६८ निविदाधारकांना दि.११/०२/२००६ रोजीच्या वैद्यकीय उपसमितीपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यापैकी ४८ निविदासादरकर्ते आजचे सभेपुढे उपस्थित होते. त्यामध्ये नेत्रशल्य चिकित्सा विभागाच्या मशिनरी, आर्थोपेडीक हत्यारे, इ.सी.जी. मशिन इत्यादीसाठी प्रत्येक निविदा सादरकर्त्यास सभेपुढे बोलवून प्रत्येक आयटमप्रमाणे चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या. परंतू वाटाघाटीच्या वस्तूची संख्या व पुरवठाधारकांची संख्या खुपच असल्याने नंतर सर्व निविदा सादर कर्त्यांना सभेपुढे एकत्रित बोलवून संस्थानचे धर्मदाय श्री साईबाबा रुग्णालयासाठी मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदी करण्याची असल्याने आपण दिलेल्या दरावर जी काही सूट द्यावयाची असेल ती बंद पाकिटात देण्यात यावी असे सांगण्यात आले. त्यानुसार ३३ निविदा सादर कर्त्यांनी बंद पाकिटात दर दिलेले आहेत. याशिवाय ७ निविदासादरकर्त्यांनी फॅक्सव्दारे पत्र पाठवून सूट कळवलेली आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे -

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **सूट** |
|---|---|---|
| १ | युनीव्हर्सल केमीकल्स, नाशिक | ६% |
| २ | अॅसे ऑफिस ऑटोमेशन, पुणे | ५% |
| ३ | विलास इलेक्ट्रानीक्स, नाशिक | आयटम्स प्रमाणे |
| ४ | सेन्चुरीयन मार्केटींग, अहमदनगर | आयटम्स प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ५ | स्वॅन इलेक्ट्रो मेक. सिस्टीम, नाशिक | २% |
| ६ | महेश सर्जिकल, पुणे | आयटम्स प्रमाणे |
| ७ | इनफ्रेस मेथोडेक्स, पुणे | १० % |
| ८ | कांचन ड्रग्ज, पुणे | आयटम्स प्रमाणे |
| ९ | जे.एस.पी. सर्जिकल, नाशिक | ५% |
| १० | राहुल एंटरप्रायजेस, नाशिक | २% |
| ११ | व्यंकटेश सर्व्हीसेस, औरंगाबाद | ९% |
| १२ | आर बी इलेक्ट्रॉनीक्स, अहमदनगर | आयटम्स प्रमाणे |
| १३ | लाईफकेअर डिव्हाइसेस, ठाणे | ५% |
| १४ | छाया ग्राफीक्स लि., बेंगलोर | ३% |
| १५ | इमरजन्ट, मुंबई | आयटम्स प्रमाणे |
| १६ | बायोमेडीकॉन, मुंबई | आयटम्स प्रमाणे |
| १७ | मेडीकेड सिस्टीम, चंदीगढ | २५% |
| १८ | ॲडव्हॉन्स मेडीकल,मुंबई | ५% |
| १९ | कालेलकर सर्जीकल,मुंबई | ५% |
| २० | इंटर कार्डीओ ,दिल्ली | आयटम्स प्रमाणे |
| २१ | पिक्स मेडीकल, मुंबई | आयटम्स प्रमाणे |
| २२ | सुपेरीयर इलेक्ट्रॉनीक्स, मुंबई | आयटम्स प्रमाणे |
| २३ | कॉसमॉस, मुंबई | ३% |
| २४ | लाईफ लाईन सिस्टीम, नवी दिल्ली | नाही. |
| २५ | ऑलम्पिक फार्मा, नवी दिल्ली | नाही. |
| २६ | कनसेप्ट इंटीग्रेशन, पुणे | आयटम्स प्रमाणे |
| २७ | वैभव एजन्सी, पुणे | ५% |
| २८ | चोक्सी एमॅजीनींग, मुंबई | आयटम्स प्रमाणे |
| २९ | बी.एल. लाईफ सायन्स,नवी दिल्ली | नाही. |
| ३० | बायोटेक, मुंबई | आयटम्स प्रमाणे |
| ३१ | एल ॲन्ड टी, पुणे | C Arm & ECG वगळुन १० % सूट |
| ३२ | संजय सायंटिफीक, मुंबई | ३% |
| ३३ | सर्जीडन्ट मेडीकेअर, पुणे | २२.५ % |
| ३४ | ट्रान्ससाशिया, मुंबई | १५% |
| ३५ | लाईफ साईट, अहमदाबाद | १४% पॅकेज |
| ३६ | रेकॉर्डर्स ॲण्ड मेडीकेअर, चंदीगड | आयटम्स प्रमाणे |
| ३७ | बायोमेड इंपोर्टस,मुंबई | आयटम्स प्रमाणे |
| ३८ | रजत सेल्स,मुंबई | नाही. |
| ३९ | विशाल सर्जीकल,मुंबई | ५% |
| ४० | बायोमेडीक्स,मुंबई | ५% |

वाटाघाटीनंतरची देऊ केलेली सूट विचारात घेऊन फेर तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे व तो सोबत सादर केला आहे. वरील सुटीमध्ये ऑपथलमॉलॉजी विभागातील मशिनरी / हत्यारे इत्यादीकरीता मे. लाईफ साईट, मुंबई यांनी जर संपुर्ण पॅकेज घेतले तर १४% सूट देऊ, असे सांगितले आहे.

ऑपथलमॉलॉजीमध्ये एकूण३० प्रकारच्या मशिनरी व हत्यारांची मागणी आहे. डॉ. नागेंद्र शहा, बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई, हे चर्चा / वाटाघाटीसाठीच्या वेळेस तज्ञ सल्लागार म्हणून उपस्थित होते. त्यांनी अ.नं. ९ - Computerised Tonometer व अ.नं १० - Clement Clarke Held Tonometer न घेण्याची शिफारस केलेली आहे. अ.नं. १८, २१ व हत्यारेमधील VI या तीनकरीता कोणाचीच शिफारस केलेली नाही. उर्वरीत २५ पैकी १७ मशिनरी / उपकरणे व ५ प्रकारच्या हत्यारांचा सेट अशी एकूण २२ आयटेमसाठी मे. लाईफ साईट यांची शिफारस केलेली आहे. फॅको इमलसी फिकेशन मशिनसाठी मे. अलकॉन लॅब, मुंबई यांची शिफारस केलेली आहे. तर सर्जिकल कॉटरीसाठी मे. इलाईट हेल्थकेअर, दिल्ली यांची शिफारस केलेली आहे.

सदर विषयावर निर्णय घेणेसाठी ०१) कमल नयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद,०२) निरामय रुग्णालय, पिंपरी चिंचवड,०३) रुबी हॉल क्लिनिक,पुणे, ०४) दीनानाथ मंगेशकर रुग्णालय,पुणे,०५) प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय,रुग्णालय लोणी, ०६) सहयाद्रि रुग्णालय,पुणे रुग्णालयाचे प्रमुखांना फॅक्स पत्र पाठवून त्यांचेकडील बायोमेडीकल इंजिनीअर्स तज्ञ सल्लागार म्हणून पाठवणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानुसार आजचे सभेपुढे खालील ०५ बायोमेडीकल इंजिनीअर्स यांना तज्ञ सल्लागार म्हणून बोलविण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती संगिता भालेराव - | निरामय हॉस्पिटल, चिंचवड-पुणे |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री. कौशल पाटील - | तज्ञ सल्लागार, मुंबई |
| ३. | श्री. नागेश उटेकर - | तज्ञ सल्लागार, मुंबई |
| ४. | श्री. शिवाजी कर्पे - | प्रवरा हॉस्पिटल, लोणी |
| ५. | श्री. संतोष इंगळे - | सहयाद्री हॉस्पिटल, पुणे |

तसेच मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी, मा. विश्वस्त कॅप्टन वासुदेवा व रुग्णालयाचा प्रकल्प अहवाल तयार करणारे डॉ. विनय कोठारी हे देखील उपस्थित होते. तज्ञ समवेत चर्चा करुन गट अ, ब व गट क मधील मशिनरी / हत्यारे / उपकरणे / सर्जिकल साहित्य खरेदीबाबत तज्ञांच्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात आला.

गट अ, ब व क मध्ये तज्ञांच्या शिफारसीनुसार निवडलेल्या मशिनरी / उपकरणे / हत्यारे / सर्जिकल साहित्य इत्यादीचा पुरवठा आदेशाची माहिती खालीलप्रमाणे - (सोबत परिशिष्ट म्हणून जोडलेले आहे)

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | पुरवठा आदेशाची रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | मनमन, पुणे | २००८०३.०० | आर्थोपेडीक हत्यारे |
| २ | सिन्थेसीस मेडीकल, नवी दिल्ली | २८६३०४२.६० | आर्थोपेडीक हत्यारे |
| ३ | सिमेन्स लि., मुंबई | १७०००००.०० | सी-आर्म मशिन |
| ४ | श्री आर्थोटुल्स, नाशिक | ४९५००.०० | आर्थोपेडीक हत्यारे |
| ५ | बायोमेडीकॉन, मुंबई | १२६७१७०.२५ | आर्थोस्कोप व नीडल बर्नर |
| ६ | बीएल लाईफसायंन्सेस, नवी दिल्ली | २५५६२५७.०० | कार्डीओ व्हॅसक्युलर हत्यारे/ मशिनरी इत्यादी |
| ७ | झेनीथ, मुंबई | १२८८९४५.०० | कार्डीओ व्हॅसक्युलर हत्यारे/ मशिनरी इत्यादी |
| ८ | कांचन ड्रग्ज, पुणे | ४२७४९.८० | कार्डीओ व्हॅसक्युलर हत्यारे/ मशिनरी इत्यादी |
| ९ | कालेलकर सर्जिकल, मुंबई | ४४५६९१.५५ | कार्डीओ व्हॅसक्युलर व ऑन्को सर्जरी हत्यारे/ मशिनरी इत्यादी |
| १० | लाईफ साईट, अहमदाबाद | १११११८०७.०० | ऑप्थलमोलॉजी हत्यारे / मशिनरी / उपकरणे |
| ११ | अलकॉन लॅब, मुंबई | २३०००००.०० | ऑप्थलमोलॉजी मशिनरी |
| १२ | इलाईट हेल्थकेअर, नवी दिल्ली | ६१११२८०.०० | ऑप्थलमोलॉजी क्वाटरी |
| १३ | देवी सर्जिकल, अहमदनगर | ८१७०००.०० | ई.सी.जी. मशिन |
| १४ | रेसकेअर मेडीसीस, मुंबई | ८३२०००.०० | बायपॅप मशिन |
| १५ | संजय मेडीकल, पुणे | १३२१८१.०० | फेम्युगेशन मशिन / सर्जिकल |
| १६ | अेस ऑफीस ऑटोमेशन, पुणे | ४५४१०६.५० | झेरॉक्स / फॅक्स / एलसीडी |
| १७ | महेश सर्जिकल, पुणे | ५३८.४० | सर्जिकल साहित्य |
| १८ | लाईफलाईन सिस्टीम, नवी दिल्ली | ७३०४.०० | सर्जिकल साहित्य |
| १९ | कॉसमॉस एंटरप्रायजेस, मुंबई | १५१३.०० | सर्जिकल साहित्य |
| २० | आनंद मार्केटींग, डोबिंवली | २४३३६.०० | सर्जिकल साहित्य |
| २१ | राहुल एंटरप्रायजेस, नाशिक | ३७६३४.०० | सर्जिकल साहित्य |
| | **एकुण-** | **२६७४३८५९.१०** | |

वरील पुरवठयामध्ये मे. लाईफ साईट, अहमदाबाद यांचे ज्या मशिनरी आयात करावयाच्या आहे त्यासाठी कस्टम डयुटी, क्लीयरन्स चार्जेस, विक्री कर इत्यादी वेगळे अदा करण्यात येऊन त्यांनी मागणी केल्यास त्यांचे पेमेंट हे लेटर ऑफ क्रेडीटच्या व्दारे करण्यात यावे.

कार्डियाक मॉनिटर्स ४ नगाची आपण मागणी केलेली आहे. यासाठी एकुण ६ निविदाधारकांनी आपले दर दिलेले आहेत. यावर चर्चा होऊन यापूर्वी आपण फिलीप्स कंपनीकडून १२ मॉनिटर्स आय.सी.सी.यू साठी खरेदी केलेले आहेत. त्याच मंजूर दराने फिलीप्स कंपनीस ४ नगाचा पूरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

याशिवाय सदरचे खरेदीपैकी फिजीओथेरपी, न्युरोलॉजी, पॅथोलॉजी मधील मशिनरी / उपकरणे, पेसमेकर, नेबुलायझर मशिन इत्यादी खरेदीबाबत आजचे सभेत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. सदर साहित्य आवश्यकतेनुसार नंतर तज्ञ डॉक्टरांचे सल्ल्यानुसार खरेदी करण्यात यावे. आपण डिजीटल रेडीओग्राफी मशिन खरेदी करत असल्यामुळे मागणीप्रमाणे ऑटोप्रोसेसर मशिन खरेदी करण्यात येऊ नये. रेडीओलॉजी विभागासाठी त्याची आवश्यकता नाही, असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**विषय नं.२३. मशिनरी/उपकरणे हत्यारे खरेदीबाबत तज्ञ समितीसमवेत चर्चा करुन खरेदीबाबत निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. १२७.** संस्थानचे नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे उभारणीचे काम चालू आहे. त्यासाठी विविध प्रकारची उपकरणे, मशिनरी,फर्निचर इ.ची खरेदी करणेत आलेली असून काही बाबतीत कार्यवाही चालू आहे. त्याबाबत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी दिनांक २६.१.२००६ चे पत्रान्वये श्रीसाईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे विविध प्रकारच्या मशिनरी,उपकरणे,हत्यारे खरेदीबाबत खालीलप्रमाणे कळविलेले आहेत.

श्रीसाईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता विविध प्रकारच्या मशिनरी/उपकरणे/हत्यारे इत्यादी खरेदीबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सध्या खरेदीचे काम मोठ्या प्रमाणावर चालू आहे. परंतू सदरच्या खरेदीपूर्वी इतक्या महागड्या मशिनरी आपणास आवश्यक आहेत का? त्या खरेदी करण्यासाठी ज्या निविदा येतात, त्यांचे दर इतर निविदाधारकांपेक्षा वाजवी आहेत का? सदर मशिनरी चालविणेसाठी तज्ञ डॉक्टर्स व कर्मचारी वर्ग उपलब्ध होणार आहे का? खरेदी केल्यानंतर त्यांचे वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी किती खर्च येईल? कारण आपण ना नफा ना तोटा या तत्वावर रुग्णालय चालविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे येणाऱ्या खर्चाची मागणी ही त्या रुग्णावर होणार आहे. खरेदी होत असलेल्या मशिनरी बाबत इतर नामांकित रुग्णालयातील त्या त्या विभागातील तज्ञांचा अभिप्राय घेणे आवश्यक वाटते. डॉ.कोठारी यांनी दिलेल्या प्रोजेक्ट रिपोर्टनुसार आपले रुग्णालयाबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. इत्यादी सर्व गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे.

ज्या मशिनरी आपण खरेदी करीत आहोत त्यासाठी इतर नामांकित रुग्णालयातील (बॉम्बे हॉस्पिटल वगळता) ४ ते ५ तज्ञ डॉक्टरांची समिती तयार करण्यात यावी व चर्चा/वाटाघाटीच्या वेळेस या समितीतील सदस्यांना बोलविण्यात यावे व या सर्वांच्या सल्ल्यानुसार योग्य अशा मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदी करण्यात यावीत जेणेकरुन भविष्यात व्यवस्थापन समितीची बदनामी व संस्थानचे आर्थिक नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद मुद्यांचा विचार करता यापूर्वी काही खरेदी झालेली असून सध्या काही मशिनरी, उपकरणे व हत्यारे खरेदीकामी कार्यवाही चालू आहे. तसेच भविष्यातही मशिनरी,उपकरणे,हत्यारे खरेदी करावी लागतील. याकरिता समिती नियुक्त करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालील रुग्णालयाचे एक-एक तांत्रिक प्रतिनिधी तसेच डॉ.विनय कोठारी, सल्लागार यांनी सुचविलेल्या तज्ञांचा या समितीमध्ये समावेश करण्यात यावा, असें ठरलें.

०१. कमल नयन बजाज रुग्णालय, औरंगाबाद
०२. निरामय रुग्णालय, पिंपरी चिंचवड
०३. रुबी हॉल क्लिनिक,पुणे
०४. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय,पुणे
०५. प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय,रुग्णालय लोणी
०६. सहयाद्रि रुग्णालय,पुणे (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.२४. पोर्टेबल व्हेंटीलेटर खरेदीबाबत**

**निर्णय क्र. १२८.** श्री साईबाबा रुग्णालयात आय.सी.सी.यु.,ऑपरेशन थिएटर्स करीता एकाच ठिकाणी ठेवावयाची वेगवेगळी व्हेन्टीलेटर्स आपण खरेदी केलेली आहे. तथापि,त्याच्या जोडीस अजून दोन पोर्टेबल (फिरते) व्हेन्टीलेटर्स असणे गरजेचे आहे जेणेकरुन ती तातडीच्या उपचाराने शस्त्रक्रियेच्या ठिकाणी वापरता येऊ शकेल. मे. बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा.लि., मुंबई यांनी मॉडेल नाईट स्टार ३३० या व्हेन्टीलेटरचे कोटेशन मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचेकडे दिलेले आहे. सदर व्हेन्टीलेटर्स हे पोर्टेबल असून त्याचा वापर जेथे आवश्यक असेल तेथे करता येऊ शकतो तसेच इतर व्हेन्टीलेटर्स प्रमाणे या मशिनवर ट्युबींगचा वापर करावा लागत नाही.

त्यामुळे घशाचा त्रास असलेल्या रुग्णास याचा जास्त फायदा होऊ शकतो. तसेच सदरचे व्हेन्टीलेटर्स हे फिजीओ थेरपीसाठी सुध्दा वापरता येतील.

मे. बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा.लि., मुंबई यांनी त्यांचे दि.०७.१२.२००५ च्या कोटेशन अन्वये एका मशिनची किंमत रु.१,२०,०००/- इतकी कळवली असून त्यावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी ५ टक्के अजून सूट वजा करुन दोन मशिन घेण्याची शिफारस केलेली आहे. ५ टक्के सूट वजा जाता एक मशिनची किंमत रु.१,१४,०००/- इतकी होते.त्याप्रमाणे दोन मशिनसाठी रु.२,२८,०००/- इतका खर्च येईल.

मे. बायोमेडीकॉन सिस्टीम,मुंबई यांचे दरांशी तुलना करणेसाठी इतर पुरवठा धारकांकडून फॅक्स व्दारे दर मागविले आहेत ते खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | संख्या | मॉडेल | दर प्रती नग | एकूण किमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | बायोमेडीकॉन सिस्टीम प्रा.लि., मुंबई | २ | Model -Night Star 330 | **१,१४,०००.००** | **२,२८,०००.००** |
| २ | हॉस्पिटेक, मुंबई | २ | Model 201AB | ७,५०,०००.०० | १५,००,०००.०० |
| ३ | नोव्हा मेडीकल सिस्टीम, मुंबई | २ | Model Part II STA | २,७५,०००.०० | ५,५०,०००.०० |
| | | २ | Model Part III STA | ३,३०,०००.०० | ६,६०,०००.०० |

वरील दरांशी तुलना करता मे. बायोमेडीकॉन, मुंबई यांचे दर कमी आहेत.

यावर चर्चा होऊन, मे. बायोमेडीकॉन सिस्टीम, मुंबई यांचेकडून ०२ पोर्टेबल व्हेन्टीलेटर्स रु. १,१४,०००/- प्रती नग या दराने खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.२५.** **ट्रान्सड्युसर खरेदीबाबत**

**निर्णय क्र. १२९.** श्री साईबाबा रुग्णालयात नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमध्ये नवीन मल्टीपॅरामीटर मॉनीटर घेण्यात आलेले आहे. सदर मॉनीटरला लावणेसाठी वरील ट्रान्सडयुसरची आवश्यकता असते. याकामी मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांनी मुंबई येथील मे. लाईफ केअर डिव्हाइसेस प्रा. लि. मुंबई यांचे दोन प्रकारच्या ट्रान्सडयुसरचे प्रत्येकी २० नगाचे कोटेशन घेतलेले आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Cat.No. | Description | Qty. | Rate per no. Inclusive of all Taxes in Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| | | **Products of Smiths Medex Medical - UK** | | | |
| 1 | MX9605 | LogiCal Transducer Single Pressure Monitoring Kit | 20 | 715.50 | 14310.00 |
| 2 | MX9622 | LogiCal Transducer Double Pressure Monitoring Kit | 20 | 1500.18 | 30003.75 |
| | | | **Total Amt. in Rs.** | | **44313.75** |

सदरचे कोटेशन हे दि. ०७/१२/२००५ चे मुंबई भेटीच्या वेळेस डॉ. तिवारी यांनी समक्ष दिले असून वरीलप्रमाणे प्रत्येकी २० नग खरेदी करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. २० नगांसाठी रु. ४४,३१३.७५ इतका खर्च सर्व करांसहित येणार आहे. आपल्याकडे मे. लाईफ केअर डिव्हाइसेस प्रा. लि. मुंबई या कंपनीचे व्हेन्टीलेटर असल्याने त्यासाठी त्याच कंपनीचे ट्रान्सडयुसर वापरावे लागतील. त्यामुळे वरील ट्रान्सडयुसर मे. लाईफ केअर डिव्हाइसेस यांचेकडूनच खरेदी करावे लागतील.

तरी सदरचे ट्रान्सड्युसर मे. लाईफ केअर डिव्हाइसेस प्रा. लि. मुंबई यांचेकडून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, वरील मागणी केलेली ट्रान्सडयुर्स मे. लाईफ केअर डिव्हाईसेस प्रा. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.२६.** **इ.एन.टी.इन्स्टुमेंट (मायक्रो डेब्राईटर) खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १३०.** श्री साईनाथ रुग्णालयातील इ.एन.टी. सर्जन डॉ. आर. के. कुलकर्णी यांनी त्यांना दैनंदिन शस्त्रक्रियासाठी लागणाऱ्या इन्स्टुमेंटची दि.२४.०८.२००५चे पत्रान्वये मागणी केलेली आहे. सदर इन्स्टुमेंट ही जर्मनी स्थित कंपनीची असून त्यांचे खरेदीकामी अंदाजे किती खर्च येइल याकामी सदरची इन्स्टुमेंटचे भारतातील अधिकृत विक्रेते मे.चिमको बायोमेडीकल इंजिनिअर कंपनी,मुंबई व सर्जीडेन्ट मेडीकेअर प्रा.लि.,पुणे यांचे कडून दर मागवण्यात आले होते.

मे.चिमको बायोमेडीकल ईंजिनिअर कंपनी,मुंबई हे जर्मनस्थित कार्ल स्टोअर्ज या कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. त्यांनी दिलेल्या दि.१४.१०.२००५ चे पत्रान्वये दिलेल्या कोटेशन नुसार अंदाजे १४ प्रकारच्या इन्स्टुमेंटसाठी रु.१३,९४,१९४/- इतका खर्च येणार आहे.

तर मे.सर्जीडेन्ट मेडीकेअर प्रा.लि.,पुणे यांनी दि.१०.१०.२००५ चे कोटेशननुसार एकूण ५ प्रकारच्या इन्स्टुमेंटचे दर दिलेले असून त्यांचे कोटेशन प्रमाणे एकूण खरेदीस रु.३,३०,०००/- इतका खर्च येणार आहे. त्याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | संख्या | दर प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.चिमको बायोमेडीकल इंजिनिअर कंपनी,मुंबई | १ | १३९४१९४.०० | १३९४१९४.०० |
| ०२ | मे.सर्जीडेन्ट मेडीकेअर प्रा.लि.,पुणे | १ | ३३०००००.०० | ३३०००००.०० |

डॉ.आर.के.कुलकर्णी इ.एन.टी.सर्जन यांनी वरील इन्स्टुमेंटच्या खरेदीबाबत कार्ल स्टोअर्ज कंपनीच्या इन्स्टुमेंट ही अती उच्च दर्जाचे असून त्यांचे आयुष्य भरपुर दिवस असते. सदर कंपनीचे इन्स्टुमेंटबाबतच्या वापराचा आपणास यापुर्वीचा अनुभव चांगला असून काम करण्यात अडचणी येत नाहीत.

मे.सर्जीडेन्ट कंपनी,पुणे यांचे इन्स्टुमेंट ही किमंतीच्या दृष्टीने योग्य व टिकाऊ पण आहेत. तसेच दर सुध्दा योग्य आहेत.

इ.एन.टी.सर्जन यांचे मते कार्ल स्टोअर्ज कंपनीची हत्यारे घेतल्यास ती शस्त्रक्रियेच्या दृष्टीने व्यवस्थित राहतील व काम करण्यास अडचणी देखील येणार नाहीत. तथापि,या खरेदी बाबत वरिष्ठांनी पुढील उचीत निर्णय घ्यावा असा अभिप्राय दिलेला असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, मे. कार्ल स्टोअर्ज कंपनीची हत्यारे ही तांत्रिक दृष्टया चांगल्या दर्जाची असल्यामुळे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.२७. कार्डीयाक कन्झुमेबल, सर्जीकल साहित्य व स्टेन्ट व्हाल्व इत्यादी खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. १३१.** श्री साईबाबा रुग्णालयात नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, कॅथलॅब थिएटर इत्यादी सुरु करावयाचे आहे. सदर ऑपरेशन थिएटरमध्ये ॲन्जीओप्लॅस्टी, बायपास इत्यादी प्रकारच्या मोठया शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या शस्त्रक्रियांसाठी लागणाऱ्या कॅथेटर, गाईडवायर, स्टेन्ट, हृदयाचा व्हॉल्व्ह इत्यादी खरेदी करावे लागणार आहेत. सदरची खरेदी आपण प्रथमच करत आहोत त्यामुळे याकामी मुंबई, पुणे येथील जे नामांकित विक्रेते / उत्पादक कंपन्या आहेत त्यांना विचारणा करुन त्यांचेकडे असलेल्या कॅथेटर, गाईडवायर इत्यादीचे दर मागवून घेतले आहेत. अशा एकूण ०९ विक्रेत्यांकडून दर मागविले आहेत व त्यांचा तुलनात्मक दरांचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदरचा तक्ता हा मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांना फॅक्सव्दारे पाठवून दाखवून त्यांचेकडून मान्य करुन घेतले आहेत.

मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांनी मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांचे दर जरी इतर विक्रेत्यापेक्षा थोडसे जास्त दिसत आले तरी त्यांचे मटेरीयल हे जॉन्सन ॲन्ड जॉन्सन, मुंबई या नामांकित कंपनीचे आहे. तेंव्हा त्यांनी ज्यांचे ज्यांचे दर दिलेले आहेत ते त्यांचेकडून खरेदी करावे. उर्वरीत साहित्य हे इतर कंपन्याकडून / विक्रेत्यांकडून निम्नत्तम दरांने खरेदी करावे, असे दूरध्वनीवरुन सांगितले आहे.

सदर तक्त्यामध्ये हृदयाचे व्हाल्व्ह व स्टेन्ट ( तक्त्यातील अ.नं. ३० ते ४१) महागडे असल्यामुळे ते आपणास consignment basis वर म्हणजे प्रत्येक साईजचे दोन नग पार्टी आपल्याकडे ठेवणार असून त्यातील जितके वापरले जातील त्याचेच बील मागवून त्यांना मंजुर दराने अदा करावयाचे आहे. सध्या आपण प्रत्येक साईजचे दोन व्हॉल्व्ह मागणी करणार आहोत व त्याचे बील वापरल्यानंतर अदा करणार आहोत तेंव्हा त्यांची रक्कम तुलनात्मक तक्त्यात हिशोबात धरलेली नाही. बाकी सर्व साहित्याकरीता रु.११,०१,७५८.५० इतका खर्च येणार आहे.

(१)सोबतच्या तक्त्यात मे. रेणुका सर्जिकल, औरंगाबाद यांनी (A) मधील अ.नं. १ ते १६ तर (B) मधील अ.नं. १ ते १४, १६, १७, १८, १९, ३३, ३४, ३८, ३९, ४०, ४१ इत्यादींचे दर दिलेले आहेत. तरी त्यांचा पुरवठा आदेश मे. रेणुका सर्जिकल यांना देण्यास

(२)(B) मधील अ.नं. १५, २१, २४, २६, २७, २८ हे मे. कॉसमॉस सर्जिकल यांचेकडून (B) मधील अ.नं. २२, २३, २५ हे मे. पिनॅकल, मुंबई यांचेकडून

(३)(B) मधील अ.नं. ३५, ३६ हे मे. टीटीके हेल्थकेअर, मुंबई यांचेकडून

(४)(B) मधील अ.नं. ३७ हे मे. सेंट ज्युड, मुंबई यांचेकडून

(५)(B) मधील अ.नं. २९ हे मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून

(६)(B) मधील अ.नं. २०, ३०, ३१, ३२ हे बॉस्टन सार्यटफीक, मुंबई यांचेकडून

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/१०/२००५ चे सभेत सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे औषधे खरेदीकामी रु. ५०,००,०००/- मंजुरी मिळालेली आहे तरतूद सदरची खरेदी करता येईल.

सदरची खरेदी ही रु.५,००,०००/- चे वरील असल्याने याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदी करावी लागणार आहे. तथापि,श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आपण लवकरच वर्तमान पत्रात जाहिरात देऊन औषधे खरेदी करणार आहोत तो पर्यंत श्री साईबाबा रुग्णालयाकरीता वरील प्रस्तावातील साहित्याची आवश्यकता भासलेस ती तातडीने वरील मंजूर दराने गरजेपुरतीच खरेदी करता येतील व वार्षिकखरेदी मध्ये वरील मागणीचा समावेश करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे मागणी केलेली सर्जिकल साहित्याची वार्षिक औषधे खरेदीमध्ये सर्व प्रकारची मागणी एक वर्षाकरीता व्यवस्थित तयार करुन वार्षिक औषधे खरेदीमध्ये समाविष्ट करण्यात यावी. तत्पुर्वी काही शस्त्रक्रिया/तपासण्या करावयाचे नियोजन झाल्यास तितकेच साहित्य वरील मंजुर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.२८. सुचर्स मटेरिअल खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १३२.** श्री साईबाबा रुग्णालयामध्ये लवकरच कार्डीओलॉजी विभाग सुरु करावयाचा असून तेथे होणाऱ्या कार्डीयाक शस्त्रक्रियेसाठी ऑपरेशनचा धागा ( सुचर्स) साधारणतः १० रुग्णांच्या हिशोबाने मागणी तयार केली असून त्यासाठी फॅक्सवर सेटीनिल, मुंबई , बी.ब्रॉन,लि., मुंबई , जॉन्सन ॲण्ड जॉन्सन, मुंबई व ओम साई सर्जीकल, मुंबई या पुरवठाधारकांकडून हॉस्पिटलचे दराचे पत्रक मागवले असून त्याप्रमाणे तुलनात्मक दरांचा तक्ता सोबत सादर केला आहे.

त्यामध्ये एकूण ३० प्रकारच्या सुचर्सची मागणी केलेली असून अ.नं.१ ते २२ करीता मे. सेन्टीनिल लि., मुंबई यांचे दर निम्नतम आहेत. अ.नं. २३ ते २४ व २९ करीता मे. ओम साई सर्जिकल, मुंबई यांचे एकमेव दर प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे दरांची शिफारस करण्यात आलेली आहे. अ.नं.२५ ते २७ करीता दोघांचे दर प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये जॉन्सन ॲण्ड जॉन्सन , मुंबई यांचे दर निम्नतम आहेत. तेथे त्यांची शिफारस केली आहे. अ.नं.३० करीता मे.ओम साई सर्जीकल व बी.ब्रॉन लि.,मुंबई या दोघांचे

दर प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये बी.ब्रॉन लि., मुंबई यांचे निम्नतम दरांची शिफारस केलेली आहे. अ.नं.२८ करीता कोणाचेच दर प्राप्त झालेले नाहीत, ते बाजारात चौकशी करुन खरेदी करता येईल.

सदर खरेदीकामी रु.२,१७,४६३/- इतका खर्च येणार आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०२.१०.२००५ रोजीच्या सभेत नवीन साईबाबा रुग्णालयाकरीता औषधे खरेदीकामी रु. ५० लाख इतक्या खर्चाची तरतूद केलेली आहे. सदर रकमेतून सदर खर्चाची तरतुद करता येईल.

येत्या एक दोन महिन्यामध्ये आपण श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक औषधे व सर्जीकल साहित्य इत्यादी खरेदी करणार आहोत. त्यामध्ये सदरील सुचर्स खरेदी करता येतील. तो माल उपलब्ध होईपर्यंत आवश्यतेनुसार सुचर्स मटेरीयल खरेदी करता येईल तरी या तातडीच्या खरेदीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, मागणी केलेल्या सुचर्सपैकी मे. जॉन्सन अॅन्ड जॉन्सन लि., मुंबई या कंपनीचे व बी.ब्रॉन, मुंबई यांचेकडून प्रत्येकी निम्मी-निम्मी खरेदी तूर्तास करण्यात यावी व वार्षिक खरेदीमध्ये सर्व प्रकारच्या सुचर्सची एक वर्ष पुरु शकेल इतकी मागणी करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.२९. कार्डीयाक कन्झुमेबल व सर्जीकल साहित्य खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १३३.** श्री साईबाबा रुग्णालयात नवीन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, कॅथलॅब थिएटर इत्यादी सुरु करावयाचे आहे. सदर ऑपरेशन थिएटरमध्ये अॅन्जीओप्लॅस्टी, बायपास इत्यादी प्रकारच्या मोठया शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

सदर शस्त्रक्रिया विभागासाठी सोबतच्या यादीत नमूद केल्याप्रमाणे कन्झुमेबल / सर्जिकल साहित्य खरेदी करावे लागणार आहे. सदरचे साहित्य आपण प्रथमच खरेदी करत असल्यामुळे याकामी मुंबई, पुणे येथील नामांकित विक्रेते /उत्पादक कंपन्या आहेत त्यांचेकडून फॅक्सवर दरपत्रक व साहित्याची माहिती मागवून अंतिम यादी तयार करण्यात आली आहे.

सदरची यादी तयार करताना अंदाजे १०० रुग्णांचे शस्त्रक्रियांसाठी साहित्य पुरु शकेल इतकी मागणी केलेली आहे. त्यानंतर जशा- जशा शस्त्रक्रिया होतील व साहित्य कमी पडले तर मंजुर दराने त्याच मंजुर निविदाधारकांकडून मागणी करता येईल. सदरचे साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. ३५,१९,१२३.८१ इतका खर्च अपेक्षित आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/१०/२००५ सभेतील निर्णय क्रमांक ६१४ अन्वये औषधे खरेदीकामी रु. ५०,००,०००/- चे खर्चास मंजुरी मिळालेली आहे. त्यातून सदर खर्चाची तरतूद करता येईल. मा. व्यवस्थापन समिती सभेत मंजुरी मिळाल्यानंतर सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने करता येईल.

सदरची खरेदी ही रु.५,००,०००/- चे वरील असल्याने याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदी करावी लागणार आहे. तथापि, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आपण लवकरच वर्तमान पत्रात जाहिरात देऊन औषधे खरेदी करणार आहोत तो पर्यंत श्री साईबाबा रुग्णालयाकरीता वरील प्रस्तावातील साहित्याची आवश्यकता भासलेस ती तातडीने गरजेपुरतीच खरेदी करता येतील व वार्षिक खरेदी मध्ये वरील मागणीचा समावेश करता येईल. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे मागणी केलेली सर्जिकल साहित्याची वार्षिक औषधे खरेदीमध्ये सर्व प्रकारची मागणी एक वर्षाकरीता व्यवस्थित तयार करुन त्यामध्ये खरेदी करण्यात यावी. तत्पुर्वी काही शस्त्रक्रिया/तपासण्या करावयाचे नियोजन झाल्यास तितकेच साहित्य आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.३०. डिजीटल रेडीओग्राफी प्रोसेसींग युनीट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १३४.** श्री साईबाबा रुग्णालयात सध्या एक सिमेन्स कंपनीचे नवीन ५०० मि.अे. चे क्ष-किरण मशिन आहे. त्यासाठी आपणास वेगळे केमीकल्स, स्क्रिन कॅसेट, अॅटोप्रोसेसर मशिन इत्यादीवर खुपच खर्च होतो. सध्या बाजारात वरील प्रकारचे नवीन युनीट उपलब्ध आहे. ते जर आपण खरेदी केले तर त्याचा खालीलप्रमाणे संस्थान व रुग्णालयाला फायदा होईल.

०१) रुग्णांच्या क्ष-किरणची क्वालिटी चांगली येते.
०२) एकाच फिल्मवर तीन ते चार प्रकारच्या प्रिंट येतात त्यामुळे फिल्म्स खरेदीवरील खर्च कमी होतो.
०३) ऑटोमॅटीक तंत्र असल्यामुळे वेळेची बचत होते व प्रिंट साठवून (save) जेंव्हा लागेल तेंव्हा काढता येते.
०४) क्ष-किरण तंत्रज्ञांना मशिन हाताळण्यास खूप सोपे आहे.
०५) चांगल्या प्रकारचे प्रिंट (Immage Quality) आल्यामुळे निदान अचुक होते.
०६) वापरण्यासाठी जागा कमी लागते.
०७) क्ष-किरण विभागाची कार्यक्षमता वाढवता येते.

वरील सर्व बाबींचा विचार करता सुपर स्पेशालिटी रुग्णालयास एक युनीट असणे उपयुक्त राहील असे वाटते.

सध्या आपणाकडे कोडॅक (इं) प्रा.लि.,पुणे यांनी त्यांच्या कंपनीचे मशिनचे स्पेसीफिकेशन व दरपत्रक पाठविले आहे. त्यात त्यांनी एका युनीटची किंमत रु.४५,००,०००/- (अक्षरी रु. पंचेचाळीस लाख मात्र) इतकी कळवली आहे. मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांनी त्यांचेशी वाटाघाटी करुन सदरचे युनीटची ३० लाखापर्यंत किंमत कमी केलेली आहे. मुंबई येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभा दि. २४/०१/२००६ रोजी मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांनी वरील युनीट घेण्याबाबत सुचविलेले आहे. सदर मशिनच्या कोडॅक कंपनीच्या व्यतिरीक्त खालील कंपन्या आहेत.

०१. अगफा कंपनी, अंदाजे किंमत - रु. २५ लाख

०२. फ्युजी कंपनी, अंदाजे किंमत - रु. २० लाख

०३. लेजर कंपनी, अंदाजे किंमत - रु. २० लाख

डॉ. कोठारी यांनी दिलेल्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये रेडीओलॉजी विभागासाठी १००० MA X-ray Machine with Immage Intensifiar अशा मशिनची शिफारस केलेली आहे व त्यासाठी अंदाजे रु. २४ लाख इतकी रक्कम प्रस्तावीत केली आहे. त्याऐवजी वरील युनीट खरेदी करता येऊ शकेल. मशिनची किंमत रु. ५ लाखापेक्षा जास्त असल्यामुळे संस्थानला प्रचलित पध्दतीनुसार यासाठी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागवाव्या लागणार आहेत. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत देणगी देऊ इच्छिणारे साईभक्त श्री. रुईया यांचेतर्फे सदरचे युनिट घेण्याचे नियोजन आहे ते अंदाजे रु. २०,००,०००/- देणार असून उर्वरीत रक्कम संस्थानने दयावी, असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.३१. हिमोडायनॅमिक रेकॉर्डींग सिस्टीम खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १३५.** श्री साईबाबा रुग्णालयात मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०७.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३३२ (३) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाकरीता मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून कॅथलॅब मशिन रु.२,९५,००,०००/- इतक्या रुपयाचे खरेदी करण्यात आलेले आहे. सदर किंमती व्यतिरिक्त मे.सिमेन्स लि. यांनी वरील सिस्टिमचे दर रु. १८,००,०००/- इतके व्यवस्थापन समिती सभेपुढे सांगितले होते. त्यावेळेस चर्चा/ वाटाघाटी होऊन सदर सिस्टीमची किंमत रु.१५,००,०००/- निश्चित करण्यात आली होती. तथापि, सदर सिस्टीमची सध्या आवश्यकता नसल्यामुळे खरेदी करण्यात येऊ नये असे ठरले होते. त्यामुळे त्याचा पुरवठा आदेश देण्यात आला नव्हता.

मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी सदर सिस्टीम आपणांस खरेदी करणे आवश्यक आहे असे दि.१४.०२.२००६ चे फॅक्स पत्रान्वये कळविले आहे. तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, कॅथलॅब मशिन मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून खरेदी केलेले आहे. सदर मशिनसाठी वरील पार्टची आवश्यकता असल्याने यापुर्वीचे सभेत झालेल्या चर्चा/वाटाघाटीनुसार रु. १५,००,०००/- या किंमतीत मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.३२. श्री साईबाबा रुग्णालयासाठी सोलापूर चादरी खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १३६.** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा रुग्णालय नव्याने सुरु करण्यात येत आहे. सदर रुग्णालयासाठी आवश्यक असणारे, बेड, गादया इत्यादी मटेरीयल नव्याने खरेदी केलेले आहेत.

रुग्णालयातील पेशंटकरीता चादर खरेदी केलेल्या नाहीत. संस्थानचे खरेदी विभागातर्फे चौकशी विभाग व नवीन भक्तनिवासस्थान यांचेकरीता सोलापूर टेक्सटाईल, सोलापूर यांचेकडून सोलापूर चादर पूजा व वसुंधरा ब्रॅन्ड साईज 60" X 90" प्रत्येकी रु. १९६/- या दराने खरेदी केलेल्या आहेत. त्याच दराने रुग्णालयाकरीता ५०० नग सोलापूर चादरी सोलापूर टेक्सटाईल, सोलापूर यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारे रु. ९८,०००/- या व्यतिरिक्त वाहतूक भाडे संस्थानला वेगळे अदा करावे लागणार आहे. तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३३ . श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी तयार करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र. १३७.** "श्रीसाई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार, व्ही.सी.डी. "५०,००० संच (२सी.डी.चा १ संच) तयार करणेसाठी अंदाजे दर रुपये २५/- प्रमाणे येणारे अंदाजे रुपये १२,५०,०००/- मात्र खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ रोजीचे सभेतील विषय नं. ३६ निर्णय क्रमांक ५१२ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात २५,००० संच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.१०.२००५ रोजीचे सभेतील

विषय नं. १४ निर्णय क्रमांक ५९२ नुसार मे. ऑडिओ व्हीजन, मुंबई यांचेकडून २५,००० संच निम्नतम दर रुपये २३.१४ पैसे प्रमाणे तयार करुन साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. "श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार, व्हीं.सी.डी. " ५०,००० संच (२ सी.डी. चा १ संच) संचापैकी उर्वरीत २५,००० संच तयार करणेकामी मुंबई येथील खालील नामांकित सी.डी. निर्मात्यांना जा.न.एसएसएस/वशी / प्रकाशने/६५७/ २००६ दि.१७.०१.२००५ अन्वये कोटेशन्स पाठविण्यात आली होती. सदरचे कोटेशन्स भरून ते दि. ३१.०१.२००५ अखेर दाखल करण्याविषयी कळविण्यात आले आहे.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01. | M/s.A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai |
| 02. | M/s.San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03. | M/s.Sunrise Industries, Mumbai |
| 04. | M/s.Krunal Music Company, Mumbai |
| 05. | M/s.Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai |
| 06. | M/s.Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai |
| 07. | M/s.Vandana Electronics, Mumbai |
| 08. | M/s.S.S.Enterprises, Mumbai |
| 09. | M/s.Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai |

उपरोक्त ९ सी .डी. निर्मात्यांपैकी ५ निर्मात्यांचे खालील प्रमाणे सिलबंद कोटेशन्स प्राप्त झाले आहेत.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01. | M/s.San-Van Enterprises, Khar (W) Mumbai. |
| 02. | M/s. Vandana Electronics, Mumbai |
| 03. | M/s. Mhir Agenceis(P)Ltd.Dahisar(E) Mumbai. |
| 04. | M/s. Sunrise Industries, Mumbai. |
| 05. | M/s. Krunal Music Company, Mumbai |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपयें (दोन सीडीचा एक संच) |
|---|---|---|
| 01. | M/s.San-Van Enterprises, Khar (W) Mumbai. | 23.03 |
| 02. | M/s. Vandana Electronics, Mumbai | 22.93 |
| 03. | M/s. Mhir Agenceis(P)Ltd.Dahisar(E) Mumbai. | 23.08 |
| 04. | M/s. Sunrise Industries, Mumbai. | 26.00 |
| 05. | M/s. Krunal Music Company, Mumbai | 22.88 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.५ चे कोटेशनसादरकर्ते मे.कृणाल म्यूझिक कंपनी,मुंबई यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**विषय नं.३४. शिर्डी दर्शन व्ही.सी.डी. व श्रींचे आरती मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन डी.व्ही.डी. तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र. १३८.** मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक- २१-२२/०२/२००४ रोजीचे सभेतील विषय नं.३४ निर्णय क्रमांक ७५ नुसार शिर्डी दर्शन V.C.D. व " श्री" चे आरती , मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन D.V.D. ची मास्टर तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

शिर्डी दर्शन V.C.D. व " श्री" चे आरती , मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन D.V.D. ही श्री रामनवमी उत्सव २००६ दिनांक- ०५.०४.२००६ ते ०७.०४.२००६ अखेर ३ दिवस साजरा होत आहे. सदर दिवशी शिर्डी दर्शन V.C.D. व " श्री" चे आरती , मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन D.V.D. चा प्रकाशन सोहळा मा. अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा. विश्वस्त समितीचे सदस्य यांचे हस्ते संपन्न करण्याचे प्रयोजन आहे.

**अ)** शिर्डी दर्शन V.C.D. २०,००० नग अंदाजे दर रु. २०/- प्रमाणे रु. ४,००,०००/- इतका अंदाजे खर्च तयार करुन घेणेकामी अपेक्षित आहे. शिर्डी दर्शन V.C.D. २०,००० नग प्रथम ची संस्थान शिर्डी येथील दुकानदार यांना १०० चे पटीतचे लॉट करीता विक्री किमंत रु. ३५/- व संस्थानचे प्रकाशने विक्री काऊंटरवर /मुंबई कार्यालयात किरकोळ विक्री किमंत रु. ५०/- मात्र ठेवावी असे वाटते.

**ब)** " श्री" चे आरती , मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन D.V.D. १०,००० नग अंदाजे दर रु. ३५/- प्रमाणे रु. ३,५०,०००/- इतका अंदाजे खर्च तयार करुन घेणेकामी अपेक्षित आहे. " श्री" चे आरती , मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन D.V.D. १०,००० नग प्रथम ची संस्थान शिर्डी येथील दुकानदार यांना १०० चे पटीतचे लॉट करीता विक्री किमंत रु. ७५/- व संस्थानचे प्रकाशने विक्री काऊंटरवर /मुंबई कार्यालयात किरकोळ विक्री किमंत रु. १००/- मात्र ठेवावी असे वाटते.

तरी उपरोक्त " अ व ब " प्रमाणे शिर्डी दर्शन V.C.D. २०,००० नग अंदाजे दर रु. २०/- प्रमाणे रु. ४,००,०००/- व " श्री" चे आरती , मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन D.V.D. १०,००० नग अंदाजे दर रु. ३५/- प्रमाणे रु. ३,५०,०००/- असा एकूण रु. ७,५०,०००/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी शिर्डी दर्शन V.C.D. २०,००० नग व " श्री" चे आरती , मंत्रोच्चार व शिर्डी दर्शन D.V.D. १०,००० नग तयार करुन घेणेकामी कोटेशन मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. ७,५०,०००/- चे (अक्षरी रुपये सात लाख,पन्नास हजार ) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३५. श्रीसाईलीला अंकाचे डिजिटलायझेशन करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र. १३९.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईलीला अंकाची प्रथम आवृत्ती सन १९२३ साली तयार करुन श्री साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली. सन १९२३ पासून सालाबाद सन २००२ अखेर याप्रमाणे श्री साईलीला अंकाचे १२ महिन्यांचे अंक एकत्रीत करुन १ बायडिंग संच असे एकूण ४५ संच बायडिंग करण्यात आलेल्या आहेत.

प्रकाशने विभागाचे " श्री साईबाबा वाङ्‌मय कक्षात सदरच्या साईलीला बायडिंग साईभक्तांना वाचनासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. सदरचे बायडिंग संच दुर्मिळ असल्याने त्यांची दीर्घकाळ जपवणूक करणे गरजेचे आहे. अंक सन १९२३ पासूनचे असून दुर्मिळ आहेत. त्यांची पाने जीर्ण झालेली आहेत. अंकांचे जतन करणे आवश्यक आहे. त्यासाठी श्री साईलीला अंकाचे डिजिटायझेशन (संगणकीकरण) करुन घेणे गरजेचे आहे. ही सुविधा युनिव्हर्सिटी ऑफ पुणे यांचेकडे उपलब्ध असल्याने त्यांचेकडून सदरच्या जुन्या साईलीला अंकाचे डिजिटायझेशन (संगणकीकरण) करुन घेतल्यास त्याचा पुढील भावी काळात उपयोग होईल.

उपरोक्त प्रमाणे श्री साईलीला अंक बायडिंग सन १९२३ पासून ते सन २००२ अखेर एकूण १२ महिन्यांचे अंक एकत्रीत करुन १ बायडिंग संच याप्रमाणे एकूण ४५ संचाचे बायडिंग केलेले असून त्याचे एकूण २९,५८८ पेजेस चे डिजिटायझेशन (संगणकीकरण) करणेसाठी प्रती पेज दर रु. २/- याप्रमाणे एकूण रुपये - ५९,१७६/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे श्री साईलीला अंक बायडिंग ४५ संचातील एकूण २९,५८८ पेजेसचे प्रती पेज दर रु. २/-प्रमाणे एकूण रुपये -५९,१७६/-चे (अक्षरी रुपये- एकोणसाठ हजार,एकशे,शहात्तर) मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरचे काम युनिव्हर्सिटी ऑफ पुणे, यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी सदरहू श्री साईलीला अंकाच्या प्रती संस्थानमार्फत विक्रीसाठी ठेवणेकामी अभ्यास करुन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा, असेही ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३६. श्रीसाईलीला कार्यालयाकरिता फर्निचर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१४०.** "श्री साईलीला" संपादकीय कार्यालय मुंबई येथून कर्मचारी वृंदासह शिर्डी येथील कार्यालयात स्थलांतरीत करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ रोजीचे सभेतील विषय नं. १९ निर्णय क्रमांक १९० नुसार तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३.०५.२००५ रोजीचे सभेतील विषय नं. २८ निर्णय क्रमांक २३० अन्वये ठरविण्यात आले आहे.

मुंबई कार्यालयाकडून शिर्डी येथे स्थलांतरीत व्हावयाच्या श्री साईलीलेच्या कार्यालयासाठी खालील तपशिलाप्रमाणे फर्निचर खरेदी करणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१) दोन चेअर्स प्रत्येकी रुपये २,५००/- प्रमाणे एकूण | रुपये | ५,०००/- |
| ०२) मॅटिंग १२.५९ स्क्वे. फुट अंदाजे दर रुपये ८००/- प्रती स्क्वे.फुट नुसार अंदाजे | रुपये | १०,४००/- |
| ०१) दोन काचेची कपाटे प्रती नगास रुपये २,५००/- प्रमाणे | रुपये | ५,०००/- |
| ०२)झेरॉक्स कम फॅक्स कंप प्रिंटर मशिन (एच.पी. कंपनीचा प्रिंटर) | रुपये | २४,०००/- |
| ०५) कॉम्प्युटर १ नग - | रुपये | १८,०००/- |
| ०६) कॉम्प्युटर टेबल १ नग- | रुपये | २,५००/- |
| | एकूण रुपये | ६४,९००/- |

उपरोक्त प्रमाणे फर्निचर खरेदी करणेस व त्यासाठी खरेदीकामी अंदाजे रुपये ६४,९००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईलीला संपादकीय कार्यालयासाठी आवश्यक असणारे वरीलप्रमाणे फर्निचर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ६४,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३७. पोलीस स्टेशन बॅरिकेट्ससाठी एम.एस.हार्डवेअर साहित्य खरेदी कामी आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. १४१.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.१२.२००४ मधील निर्णय क्र.१६३ नुसार पोलीस स्टेशन, शिरडी यांना श्री साईबाबांच्या दर्शनाच्या वेळी वाहतुकीचे नियमन करण्याकरीता २०० लोखंडी बॅरीकेटस तयार करुन देणेकामी आवश्यक असणारे जी.आय.पाईप, एम.एस.हार्डवेअर साहित्य व ऑईलपेंट खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.७,०३,६००/-चे खर्चास तत्वतः मान्यता मिळालेली होती. सदरील प्रस्तावास मा.प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग, मंत्रालय,मुंबई, महाराष्ट्र यांची महाराष्ट्र शासन पत्र क्र.सासंवि-२००५/३९७/(६९)/सोळा दि.२८.१२.२००५ नुसार मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.१३-१४/०१/२००६ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.१४.०१.०६ ते दि.२४.०१.२००६ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात कोऱ्या निविदा फॉर्म विक्री ठेवणेत येवून निविदा स्विकारणे मुदत दि.२५.०१.२००६ अखेर अशी ठेवणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदापैकी मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांची निविदा रुग्णालय विभागाकडून दि.२४.०१.२००६ रोजी मुंबई येथे झालेल्या मा.विश्वस्त सभेत उघडणेत आलेली आहे. उर्वरीत दोन निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२००६ चे सभेत उघडणेत आलेल्या आहेत. तसेच निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता सोबतचे परिशिष्टात सादर केलेला आहे.

०१.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक

०२.स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक

०३.एस.एल.एस.स्कोरोडाईट प्रा.लिमीटेड, मुंबई

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली असून त्यांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले होते.

परंतू उपरोक्तपैकी सभेस मे.स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक हे समक्ष उपस्थित होते. तसेच मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी दूरध्वनीद्वारे दिलेल्या दरात कोणतीही सूट नसलेबाबत तर एस.एल.एस. स्कोरोडाईट प्रा.लिमीटेड, मुंबई यांनी फॅक्सपत्राद्वारे सूट देऊ केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निम्नतम दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३८. झेरॉक्स मशिन्स खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१४२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३९. ब्लॅकेट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. १४३.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.१२.२००५ मधील निर्णय क्र.७६८ नुसार भक्तनिवाससाठी आवश्यक असणारे २००० नग ब्लॅंकेट खरेदीकामी रेमंड, ओसवाल या नामांकित कंपन्यांचे रग खरेदी करण्यात यावे. त्यासाठी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग यांनी लुधियाना येथे समक्ष पहाणी करुन खरेदी करण्यात यावे, असा निर्णय झालेला असून याकामी अंदाजे रक्कम रुपये ६ लाख चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. याबाबत डॉ.एकनाथ गोंदकर यांनी संबंधित कंपन्यांशी पत्रव्यवहार करुन ब्लॅंकेट- 60” x 90” साईजच्या किमती, उपलब्धता, डिलेव्हरी, पेमेंट व सुटबाबत विचारणा करणेत यावी असे सुचविले. त्यानुसार मे.ओसवाल वुलन मिल्स लि, लुधियाना व मे.रेमंड लिमीटेड, मुंबई यांना पत्रे पाठवून दरपत्रके पाठविण्यास सांगणेत आले होते.

मे.रेमंड लिमीटेड, मुंबई यांनी दि.०४.०२.२००६ चे पत्राने काही निवडक वुलन ब्लॅंकटचे दर दिलेले आहे. मात्र त्यांचे व्यवस्थापनाच्या नियमानुसार थेट सप्लाय करु शकत नसल्याने त्यांनी राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक येथील रेमंड शॉपमधून पुरवठा स्विकारणेची विनंती केलेली आहे. मे. राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी रेमंड ब्लॅंकेटवर ७ टक्के सूट देवून शिरडी पोहोचचे दर दिलेले आहेत. तसेच दि.१८.०२.०६ रोजीच्या पत्राने अंतिम सूट दर दिलेले आहेत. त्यांचे दराचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मालाचा प्रकार | मे.रेमंड,मुंबई दर | मे.राज सेल्स,नाशिक यांचे ७टक्के सूट दर | मे.राज सेल्स,नाशिक अंतिम सूट दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्वस्तिका फ्रिंजेस | रु.३७७.०० | रु.३५०.६१ | रु.३१३.०० |
| ०२. | गगनदूत फ्रिंजेस | रु.४३७.०० | रु.४०६.६१ | रु.३६२.०० |
| ०३. | गगनदूत ४ एसएस | रु.४८७.०० | रु.४५२.९१ | रु.४०४.०० |
| ०४. | मेघदूत ४ एसएस | रु.४३६.०० | रु.४०५.४८ | रु.३६२.०० |
| ०५. | मेघदूत फ्रिंजेस | रु.४०७.०० | रु.३७८.५१ | रु.३३८.०० |

मे.ओसवाल वुलन मिल्स लिमीटेड, लुधीयाना यांनी दि.०७.०२.२००६ चे फॅक्स पत्राने काही निवडक मिंक व पॉलीस्टर ब्लॅंकेट नमुन्यांचे दर दिलेले असून डिलेव्हरी लुधियाना येथून घ्यावी लागेल. त्यांचे दराचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | प्रकार | मुळ दर |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मिंक ब्लँकेट | सिल्व्हर किंग | रु.५५०.०० |
| ०२. | पॉलीस्टर ब्लँकेट | ओसाका/ओरीएंट | रु.२३५.०० |
| ०३. | --"-- | कारपेट | रु.२७५.०० |
| ०४. | --"-- | आर्ट नं.३०२ | रु.३१०.०० |
| ०५ | --"-- | आर्ट नं.३०९ | रु.३३५.०० |
| ०६. | --"-- | आर्ट नं.३१४ | रु.२२०.०० |
| ०७. | --"-- | आर्ट नं.५०२ | रु.३२५.०० |

उपरोक्त दोन्ही पुरवठाधारकांनी नमुने सादर केलेले असून त्यांना आजचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात आले होते.

या सभेस रेमंडचे अधिकृत विक्रेते मे.राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक हे समक्ष उपस्थित होते. त्यांनी अंतिम सूट दरात कोणताही बदल केलेला नाही. मे.ओसवाल वुलन, लूधीयाना यांनी फॅक्सव्दारे ५% सूट देऊ केलेली आहे. मा.विश्वस्तांनी समक्ष नमूने पाहून मे.राज सेल्स, नाशिक यांचेकडील स्वस्तिक फ्रिंजेस प्रकारचे ब्लॅकेट दर रुपये ३१३.०० प्रति नग व मे.ओसवाल वुलन, लुधियाना यांचेकडील कॅप्री प्रकारचे ब्लॅकेट रुपये २६१.२५ प्रति नग (सूट दर) दराने विभागून खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४०. मे. सह्याद्री इंजिनिअर्स, श्रीरामपूर फुड पॅकेटस् प्लॅस्टिक पिशवी पुरवठ्याबाबत.**

**निर्णय क्र. १४४.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२९.०१.२००५ मधील निर्णय क्र.१६ नुसार सन २००५-०६ सालाकरीता प्रसादलाडू, नाष्टा पाकिटे व उदीप्रसादासाठी आवश्यक असणारी प्लॅस्टीक पिशवी खरेदीकामी निविदा मागणी करणेत आलेली होती. सदरील निविदांवर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०७.२००५ मध्ये निर्णय होवून खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत.

| अ.नं | पुरवठाधारकाचे नांव व आदेश क्र./दिनांक | प्रकार व साईज | मागणी | दर प्र.क्विंटल |
|---|---|---|---|---|
| ०१ | सरस प्लॅस्टीक्स, अ.नगर<br>९६८३/०६.०९.२००५ | लाडू पिशवी 5"x 6.5"<br>नाष्टा पाकिटे 8"x 10"<br>भाजी पिशवी 4"x 6"<br>उदीप्रसाद- 3"x 5" | १६० क्विंटल<br>३० क्विंटल<br>१० क्विंटल<br>५ क्विंटल | रु.९९८४/-<br>रु.९८८०/-<br>रु.८०००/-<br>रु.८०००/- |
| ०२ | सहयाद्री इंजिनीअरींग, श्रीरामपूर<br>९६८४/०६.०९.२००५ | नाष्टा पाकिटे 8"x 10" | ३५ क्विंटल | रु.९८८०/- |
| ०३ | सुपरप्लास्ट इंडस्ट्रीज, सिन्नर<br>९६८२/०६.०९.२००५ | भाजी पिशवी 4"x 6"<br>उदीप्रसाद- 3"x 5" | १० क्विंटल<br>५ क्विंटल | रु.८०००/-<br>रु.८०००/- |

मे.सहयाद्री इंजिनीअरींग, श्रीरामपूर व मे.सरस प्लॅस्टीक्स, अ.नगर यांनी अनुक्रमे ८.७० क्विंटल व २६.०२ क्विंटल नाष्टा पाकिटे पिशवी पुरविलेली आहे. मे.सहयाद्री इंजिनीअरींग यांनी त्यांचे क्र.एस.इ/२८४/०६ दि.०६.०२.२००६ चे पत्राने त्यांचे कंपनीत दि.०३.०२.०६ रोजी पहाटे ३ वाजता चोरी झालेली असल्याने पिशव्या तयार करण्याच्या मशिनरीच्या इलेक्ट्रिक मोटारी, एअररींग, डाय व केबल चोरी झाल्याने मशिनरी चालू होवू शकत नसल्याचे तसेच सदरील पार्ट हे पंजाब येथील लुधियाना येथून आणण्यासाठी २ महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने २ महिन्यांकरीता मुदतवाढ मागितलेली आहे. सोबत त्यांनी पोलीस केसची एफआय.आर झेरॉक्स प्रत जोडलेली आहे.

प्रसादालय किराणा माल पुरवठा वर्ष हे मे २००५ ते एप्रिल २००६ असे असून पुढील निविदेस अजून २ महिने बाकी आहेत. मात्र भक्तांचे गर्दीचे प्रमाण बघता मे.सरस प्लॅस्टीक्स, अहमदनगर यांचेकडील बाकी असलेली प्लॅस्टीक पिशवी पुरणे शक्य नाही. दोन महिन्यांसाठी साधारणतः १० ते १५ क्विंटल पिशवीची आवश्यकता असल्याने मे.सहयाद्री इंजिनीअरींग, श्रीरामपूर यांची अडचण लक्षात घेता, मे. सरस प्लॅस्टीक्स, अहमदनगर यांचेकडून अंदाजे १५ क्विंटल पिशवी आवश्यकतेनुसार खरेदी करणेस हरकत नाही कारण दोन्हीही पुरवठाधारकांचे पिशवीसाठी दर सारखेच आहेत.

तरी मे.सहयाद्री इंजिनीअरींग, श्रीरामपूर यांना दोन महिने तात्पुरती मुदतवाढ देणेस व मे.सरस प्लॅस्टीक्स, अहमदनगर यांचेकडून १५ क्विंटल नाष्टा पाकिटे पिशवी आवश्यकतेनुसार खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

याचवेळी संस्थानला यापुढे खरेदी करावयाच्या प्लॅस्टिक पिशव्यांबाबत महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या नियमावलीनुसारच खरेदी करण्यात याव्यात, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.४१. संस्थान परिसरात भक्तांच्या सोयीसाठी लोखंडी जाळया (बॅरिकेटस) बसविणेबाबत.**

**निर्णय क्र. १४५.** श्रीसाईबाबांचे दर्शनास येणा-या साईभक्तांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. साईभक्तांचे वाढत्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता संस्थान परिसरात साईभक्तांना योग्य प्रकारे श्रींचा लाडू प्रसाद, श्रींचे पुस्तके, उदी तसेच देणगी व्यवस्थित पणे सहज व सुलभपणे घेता यावी यासाठी लोखंडी जाळया साईभक्तांच्या रांगेकरीता व रांगा लावण्याकरीता अति आवश्यक आहे.

तसेच श्रींचे तिनही उत्सव व दर गुरुवारची पालखीचा योग्य तो बंदोबस्त करणेसाठी लोखंडी जाळया कमी पडतात. गर्दीचे कालावधीत श्रींचे दर्शन घेणा-या साईभक्तांची दर्शनरांग मुख्य प्रवेशव्दाराच्या बाहेर जाते. त्यावेळी साईभक्तांना दर्शन घेणेसाठी बाहेरुन रांगा लावाव्या लागतात. बाहेरील रांगेमध्ये इतर कोणीही व्यक्ती, उपद्रवी इसम रांगेमध्ये जाऊ नये याकरीता लोखंडी जाळया साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी असणे गरजेचे आहे.

श्रीं चे दर्शनास येणा-या साईभक्तांच्या वाढत्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता सध्या असलेल्या लोखंडी जाळया कमी पडत असून अजून ५० लोखंडी जाळया बनविणे गरजेचे आहे, असे संरक्षण विभाग प्रमुख यांनी १७-०१-२००६ च्या टिपणी अन्वये कळविले आहे.

या ५० नग लोखंडी जाळया तयार करणेसाठी खालीलप्रमाणे मटेरीअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५९,३००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | झेनिथ / टाटा मेक एम.एस. राऊंड पाईप साईज ४० एमएम व २ एम.एम.थिक | ६०० किलो | रु. ३६.०० (प्रति किलो ) | रु. २१,६००.०० |
| ०२) | स्वस्तिक /महावीर मेक एम.एस. ॲंगल, साईज-२५ x२५ x ५ एम.एम. | ७५० किलो | रु. ३०.०० (प्रति किलो ) | रु. २२,५००.०० |
| ०३) | स्वस्तिक / महावीर मेक एम.एस. फ्लॅट पट्टी ,साईज-७५ x ८एम.एम. | २२५ किलो | रु. ३२.०० (प्रति किलो ) | रु. ०७,२००.०० |
| ०४) | झेनिथ/टाटा मेक एम.एस.बेन्ड साईज - ४० एमएम | २०० नग | रु. ४०.०० (प्रति नग) | रु. ०८,०००.०० |
| | | | **एकूणरक्कम :-** | **रु. ५९,३००.००** |

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.४२.** **श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी-पिंपळवाडी-कनकुरी संयुक्त पाणीपुरवठा योजनेसाठी दारणा धरणातुन बंदनलीकेद्वारे पाणी आणणेसाठी सर्व्हेअरची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र. १४६.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ चे सभेत निर्णय क्रं.४१९ अन्वये, निळवंडे व दारणा धरणातून जलवाहिन्या टाकून शिर्डी पर्यंत पाणी आणणेसाठी कामाचे प्राथमिक अंदाजपत्रक तयार करुन ते मा.व्यवस्थापन समिती समोर ठेवण्यात यावे असे ठरलेले आहे. तसेच दि.०५/११/२००५ रोजी मा.व्यवस्थापन सल्लागार समितीचे सभेमध्ये विषय नं. २ निर्णय क्र .६५१ (११) नूसार सदरची पाईप लाईन योजना शिर्डी नगरपंचायतीमार्फत राबविल्यास शासनाकडून मिळणारे अनुदान मिळेल याबाबत सविस्तर प्लॅन व एस्टीमेट मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी तयार करुन येत्या सल्लागार परिषदेसमोर सादर करावा असे ठरले आहे. त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीस जा.नं. एसएसएस/वशी/पा.पु./१५०८१/२००५ दि.२७/१२/२००५ चे पत्रावये कार्यवाही होणेस कळविले आहे. त्यांनी नगरपंचायतचा ठराव घेवून अटी व शर्ती टाकून उलट टपाली कळविले आहे.

तत्पूर्वी आपले मार्फत या क्षेत्रातील नामवंत कंपन्यांनी पत्र पाठवून सर्व्हे करणेसाठी "ऑफर" विचारण्यात आलेल्या होत्या. पैकी १) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोपरगांव यांनी तोंडी असे सांगीतले की, प्रथम एकुण प्रोजेक्टच्या ३०% रक्कम जीवन प्राधिकरण कडे जमा करुन पुढे १७.५ % दराने काम करुन देता येईल असे कळविले आहे. २) एल ॲड टी कंपनी, मुंबई यांनी दि.२०/१२/२००५ रोजी ई-मेल करुन दि.२१/१२/२००५ रोजी त्यांचे प्रतिनिधी श्री. के.एल. सुरेश, श्री.सी.व्ही राजनारायण व श्री. संदीप नवलखे यांना शिर्डी येथे पाठवून आपले पाणी पुरवठा योजनेची प्राथमिक माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी पुन्हा ई-मेल करुन दारणा धरणाची माहिती घेतली व खर्चाची ऑफर कळविलेली आहे. त्यामध्ये सर्व्हे करणे, प्रोजेक्टची एकूण किंमत काढणे, ड्रॉईंग तयार करणे व इतर संबंधीत कामे करणे यासाठी एकूण इस्टीमेंट कॉस्टच्या १.७५ % किंवा रुपये ४२ लाख तसेच सर्व्हीस टॅक्स वेगळा दयावा लागेल असे कळविले आहे. शिवाय संपूर्ण पाईप लाईनचे काम म्हणजे सर्व्हे करणे व पाईप लाईन टाकणे पर्यंत जर एल. ॲड टी. कंपनी लि. मुंबई यांनाच दिले तर प्राथमिक अहवालाचा वरील खर्च ते घेणार नाहीत. असे कळविलेले आहे.

याबाबत कसल्टींग एनव्हायरोमेंटल इंजिनिअर मा.श्री.बी.व्ही.रोटकर,नागपूर यांचेकडून दि.०७/०२/२००६ रोजीचे पत्रान्वये अभिप्राय मागविणेत आलेला होता,त्यात त्यांनी दिलेल्या अभिप्रायात एल. ॲड टी. कंपनी ही नावाजलेली कंपनी असून सदर कामाबाबत ती योग्य असलेबाबतचे मत दिले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दारणा धरणातील पाण्याची पातळी लक्षात घेता निळवंडे धरणातून पाणी आणणेबाबत फेरविचार करण्यात यावा, तोपर्यंत सदरहू विषय तहकूब ठेवण्यात यावा, असें ठरले.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं.४३.** **श्री.साईदास मंडळ,पुणे यांचेमार्फत श्रींचे व्दारकामाई व इतर ठिकाणी पितळी बार बसविणेबाबत.**

**निर्णय क्र. १४७.** श्री साईदास मंडळ, पुणे यांनी त्यांचे दिनांक १५.०१.२००६ चे पत्राव्दारे खालील बाबींसंबंधी परवानगी मिळावी अशी विनंती केली असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) श्रींचे व्दारकामाईचे व्दार पितळी धातूचे बनविणे.
०२) श्रींचे गुरुस्थान ते श्रींची व्दारकामाई रोडवरील भिंतीचे बाजूकडील लोखंडी बार पितळी धातूचे बसविणे.
०३) श्रींचे समाधी मंदिर व व्दाराकामाई यामधील दार पितळी धातूचे बनविणे
०४) श्रींचे व्दारकामाई मधील रेलींग्ज पितळी बनविणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

०१) अ.नं. ०२ मधील श्रींचे व्दारकामाई सभामंडपाचे दक्षिणेकडील बाजूचे लोखंडी ग्रिल हे सन १९९२ पासूनचे मूळचे आहे, त्यामूळे ते बदलण्यात येऊ नये.
०२)अ.नं. ०३ मध्ये समाधी मंदिर व व्दारकामाई दार हे आकर्षक पध्दतीने पितळी बनवावयाचे असल्यास त्यास मान्यता देण्यात यावी. परंतू याबाबत पुरातत्व तज्ञ श्री गोरक्षकर, मुंबई यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.
०३) अ.नं.०४ मधील श्रींचे व्दारकामाईतील रेलिंग्ज व इतरही रेलिंग्ज पितळी धातूचे बनविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग )

**विषय नं.४४. नवीन ट्रॅक्टर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र. १४८.** संस्थानचे वाहन विभागाकडे दोन ट्रॅक्टर आहेत, त्यामधील एक ट्रॅक्टर सन १९८५ चा असल्याने सध्या बंद आहे. एक ट्रॅक्टरच चालू असल्यामूळे बऱ्यास विभागाची मागणी असते. त्यामूळे बगीचा विभागाला वेळेवर ट्रॅक्टर उपलब्ध होत नाही. साठवण तलावावरील नांगरट करणे तसेच नव्याने शेती महामंडळाचे खरेदी केलेल्या शेतीची मशागत करणे इत्यादी कामासाठी ट्रॅक्टरची आवश्यकता आहे.

उपरोक्त कामासाठी महेंद्र & महेंद्र ५७५ किंवा स्वराज ८५५ या कंपनीचा ट्रॅक्टर व पॉप्युलर कंपनीचे पल्टी नांगर, सरीरेझर ही औजारे खरेदी करावी लागतील. यासाठी अंदाजे रक्कम रुपये ६ लाख खर्च अपेक्षित असून सदरचा ट्रॅक्टर कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महेंद्र & महेंद्र ५७५ किंवा स्वराज ८५५ या ट्रॅक्टरऐवजी जॉनडिअर या कंपनीचा ट्रॅक्टर किफायतशीर असल्याने तो घेण्यात यावा, याकामी आवश्यक असणारे पल्टीप्लाऊ, सरी रेझर, व इतर अनुषंगिक साहित्य अधिकृत विक्रेत्यांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख/वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.४५. साईभक्तांसाठी निवासाकरिता असलेल्या इमारतीमध्ये किटकनाशक फवारणी करणेचे वार्षिक कामाकरीता आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. १४९.** साईभक्तांचे निवासासाठी असलेल्या निवासस्थानामध्ये पेस्ट कंट्रोल करणेकामी कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. त्यानुसार आलेली कोटेशन्स व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.१२.२००५ चे सभेतील निर्णय क्र.७६७ अन्वये उघडण्यात येऊन, चर्चा/वाटाघाटीमध्ये कोटेशनसादरकर्त्यांना किटक नाशके फवारणीकामी चौ.फुटावर दर न देता वर्षभरासाठी इमारतीच्या आकारमानानुसार दर देण्यात यावेत असे सांगण्यात आले होते. त्यानुसार खालील कोटेशन्ससादरकर्ते तसेच मा.विश्वस्त कॅप्टन सुरेश वासूदेवा यांनी सुचविलेले मे.पेस्ट कंट्रोल एम. वाल्श,मुंबई यांचेकडून कोटेशन्स मागविण्यात आले होते.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | पेस्टोमॅटिक कंट्रोल, श्रीरामपूर, जि. अहमदनगर |
| ०२ | एक्सेल पेस्ट कंट्रोल, ब्रॅच पिंपळस रोड, राहाता. |
| ०३ | औरंगाबाद ॲन्टी पेस्ट सर्व्हिस ,औरंगाबाद |
| ०४. | मे.पेस्ट कंट्रोल एम. वाल्श,मुंबई |

उपरोक्त कोटेशनसादरकर्त्यांनी सादर केलेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | पेस्टोमॅटिक कंट्रोल, श्रीरामपूर, जि. अहमदनगर | ७,२१,३००/- | ७,२१,३००/- |
| ०२ | एक्सेल पेस्ट कंट्रोल, ब्रॅच पिंपळस रोड, राहाता. | २,४२,०५९/- | २,२९,९५६/- |
| ०३ | औरंगाबाद ॲन्टी पेस्ट सर्व्हिस ,औरंगाबाद | २,८८,०००/- | २,८८,०००/- |
| ०४. | मे.पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श,मुंबई | ८,४७,१८२/- | ७,८३,६४३/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.०२ चे मे.एक्सेल पेस्ट कंट्रोल, ब्रॅच पिंपळस रोड, राहाता व ०३ चे मे.औरंगाबाद ॲन्टी पेस्ट सर्व्हिस ,औरंगाबाद यांचे दर निम्नतम आहेत. परंतु त्यांनी दिलेले दर वाजवी नाहीत, इतक्या कमी रकमेत पेस्ट कंट्रोलचे काम चांगल्या प्रकारे होऊ शकणार नाही, सबब त्यांच्या निविदा स्वीकारणेत येऊ नयेत, उर्वरित दोन कोटेशन सादरकर्त्यांच्या निविदा विचारात घेता, अ.नं.०४ चे मे.पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श,

मुंबई यांचे दर जास्त असले तरी त्यांचे कामाचा तसेच व किटकनाशके फवारणी केल्यानंतर त्याचा प्रभावी काळ विचारात घेता मे.पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श,मुंबई यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक-भक्तनिवासस्थान)

**विषय नं.४६. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पेजर व म्युझीक सिस्टीमबाबत.**

**निर्णय क्र. १५०.** सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये सर्व वार्ड, गॅलरी, ओपीडी, वेटींग हॉल, सिस्टर रूम, चौकशी काऊंटर इ. ठिकाणी रूग्णालयातील कर्मचारी अथवा डॉक्टर यांचेशी कामाच्या सोईच्या दृष्टीने त्वरीत संपर्क साधणेसाठी रूग्णालयाची मांडणी झाल्यानंतर ध्वनिक्षेपण (Paging) सूचना देणे व म्युझिक, संगीत, भजने इ. लावण्याची व्यवस्था असलेली यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. त्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मिळालेली आहे.

०१ पूणे येथील रूबी रूग्णालयातील साऊंड सिस्टिम अंतर्गत फिलिप्स कंपनीचे जुन्या पध्दतीचे स्पिकर व अँम्प्लिफायर असून झोन पध्दत उपयोगात आणलेली आहे.

०२. पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील श्री गुजर यांचेशी केलेल्या चर्चेप्रमाणे स्पिकर व झोन सिस्टिमसाठी लागणारा झोन कंट्रोलर अॅसेन (पुना) या कंपनीचा असून अँम्प्लिफायर आहूजा कंपनीचे वापरलेले आहेत व स्पिकर तयार करून घेतलेले आहेत. सदरची सिस्टिम अॅसेन कंपनीचे पार्टनर आसोस्टीक इंजिनिअर श्री लोणकर यांनी काही प्रमाणात काम करून सिस्टिम चालू केल्याबाबत समजले.

(वरील दोन्ही रूग्णालयातील साऊंड सिस्टिम प्रत्यक्ष पाहिलेली आहे.)

०३. मुंबई येथील लिलावती रूग्णालयातील श्री पिटर यांचेशी फोनवरील चर्चेप्रमाणे त्यांच्याकडे आहुजा कंपनीचे पब्लिक अॅड्रेस सिस्टिम असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

०४. वरील तिन्ही रुग्णालयातील यंत्रणा जुन्या पध्दतीची असून आता नवीन टेलिफोनिक, क्लिअर क्वॉलिटी झोन सिस्टिम असलेल्या फिलिप्स/बोस्च कंपनीच्या यंत्रणा मार्केटमध्ये उपलब्ध झालेल्या आहेत. अशी सिस्टिम मुंबई येथील हिंदुजा रुग्णालयात असलेबाबत श्री दिपक तिवारी यांचेशी फोनवर झालेल्या चर्चेप्रमाणे कळाले आहे.

दिनानाथ रूग्णालयाचे काम केलेले पुना येथील ऑफस्टिक इंजिनिअर व अॅसेन कंपनीचे पार्टनर श्री लोणकर यांचेशी संपर्क साधला असता ते प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी तसेच खर्चाचे अंदाजपत्रक देण्याबाबत दिनांक १३/०२/२००६ रोजी स्वखर्चाने शिर्डी येथे आले होते. त्यांच्या समवेत मा. प्रशासकिय अधिकारी श्री जोशी व वरिष्ठ रुग्णालय प्रशासक, श्री टाकळकर यांनी क्लोज सर्किट कॅमेरा सिस्टिम, टी.व्ही सिस्टिम, पेजिंग व म्युझीक सिस्टिम इ. बाबत चर्चा केली व त्यांना नवीन रुग्णालय दाखवून बांधकामाचा नकाशा दिलेला आहे. दिनांक १५/०२/२००६ रोजी झोन सिस्टिमसाठी लागणारे साहित्य तसेच केबल टी.व्ही.ची केबल टाकण्याबाबत त्यांनी त्यांच्या अॅसेन कंपनीचे मटेरियलचे अंदाजपत्रक फॅक्स व्दारे पाठविले आहे. त्याप्रमाणे यंत्रणेसह केसींग कॅपिंग फिट करणे, केबल ओढणे, स्पिकर फिट करणे व सिस्टिम चालू करणे या सर्व कामासाठी अंदाजे रूपये ४,५०,०००/- एवढया किमतीचे अंदाजपत्रक दिले आहे.

सदर अॅसेन कंपनीच्या सिस्टिम पेक्षा तांत्रिक दृष्टया अधिक प्रगत असलेली फिलिप्स/बोस्च कंपनीचे अधिकृत डिलर मुंबई येथील मॉडर्न रेडियो हाऊसचे प्रतिनिधी श्री विनोद हे दिनांक १६/०२/२००६ रोजी शिर्डी येथे आले होते. त्यांनी रुग्णालयाचे वरिष्ठ प्रशासक, डॉ. टाकळकर यांचेशी चर्चा करून रुग्णालयाची पाहणी करून फिलिप्स/बोस्च कंपनीचे माहितीपत्रक व अंदाजपत्रक दिल्याप्रमाणे झोन टेलिफोनिक सिस्टिम यंत्रणेसह केसींग कॅपिंग फिट करणे, साऊंड सिस्टिमची केबल टी.व्ही.ची केबल ओढणे, स्पिकर फिट करणे व सिस्टिम चालू करणे यासह अंदाजे रूपये ६,३५,०००/- खर्च येण्याची शक्यता आहे. सुमारे १०० स्पिकरचे १२ ते १५ झोन होवून प्रत्येक झोनमध्ये ८ ते १० स्पिकर देता येतील. आवश्यक त्या किंवा सर्व झोनला सूचना देता येतील.तसेच म्युझीक, साईमंत्र देखील ऐकविता येतील. सूचना देणेपुर्वी कंट्रोलमध्ये फिड असलेले ऐच्छिक म्यूझीक वाजविण्याची व्यवस्था आहे. या सिस्टिम मध्ये तीन ठिकाणाहून अनाऊंसमेंट करण्याची व्यवस्था आहे. फिलिप्स/बोस्च व अॅसेन या वरील दोन्ही सिस्टिम मध्ये खालील प्रमाणे कमी जास्त प्रमाणात सोयी उपलब्ध आहेत.

| अॅसेन कंपनी | फिलिप्स/बोस्च कंपनी |
|---|---|
| ०१.सूचना देणेसाठी माईकऐवजी (टेलिफोनसारखा) हँडसेट आहे. | ०१. सूचना देणेसाठी मायक्रोफोनचा उपयोग केलेला आहे. |
| ०२. एकूणझोनपैकी ठराविक झोनला म्युझिक चालू ठेवून बाकीच्या झोनला सूचना सिलेक्ट करणे अडचणीचे आहे. | ०२. कोणत्याही ठराविक किंवा सर्व झोनला म्युझीक किंवा सूचना देण्याची व्यवस्था सोयीस्कर आहे. |
| ०३ सूचना देतांना हँडसेट उचलुन झोन सिलेक्ट करांवा लागतो. | ०३. झोन सिलेक्टची पध्दत अॅटोमेटिक आहे. |
| ०४. स्पिकर बंद किंवा शॉर्ट सर्किट दाखविण्यासाठी स्वतंत्र सोय नाही. | ०४. कोणता स्पिकर बंद पडला किंवा शॉर्ट सर्किट झाल्यास कंट्रोलरला इंडीकेटर व्दारे समजते. |
| ०५. या सिस्टिम मध्ये फक्त १५ झोनचे तीन ऑपरेट मशिन व एक बुस्टर अॅम्प्लिफायर व एक ऑक्झिलरी युनिट एवढेच मशिनरी आहेत. | ०५. या सिस्टिम मध्ये मायक्रोप्रोसेसर कंट्रोल स्टेशन, झोन राऊटर, कॉल स्टेशन ०३ नग, की पॅड ०३ नग, बुस्टर अॅम्प्लिफायर ०२ नग, एमपी थ्री सीडी प्लेअर इ. मशिनरी आहेत. |

उपरोक्त माहिती पाहता फिलिप्स/बोस्च कंपनीची सिस्टिम अद्ययावत व अधिक सोयी उपलब्ध असलेली दिसून येते. परंतू अॅसेन कंपनीची ऑडियो सिस्टिम अधिक किमतीची आहे. तरी कृपया विविध एजंट वितरक यांचेकडून अॅसेन व फिलिस्प कंपनीची सिस्टिम कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रूपये ७,००,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी तज्ञांचा सल्ला घेंऊन, श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये पेजर व म्युझिक सिस्टीम बसविणेकामी निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरलें.

(कार्यवाही-ध्वनी क्षेपण विभाग प्रमुख)

**विषय नं.४७. ध्वनिवर्धके वापराबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाबाबत मा.पोलीस निरीक्षक,शिर्डी पोलीस स्टेशन यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र. १५१.** जगप्रसिद्ध जगद्‌गुरु श्री साईबाबांच्या समाधी मंदिरात भूपाळया, काकड आरती व श्रींचे मंगलस्नान पहाटे ५ ते ७ वाजेपर्यंत तसेच दुपारी १२ ते १२:३० वाजेपर्यंत मध्यान्ह आरती, संध्याकाळी सुर्यास्ताचे वेळी सुमारे ३५ मिनीटे धूपारती व रात्री १० ते १०:२० पर्यंत शेजारती या आरत्या परंपरागत पध्दतीने अनेक वर्षांपासून चालू आहेत.

सर्व साईभक्तांना आरतीस उपस्थित राहणे शक्य नसते व तेवढी जागाही मंदीरामध्ये नसल्याने आरत्यांचा आवाज सर्वत्र यावा याकरीता संस्थानच्या शांतिनिवास इमारतीच्या टॉवरवर ध्वनिवर्धके बसविलेली असून त्यामुळे संस्थान निवासस्थानांमध्ये व खाजगी लॉजमध्ये उतरलेले साईभक्त व शिर्डीतील नागरिकांना उपरोक्त आरत्या ऐकण्याचा लाभ होतो, अशी व्यवस्था सुमारे ४० वर्षांपूर्वीपासून आहे. सदर ध्वनिवर्धकांचा आवाज चारही बाजूला २ कि.मी. लांबपर्यंत ऐकू जातो त्यामुळे दूरवर राहणारे स्थानिक नागरीक व देश, परदेशातून आलेले साईभक्त आहेत त्या ठिकाणी भूपाळयांचा व आरतीचा लाभ घेतात त्यामुळे भक्तीभावाने स्वतःला धन्य मानून संस्थानबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. लांबवर जाणाऱ्या आवाजाबाबत आजपर्यंत कोणाचीही तक्रार नाही. (सदर ध्वनिवर्धके रात्री १०.२० ते पहाटे ५ वाजेपर्यंत बंद असतात). आरत्यांच्या वेळेव्यतिरिक्त भजने म्हटली जातात तसेच साईमंत्र प्रसारीत केले जातात, त्यासाठी फक्त संस्थान हद्दीतीलच ध्वनिवर्धके वापरली जातात.

शिर्डी पोलीस स्टेशनचे वरील संदर्भीय पत्रानुसार, ध्वनिवर्धके वापराबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, (दिल्ली) भारत सरकार यांनी सार्वजनीक ठिकाणी रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ध्वनिवर्धके वाजविण्यास बंदी केलेली आहे त्या आदेशाचे पालन व्हावे असे म्हटले आहे.

मंदीरातील पूर्वापार परंपरेने चालू असलेले धार्मिक कार्यक्रम (आरती) न्यायालयाने ठरवून दिलेल्या रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत फक्त रात्री १० ते १०:२० पर्यंत शेजारती व पहाटे ५ ते ६ पर्यंतच्या कालावधीत भूपाळया, काकड आरती, व श्री साईबाबांचे मंगलस्नानाचे मंत्र चालू असतात, त्या वेळेस उपरोक्त शांतिनिवास टेरेसवरील ध्वनिवर्धके चालू असतात.

श्री साईबाबांच्या पदस्पर्शाने पवित्र बनलेल्या शिर्डी या धार्मिक स्थळास देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. अलौकिक विभूती असलेले सद्‌गुरु श्री साईबाबा शिर्डीत प्रकटले व जवळपास ६० वर्षे आपले अवतारकार्य पूर्ण करुन येथेच समाधिस्त झाले, त्यामुळे या समाधी मंदीराला अनन्यसाधारण महत्व आहे. बाबांनी संपूर्ण जगाला 'श्रध्दा सबुरी' हा महामंत्र दिला. जगातील सर्व जातीधर्मातील लोकांचे हे स्थान श्रध्दास्थान बनलेले आहे तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे रात्री १० ते ६ वाजेपर्यंतच्या उपरोक्त वेळेत शांतीनिवास टेरेस वरील लांबपर्यंत आवाज देणारी ध्वनिवर्धके बंद ठेवल्यास शिर्डीतील ग्रामस्थ, देशातून व जगभरातून आलेले साईभक्त आरतीचा व भूपाळयांचा आवाज न आल्याने नाराज होतील व त्यांच्या साईबाबांविषयी असलेल्या भावना दुखावल्या जातील. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबांचे मंदीरातील आरत्या व दैनंदिन कार्यक्रमांचा स्पिकरवर होणारा आवाज कायद्याप्रमाणे बरोबर आहे किंवा कसे हे प्रथम तपासून पहाण्यात यावे. त्यानंतर याबाबतीत हायकोर्ट/सुप्रिम कोर्टाचे वकिलांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

**विषय नं.४८. वेबसाईट कक्षासाठी तज्ञ सल्लागार नेमणेबाबत.**

**निर्णय क्र. १५२.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे व्यवस्थापनामार्फत सन १९९९ पासून स्वतःचे इंग्रजी भाषेतील तर त्यानंतर सन २००५ मध्ये मराठी भाषेतील अधिकृत संकेतस्थळ (वेबसाईट) सुरु करण्यात आलेले आहे. सध्या इंग्रजी व मराठी भाषेतील वेबसाईटवर २५० ते ३०० पानी माहिती उपलब्ध असून, २००-२५० फोटोंचा संग्रह उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या वेबसाईटवर संस्थान व्यवस्थापनाची परिपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, त्यात देणगी, निवासस्थान, साईभक्तांसाठी उपलब्ध असणाऱ्या सेवा-सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त संस्थानमार्फत प्रकाशित मराठी साईचरित्र, इंग्रजी साईचरित्र व इतर प्रकाशने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

सध्या वेबसाईट डेव्हलप करणे, डिझायनिंग करणे आदि कामे माहिती तंत्रज्ञान विभागातील वेबसाईट कक्षामार्फत करण्यांत येत आहेत. वेबसाईट तंत्रज्ञानात वेळोवेळी तांत्रिक बदल होत असून, या बदलांची माहिती आपल्यापर्यन्त पोहोचण्यांस वेळ लागतो. त्यामुळे वेबसाईट विकसीत करणे, त्यात आवश्यक बदल करणे याबाबत वेळ लागतो. सध्या वेबसाईट कक्षाकडे ऑनलाईन दर्शन, ऑनलाईन डोनेशन, मोबाईलवर संदेशव्यवस्था, मंदिर परिसरात टच्-स्क्रिनव्दारे माहिती उपलब्ध करुन देणे आदि कामकाज सुरु आहे. निर्देशीत केलेल्या सर्व कार्यप्रणाली विकसीत करणे, त्याचे डिझायनिंग करणे हे अत्यंत महत्वाचे काम असून, त्यासाठी या क्षेत्रातील आवश्यक असे तांत्रिक ज्ञान उपलब्ध असणाऱ्या तज्ञ सल्लागाराची अत्यंत आवश्यकता आहे.

मुंबई येथील सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टचे अधिकृत वेबसाईटचे काम सध्या बाहेरील तज्ञ सल्लागारांकडून करवून घेण्यात येत आहे. त्यात प्रामुख्याने, वेबसाईट होस्टींग, वेबसाईट विकसीत करणाऱ्या तांत्रिक संस्थेशी सहकार्य, ऑन-लाईन देणगीबाबत तांत्रिक संस्थेशी सहकार्य करणे, वेबसाईट व आयटी क्षेत्राशी संबंधीत इतर कामकाजात मदत करणे आदि कामांचा प्रामुख्याने समावेश होतो. सध्या सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टमध्ये श्री.अशोक आर.नाडकर्णी, वेबस्टुडिओ, मुंबई हे सन १९९७ पासून तज्ञ सल्लागार म्हणून काम पहात आहेत. श्री. नाडकर्णी स्वत: शिर्डी येथे दिनांक ०२ फेब्रुवारी, २००६ रोजी समक्ष येऊन गेले असून, त्यांनी वेबसाईट कामकाजाबाबत मा.कार्यकारी अधिकारी व इतर अधिकाऱ्यांशी चर्चा केलेली आहे. श्री. नाडकर्णी, मुंबई हे संस्थान व्यवस्थापनाला वेबसाईट संबंधीत कामकाजात विनामूल्य सहकार्य देऊ इच्छित आहेत. त्याबाबत त्यांनी दिनांक ०२ फेब्रुवारी,२००६ रोजी तसे पत्रही दिलेले आहे.

श्री.अशोक आर.नाडकर्णी, मुंबई यांना या क्षेत्रातील मोठा अनुभव असून, सध्या ते विविध संस्थांमध्ये तज्ञ सल्लागार म्हणून काम करीत आहेत. श्री.नाडकर्णी हे विनामूल्य सहकार्य देऊ इच्छित असल्याने, त्यांची वेबसाईट कक्षासंबंधीत कामकाजासाठी तज्ञ सल्लागार म्हणून सुरूवातीस एक वर्षासाठी नेमणूक करण्यात यावी. या कामासाठी श्री. नाडकर्णी हे शिर्डी येथे आलेनंतर त्यांच्या निवासाची व जेवणाची व्यवस्था विनामूल्य करता येईल, श्री नाडकर्णी अथवा त्यांचे प्रतिनिधींची दरमहा शिरडी भेट अपेक्षीत असून मुंबई येथून येणे-जाणेचा खर्च म्हणून रुपये १२,०००/- मात्र प्रति वर्षी मानधन म्हणून दोन टप्प्यात अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.४९. व्यायामशाळेतील नवीन साहित्य (मशिनरी) खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र. १५३.** श्री साईबाबा संस्थान अंतर्गत व्यायामशाळा असून सदरच्या व्यायामशाळेमध्ये सध्या २५० सभासद आहेत. व्यायामशाळेतील सभासद संख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे. त्याकरीता व्यायामशाळेतील सभासदांना चांगलेप्रकारे व्यायाम करणेसाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

**०१) क्रॉस ओव्हर मशिन-** या मशिनचा उपयोग छाती, दंड, पाठ, पोट व खांद्याचे विविध प्रकारचे व्यायाम करणेसाठी केला जातो. तसेच या मशिनव्दारे एका वेळेस किमान १५ ते २० मुले व्यायाम करु शकतात.

**०२) बेंच (अॅडजेसमेंट) -** या मशिनवर छातीचे दोन प्रकार मारले जातात. तसेच इंक लाईन व डीड लाईन या पासून छातीचे खालील तसेच वरील बाजूस भरली जाते.

**०३) मॅट-** सध्या व्यायाम शाळेत १४ मशिन असून वजन प्लेट व डंबेल्स फरशीवर आदळून फरशीचे नुकसान होते याकरीता रबरी मॅट मिळावेत.

**०४) बुशींग -** बुशींगचा वापर वजन मारतांना बारला लावून पॅकिंगकरिता केला जातो. त्यामूळे बारला लावलेले वजन फरशीवर पडत नाही. याकरीता १४ बुशींगची आवश्यकता आहे.

**०५) बेंच-**याचा उपयोग डंबेल्स मारतांना झोपून मारता येतो. तसेच शोल्डर मारणे कामी या बेंचचा उपयोग होतो.

**०६) कुलर -** व्यायामशाळेतील सभासदांना व्यायाम करते वेळी पिण्याचे पाणी थंड व चांगले मिळावे याकरीता एक कुलरची आवश्यकता आहे.

उपरोक्त साहित्य कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी अधिकारी)

**दि.०४.०३.२००६ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल-**

**विषय नं.५०. मिलीटरी गेस्ट हाऊससाठी संस्थानची जागा देणेबाबत.**

**निर्णय क्र. १५४.** मेजर जनरल टी.के.कौल, जनरल ऑफीसर कमाडींग महाराष्ट्र ,गुजरात व गोवा क्षेत्र हेड क्वार्टर, कुलाबा यांनी दिनांक २१/०५/२००४ रोजीचे पत्राने श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणारे सैनिक व त्यांचे कुटूंबीय यांना थांबण्यासाठी गेस्ट हाऊस बांधण्याचे दृष्टीने संस्थानकडे जमिनीची मागणी केली होती.

त्याबाबत व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३०/५/२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक २६८ नुसार संस्था-नला मौजे निमगांव को-हाळे येथील शेती महामंडळाची ( दवाखाना विस्तारीकरण व लोकोपयोगी

कामासाठी ) भू संपादनाने प्राप्त झालेली जमीन हेक्टर ४५-६४ आर पैकी १ ते दीड एकर जमीन देण्याचा निर्णय झालेला आहे.

त्यानंतर त्यांनी संस्थानचे अधिकारी व सैनिक अधिकारी यांनी दिनांक २१/०५/२००४, ०५/०६/२००४ व १९/०६/२००४ रोजी जागेची पाहणी केल्याबाबत दिनांक २३/०६/२००४ रोजीच्या पत्रात नमूद केले तसेच त्यांना जागा निवडणेबाबत कळविले व ११ वर्षे मुदतीच्या ऐवजी ३० वर्षे मुदतीसाठी जागा देण्यात यावी अशी मागणी केली.

उपरोक्त त्यांच्या मागणीबाबत मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि ३१-७/०१-०८/२००४ रोजीच्या बैठकीत निर्णय क्रमांक ३८० खालीलप्रमाणे झालेला आहे.

(ए ) मिलीटरी खात्याने मागणी केलेली प्रथम पसंतीची मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं ८० व ८५ मधील १ एकर १० गुंठे जमीन त्यांना न देता त्यांनी पर्यायी दुस-या पंसतीची मागणी केलेली गट न ८७ व ८८ मधील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास दिलेल्या जागेचे लगत उत्तरेस असलेली १ एकर २० गुंठे क्षेत्र त्यांना देण्यात यावी.

(ब) व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३०-०५-२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक २६८ अवये लिव्ह ॲड लायसेन्स तत्वावर ११ वर्षे मुदतीसाठी जमीन देण्यास मान्यता देण्यात आली होती. परंतु सैनिक खात्याच्या विनंतीनुसार मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पूर्व परवानगी घेऊन सदर जागा ३० वर्षे मुदतीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात यावी. सदरचा ३० वर्षाचा कालावधी संपलेनंतर त्यासाठी पुढील कालावधीसाठी परस्परांच्या संमतीने व सहमती झालेल्या अटीनुसार कराराचे नुतनीकरण करण्यात यावे.

(सी ) जागेचे वार्षिक भाडे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ठरवून घेण्यात यावे, अथवा हे भाडे ठरविण्याची वेगळी शासन मान्य कार्यपध्दती असल्यास त्याप्रमाणे भाडे ठरविण्यात यावे.

(डी ) यासाठी करारनाम्याचा मसूदा संस्थानचे वकीलकडून तयार करुन घेण्यात यावा.

(इ ) याबाबत करावयाच्या करारनाम्यातील स्टॅम्पडयुटी व रजिस्ट्रेशन चार्जेसचा पूर्ण खर्च मिलीटरी खात्यामार्फत व्हावा/ त्या खात्याने सोसावा.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे मेजर जनरल ऑफिसर कमाडींग, कुलाबा यांना दि.२३/६/२००४ व ३०/०८/२००४ अवये मा. व्यवस्थापन मंडळाच्या उपरोक्त निर्णयातील अटी व शर्ती मान्य आहेत किंवा कसे हे कळविणे बाबत पत्र दिलेले होते. त्यानुसार मेजर जनरल टी.के.कौल, जनरल ऑफीसर कमाडींग महाराष्ट्र ,गुजरात व गोवा क्षेत्र, हेड क्वार्टर, कुलाबा यांनी दिनांक ०३/०९/२००४ चे पत्रानुसार त्यांना अटी व शर्ती मान्य आहेत असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम २००४ अंमलात आला त्यामुळे मिलीटरी खात्याला देण्यात यावयाच्या जमिनीबाबत मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य ,मुंबई यांची परवानगी घेण्याच्या ऐवजी महाराष्ट्र शासनाकडे परवानगी मिळविण्यासाठी दिनांक २०/०९/२००४ रोजीचे पत्राने विनंती केलेली आहे. अद्याप पावेतो परवानगी मिळालेली नाही.

मिलीटरी खात्याला देऊ केलेली जागा ही शिरडी शहराच्या जवळ आहे.साई भक्तांचे सुखसोयी करण्यासाठी संस्थानला आवश्यक आहे,म्हणून कर्नल कमांडट,हेडक्वार्टर,अेअर डिफेन्स, नाशिक रोड, यांना दिनांक २३/११/२००५ रोजीच्या पत्राने विनंती केलेली होती.

सदर पत्रास अनुसरुन ऑफिशियरिंग कर्नल हेडक्वार्टर,महाराष्ट्र ,गुजराथ व गोवा यांनी दिनांक २९/१२/२००५ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे की, सध्या मंजूर केलेल्या उत्तरेची जागा त्यांना मान्य आहे.व याबाबत त्यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेशी समक्ष चर्चा केलेली आहे.

दिनांक १३/१२/२००५ रोजी त्यांनी वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे बरोबर जागेची पहाणी केलेली आहे. मा.अध्यक्ष महोदय व लेफ्टनट कर्नल सुनिल तांदळे यांचे बरोबर झालेल्या चर्चेत सध्या देऊ केलेल्या जागेच्या साधारण १०० ते २०० मीटर अंतरावरची जागा प्रस्तावित आहे. याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचे बरोबर दिनांक २५/१२/२००५ रोजी चर्चा केलेली आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त बाबींवर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**०१)** मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाची भू-संपादनाने घेण्यात येणारी गट नं.८७ व ८८ मधील पूर्वी संस्थानने देऊ केलेली जागेच्या ऐवजी त्याच गट नंबर मधील नकाशात दर्शविल्याप्रमाणे जागेच्या साधारण १०० ते २०० मीटर अतंरावरील मिलीटरी खात्यास हे. ००-६० आर जागा देण्यात यावी.

**०२)** सदरची निवड झालेली जागा महाराष्ट्र शासनाच्या पूर्व परवानगीने ३० वर्षे मुदतीसाठी भाडेपटृयाने देण्यात यावी.सदरचा ३० वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यापुढील कालावधीसाठी परस्परांच्या संमतीने व सहमती झालेल्या अटीनुसार कराराचे नुतनीकरण करण्यात यावे.

**०३)**जागेचे वार्षिक भाडे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ठरवून घेण्यात यावे.अथवा हे भाडे ठरविण्याची वेगळी शासन मान्य कार्यपध्दती असल्यास त्या पध्दतीने भाडे ठरविण्यात यावे.यासाठी करारनामा मसूदा संस्थानचे वकिलाकडून तयार करुन घेण्यात यावा.याबाबत करारनाम्याचा स्टॅम्प डयुटी व

रजिष्ट्रेशनचा पूर्ण खर्च मिलीटरी खात्याकडून करण्यात यावा. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५१. सि.स.न. २० मधील यापूर्वी बक्षीसपत्राने दिलेली जागा बाजार भावाने खरेदी मिळणेबाबत श्री दत्तात्रय शंकर गोंदकर यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र. १५५.** सि.स.न. २० मधील यापूर्वी बक्षीसपत्राने दिलेली जागा बाजार भावाने खरेदी मिळणेबाबत श्री दत्तात्रय शंकर गोंदकर यांनी दिनांक २०/०१/२००५ चे अर्जान्वये केलेली विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५२. महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी संघ,मुंबई व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी यांना दिलेल्या जागेच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र. १५६.** संस्थानने खालील तपशीलाप्रमाणे भक्तनिवासस्थान इमारतीतील दुकानगाळे साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता वापरांसाठी दिलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी दरमहा फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्त -निवासस्थान गाळा **क्रमांक ०१** | महाराष्ट्र राज्य हातमाग सह. महासंघ मर्यादित मुंबई | **दरमहा रुपये ५००/-** | उत्पादित कापड विक्रीसाठी | ०६-०४-२००५ ते ०५-०३-२००६ |
| ०२ | साईबाबा भक्त -निवासस्थान गाळा **क्रमांक ११** | महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी. | **दरमहा रुपये ५००/-** | माहिती केंद्र चालविणे कामी | २५-०४-२००५ ते २४-०३-२००६ |

उपरोक्तपैकी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई यांनी त्यांचे पत्राने त्यांना देण्यात आलेल्या दुकानगाळयाची मुदत ०५/०३/२००६ अखेर संपत असल्याने करारनाम्याचे नुतनीकरण दिनांक ०६/०३/२००६ पासून दि ०५/०२/२००७ अखेर ११ महिन्यांसाठी करणेबाबत त्यांनी विनंती केलेली आहे."

तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहूरी यांनीही त्यांचे पत्राने त्यांना देण्यात आलेल्या दुकानगाळयाची मुदत २४/०३/२००६ अखेर संपत असल्याने करारनाम्याचे नुतनीकरण दिनांक २५/०३/२००६ पासून दि २४/०२/२००७ अखेर ११ महिन्यांसाठी करणेबाबत त्यांनी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील दोन्ही गाळ्यांना पूर्वीचेच शर्ती-अटींवर मागील परवाना फी मध्ये १०% वाढ करुन लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर गाळ्यांस मुदतवाढ देण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी

**विषय नं.५३. संस्थान आस्थापनेतील अधिकारी आणि कर्मचारी यांना देण्यात येत असलेल्या मनुष्यबळ विकास प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र. १५७.** मनुष्यबळ विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणेस व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०४.२००५ चे सभेतील निर्णय क्र.१७० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार मनुष्यबळ विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनाबाबत दिनांक ०४.०५.२००५ रोजी मुंबई कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत ठरलेप्रमाणे मनुष्यबळ विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे माहे ऑक्टोबर,२००५ पासून संस्थान आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. याबाबत सविस्तर माहिती सर्व सदस्यांना पुरविण्यात आली होती, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.५४. श्री साईबाबा रुग्णालयात काही मानद व काही पूर्ण वेळ पदे भरणे बाबत.**

**निर्णय क्र. १५८.** दि.१२/०२/२००६ रोजी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी रुग्णालय उपसमिती सभेत खालील दोन मानद सल्लागारांची शिफारस केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**०१) <u>व्हिजिटिंग ऑफथॅल्मॉलॉजिस्ट</u>** - व्हिट्रिओ रेटायनल सर्जन, मुंबई डॉ.एस.नटराजन हे एक जेष्ठ तज्ञापैकी असून त्यांच्या सोयीनुसार वरचेवर सेवा देण्यासाठी आमंत्रण देण्यात यावे असे म्हटले आहे. आपण या पूर्वी केलेल्या मानद यादीत यांचे नांव नोंदवून त्यांना आमंत्रण पत्र देता येईल.

**०२) <u>व्हिजिटिंग कार्डियॉलॉजिस्ट</u>** - डॉ.भाटे राहुल गोपाळ हे देखिल वरिष्ठ तज्ञापैकी असून त्यांचेही नांव मानद सल्लागार यादीत घेऊन त्यांनाही आमंत्रित करावे असे मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी सांगितले.

**०३) <u>डॉ.सचिन आनंद</u>** हे दिल्ली येथे काम करीत आहेत. हे क्ष-किरण तज्ञ असून M.D.(Radiology) आहेत. अशा तज्ञांची आपणाला C.T.Scan, Colour dopler इत्यादी मशिन्सवर तपासणीसाठी नितांत आवश्यकता आहे. त्यांच्या सौभाग्यवती लोणी येथे पदव्युत्तर अभ्यासक्रम करीत आहेत. त्या अनुशंगाने ते स्वतः आपल्या संस्थान सेवेत किमान ३ वर्षे राहतील असे त्यांनी म्हटले आहे. मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी दि.११/०२/२००६ रोजीच्या सभेत त्यांची मुलाखत घेऊन त्यांना पात्र ठरविले आहे.

त्यांना रु.३०,०००/- मासिक मानधन देऊन नेमणूक पत्र द्यावे असे आदेश दिले आहेत. तरी त्यांच्या नेमणूकीस मान्यता असावी.

**०४) <u>श्री कुलभैया एस.आर.</u>**यांनी कॅथलॅब टेक्निशियन पदासाठी अर्ज केला आहे. या प्रकारची २ पदे आपल्या कर्मचारी आकृतीबंधात आहेत. या दोन जेष्ठ पदापैकी एका पदावर नेमणूक करण्यासाठी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी दि.११/०२/२००६ रोजीच्या विश्वस्त सभेत मुलाखत घेऊन नेमणूकीसाठी शिफारस केली आहे. त्यांच्या अर्जात त्यांनी म्हटले आहे की त्यांचा सध्याचा पगार रु.१५,०००/- असून त्यांची अपेक्षा रु.२१,०००/- मासिक प्राप्तीची आहे. या पदाचा सुरवातीचा पगार रु.५,००० ते ८,०००/-या कक्षेत बसतो त्यानुसार सुरवातीचे वेतन अंदाजे रु.९,०००/- पर्यंत बसते. परंतु त्यांची सेवा जेष्ठता लक्षात घेता त्यांचा सध्याचा पगार सरंक्षित करुन नेमणूक देता देऊ शकेल.

मा.डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनी खालील अर्जाबाबत निर्णय घेऊन त्यास मान्यता दिली आहे.

मानद पदे - १) व्हिजीटिंग ऑप्थमोलॉजिस्ट - डॉ. एस नटराजन, मुंबई
२) व्हिजीटिंग कार्डीओलॉजिस्ट - डॉ. भाटे राहुल गोपाळ

पुर्णवेळ पदासाठी -

०१) रेडीओलॉजिस्ट - डॉ. सचिन आनंद हे MD असून त्यांची निवड करण्यात आली असून त्यांना विशेष वेतन म्हणून रु. ३०,०००/- प्रति महा देण्यात यावे असे म्हटले आहे. त्यास मान्यता देण्यात आली.

०२)श्री. कुलभैया एस अत्तार, हे कॅथलॅब मधील टेक्निशियनच्या पदासाठी अर्जदार आहेत. त्यांची त्याच पदावर त्यांचा पुर्वीचा पगार संरक्षित करुन (रु. १५,०००/-) नेमणुक करण्यात यावी असा निर्णय झाला.

याच सभेत मा. डॉ. पी. एल. तिवारी यांनी मुबई येथे मुलाखती घेऊन निवड केलेल्या आणखी काही मानद सल्लागारांची नेमणूक करण्यात यावी, अशी शिफारस केली आहे.

मानद पदे -

| | | |
|---|---|---|
| ०१.डॉ. एन. एच. बंका | - | मानद गॅस्ट्रो ऐंटरोलॉजिस्ट |
| ०२.डॉ. आर. सी. पटेल | - | मानद ऑप्थमोलॉजिस्ट |
| ०३.डॉ. डी. एस. सक्सेना | - | मानद कार्डीओलॉजिस्ट |
| ०४.डॉ. हरिराम झुनझुनवाला | - | मानद ऑर्थोपडीक सर्जन |
| ०५.डॉ.अशोक अनंत न्यायाधिश | - | पूर्ण वेळ पॅथोलॉजिस्ट (रु.३० हजार एकत्रित मानधन) |

वरील सर्वांना नेमणूक पत्रे देण्यात यावीत.तसेच खालील उमेदवारांना सहा महिन्यासाठी पूर्वीचे मान्य केलेल्या निर्णयानुसार नियत वेतन देणेत यावे असे ठरले.

<u>बायो मेडिकल इंजिनिअर-</u>

०१. श्री वैभव व्ही.पंडीत

<u>आर.एम.ओ-</u>

०१. डॉ.पूनम बाबासाहेब गवळी
०२. डॉ.आशाताई रावसाहेब गमे
०३. डॉ.गणेश वसंतराव विखे

यानंतर रुग्णालयासाठी शिफारस केलेल्या इको फोम, मुंबई यांच्या उशा ठरल्याप्रमाणे घेण्यात याव्यात, असे आदेश मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी, यांनी दिले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.५५. मा.अध्यक्ष, छाननी समिती, यांचे मानधनाबाबत.**

**निर्णय क्र. १५९.** "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम-४ चे कलम नं.२१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेश तरतूदी केल्यानंतर आणि विश्वस्तव्यवस्थेच्या निधित, शिल्लक राहीली असल्यास,अशा शिल्लक रक्कमेचा,विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या ३० टक्केपेक्षा अधिक नसेल येवढा भाग,समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

**(एक)** राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने एखादया नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था,किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था,सार्वजनीक वाचनालय, रुग्णालय,दवाखाना,निराश्रीत अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतीक संघटनेची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी : किंवा

**(दोन)** स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी :

परंतु,राज्य शासन या पोट - कलमाच्या प्रयोजनार्थ,मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व मान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली , असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील : आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल :

त्यास अनुसरुन महा.प्रबंधक उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्र.ए-१२१५/२००५ दि.१५/१२/२००५ अन्वये मा.उच्च न्यायालयाने निवृत्त न्यायमुर्ती श्री ए.एस.भाटे यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या छाननी समितीच्या अध्यक्ष पदाकरीता शिफारस केलेली आहे, असे महाराष्ट्र शासन जा.क्र. सासवि-२००५/९११/(१२७)/सोळा,विधी व न्याय विभाग मंत्रालय (मुंबई) ३२ यांनी त्यांचे दि. १६/०१/२००६ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. सदर पत्रात नमूद केलेल्या मानधन, भत्ते तसेच पदाच्या अटी व शर्ती व कार्यकक्षा याबाबत व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन योग्य तो प्रस्ताव शासन मान्यतेकरीता पाठविण्यात यावा, असे कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग मंत्रालय यांनी कळविले आहे.

मा.महाप्रबंधक यांनी त्यांचे पत्रात सदरचे कामासाठी संबंधीत समितीचे मा.अध्यक्ष श्री भाटे यांना दरमहा मानधन रु.१०,०००/- व कामाच्या दिवशी प्रतिदिनी रु.५००/- दैनिकभत्ता तसेच प्रवास भत्त्यापोटी दरमहा रु.४०००/- देण्यात यावे असे आदेशीत करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त पत्रानुसार मा. न्यायमूर्ती श्री एस.एस.भाटे (सेवानिवृत्त ) यांना द्यावयाचे मानधन, भत्ते, पदांच्या अटी शर्ती व कार्यकक्षा ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.५६. संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती होणेबाबत ॲड.संजय इं.सलालकर व ॲड. प्रसन्ना अ.बिंगी यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र. १६०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी,फौजदारी,तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत.

सदरचे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेटस् च्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**०१) <u>कोपरगांव कोर्ट :-</u>**सर्वश्री.ॲड.,पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी, डी.व्ही. वझे, जे.के.गोंदकर, रमेशचंद्र ठोळे, श्री. एस.एम.वाघ,राजेश नाईक,बाळासाहेब कोते,(विनामोबदला)

**०२) <u>अहमदनगर कोर्ट :-</u>** सर्वश्री. अशोक पाटील, एन.जी.तांबोळी, ए.आर.गाडेकर

**०३) <u>मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद ) :-</u>** सर्वश्री. ॲड. आर.एन.धोर्डे, अनिल बजाज, विनायक होन, राजेंद्र रघुवंशी,नितीन भवर, बाबासाहेब वाघ,संदीप गोंदकर,

ॲड.कुलदिप पाटील, अंधेरी (इस्ट) मुंबई, व ॲड.विनोद शहा रा.फोर्ट, मुंबई हायकोर्टातील कामे पहाणेसाठी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करणेबाबत टिपणी व्यवस्थापन समितीपुढे विचारार्थ सादर करण्यात आलेले आहेत.

आता ॲड.संजय इं.सलालकर,मु.खोकर ता.श्रीरामपूर व ॲड.प्रसन्ना अ.बिंगी,स्वस्तीक कॉलनी, श्रीरामपूर यांनी वरीलप्रमाणेच श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधात राहाता श्रीरामपूर कोपरगांव अहमदनगर येथील न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी ॲड.संजय इं.सलालकर,मु.खोकर ता.श्रीरामपूर व ॲड.प्रसन्ना अ.बिंगी,स्वस्तीक कॉलनी, श्रीरामपूर, यांची वरीलप्रमाणेच श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संबंधित राहाता, श्रीरामपूर, कोपरगाव, अहमदनगर येथील न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

याचवेळेस मा.विश्वस्त श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी ॲड.डी.वाय.जंगले, अहमदनगर, यांची संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करण्यात यावी, असे सूचित केले त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.५७. संस्थान सेवेत असताना मयत झालेल्या संस्थान कर्मचाऱ्याच्या एका नातेवाईकास अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेणेबाबत.**

**निर्णय क्र. १६१.अ)** श्री रामदेव भैरुलाल शर्मा हे संस्थानचे प्रसादालय विभागाकडे आचारी या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.१२/१२/२००५ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१. दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :-कै.रामदेव भैरुलाल शर्मा

०२. मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- आचारी,प्रसादालय विभाग
०३. संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०९/०५/१९९० ते दि.११/१२/२००५
एकूण सेवा १५ वर्षे ०७ महिने
०४.मृत्यु दिनांक :- १२/१२/२००५

श्री रामदेव शर्मा यांचे दि.१२/१२/२००५ रोजी निधन झाल्याने त्यांचा वारसदार मुलगा नामे श्री घनश्याम रामदेव शर्मा यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री घनश्याम रामदेव शर्मा
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.३०/११/१९७४ (वय वर्षे ३३)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०९ वी पास ,

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार, शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन यापुर्वी संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री घनश्याम रामदेव शर्मा,(मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

सदरबाबत श्रीमती केलाबाई रा.शर्मा (दिवंगत रामदेव शर्मा यांची पत्नी) व त्यांचा मोठा मुलगा नामे ओमप्रकाश रामदेव शर्मा वय वर्षे ३५ यांनी दिवंगत रामदेव शर्मा यांचे जागेवर श्रीमती केलाबाई शर्मा यांचा मुलगा व ओमप्रकाश शर्मा यांचा लहान भाऊ नामे घनश्याम शर्मा यांना नोकरी देणेची संमती असलेबाबत मा.तालुका कार्यकारी दंडाधिकारी राहाता यांचे समोर दि.०१/०२/२००६ रोजी करुन दिलेले प्रतिज्ञापत्र यासोबत सादर केलेले आहे.

श्री घनश्याम यांचे शाळेच्या दाखल्यावर त्यांचे आडनांव जोशी असे नमूद करण्यात आलेले आहे.त्यांना दिवंगत रामदेव शर्मा यांचे जागेवर नेमणूक द्यावयाची झाल्यास त्यांनी त्यांचे आडनांव बदलले बाबतचे शासकीय गॅजेट प्रसिध्दीची प्रत इकडेस सादर करणे आवश्यक आहे.

दिवंगत रामदेव शर्मा यांची पत्नी व मोठा मुलगा नामे ओप्रकाश शर्मा यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रास अनुसरुन दिवंगत शर्मा यांचा मुलगा नामे श्री घनश्याम रामदेव शर्मा यांना,शासन निर्णयातील तरतुदीनुसार ते पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर आडनांवातील बदलाबाबतचे गॅजेट प्रसिध्दीची प्रत इकडील कार्यालयास सादर करणेचे अटीस अधीन राहून नेमणूक देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**ब)** तसेच श्री सुभाष बळवंत शिदोडकर हे संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे अधिक्षक या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.०६/१२/२००५ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :-कै.सुभाष बळवंत शिदोडकर
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान शिर्डी
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०१/११/१९७५ ते दि.०६/१२/२००५
एकूण सेवा ३० वर्षे
०४) मृत्यु दिनांक :- ०६/१२/२००५

श्री शिदोडकर यांचे दि.०६/१२/२००५ रोजी निधन झाल्याने त्यांचा वारसदार मुलगा नामे श्री विवेक सुभाष शिदोडकर यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री विवेक सुभाष शिदोडकर
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.१५/१२/१९८० (वय वर्षे २५)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०३ री पास , विकलांग

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.

त्यानुसार श्री विवेक सुभाष शिदोडकर,(मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे.तथापि सदर अर्जदार हे जन्मजात अपंग आहे.

शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९८/सीआर-३५/९८-१६अ,दिनांक २८ सप्टेंबर १९९८ अन्वये,अपंग व्यक्तींना शासन सेवेत आरक्षण ठेवणेबाबत "अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग-२ वर्ग-४ ( गट ' क ' आणि ' ड ') आरक्षण ठेवण्याबाबतची योजना सन.१९७८ पासून राज्यात लागू करण्यात आलेली आहे. या संदर्भात शासनाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच अपंगासाठी विहित केलेल्या आरक्षणानुसार पदे भरणेबाबतची कार्यवाही करण्याविषयी देखील वेळोवेळी शासनाने सूचित केले आहे.

आता केंद्र शासनाचा अपंग व्यक्ती (समान संधी,संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम,१९९५ लागू झालेला असून सदर अधिनियमातील कलम ३३ नूसार अपंगांना शासन सेवेत ०३ टक्के आरक्षण ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.या संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती शासन परिपत्रक क्रमांक एस. आर.व्ही.१०९७/प्र. क्र. १२/९७/१६-अ,दिनांक ०२ मे १९९८ अन्वये विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन क्र.अपंग १००१/६१/ प्र.क्र.३६/२००२/ १६ अ मुंबई,दिनांक १० मे २००२ (०५) मध्ये ,"अपंग व्यक्ती (समान संधी,संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम २(बी) नुसार अपंग व्यक्तीचे अपंगत्व किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे.म्हणून सर्व मंत्रालयीन विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की,ज्या संवर्ग / पदांकरीता अपंग प्रवर्गासाठी संरक्षण विहित केले आहे,त्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के दर्शविलेले नसल्यास सुधारीत आदेश तात्काळ निर्गमीत करावेत." असे नमूद केलेले आहे.

(०७) हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा,सर्व शासकीय मंडळे, महामंडळे,स्थानिक स्वराज्य संस्था,जिल्हा परिषदा,महानगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेले मंडळे,अनुदानित संस्था यांना लागू होतील.

श्री विवेक सुभाष शिदोडकर, यांनी ते अपंग असलेबाबतचे सिव्हील सर्जन,अहमदनगर यांचेकडील दि.०३/०१/२००६ रोजीचे प्रमाणपत्र सोबत सादर केले असून,त्यात सिव्हील सर्जन अहमदनगर यांनी," He has following disabilities "Cerebral palsy upper limb."His disability is more than ४० % (forty) " असे नमूद केलेले आहेत.

( जन्मत:मेंदूला इजा झाल्याने स्नायु व्यवस्थित काम करीत नाही.त्यात एका हाताला अपंगत्व असून ते ४० % चे वर आहे.)

श्री विवेक सुभाष शिदोडकर (मुलगा) यांना दिवंगत सुभाष शिदोडकर यांचे जागी अनुकंपा तत्वावर नेमणूक देणेबाबत त्यांच्या आई नामे श्रीमती उषा सु.शिदोडकर यांनी त्यांचे संमती पत्र दिलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार नेमणूक द्यावयाची झाल्यास अर्जदाराचे अस्थीव्यंग हे जन्मत:च मेंदूला इजा झालेली असल्यामुळे श्री विवेक शिदोडकर हे ऐकण्यास,बोलण्यास व वर्ग-४ या पदाची कोणती कामे करु शकतील ते नोकरी देणेस पात्र आहेत काय याबाबत वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालये यांनी," श्री विवेक शिदोडकर यांना आकडेवारी समजू शकते तसेच ते हलके / अकुशल काम करण्यास पात्र आहे.(ज्या ठिकाणी जास्त बोलण्याचा प्रसंग येत नाही.अशा ठिकाणी) यामध्ये मदतनीस,झाडांना पाणी घालणे,भक्तांना खोल्या दाखविणेकामी,कार्यालयीन साफसफाई,उदी पाकिटे भरणे व चिटकविणे असे अकुशल काम करण्यास ते पात्र आहेत." असे अभिप्राय दिलेले असून वरिष्ठ प्रशासक रुग्णालये यांनी, "Certified that I have examined Mr.Vivek Subhash Shidodkar,२५ yrs.who is a handicapped applicatnt for employment.He is a sufferer of cerebral palsy.His speech is less clear, but his understanding is as good as average.He can walk easily though not with a speed & also can move his both arms for work.He can be employed in a handicapped reservation category to do non-independent light work." असे अभिप्राय दिलेले आहेत.

मा.जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदगनर,तसेच अपंग असलेल्या व्यक्तीस नेमणूक देणेबाबतच्या शासन निर्णयातील तरतुदी व वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय तसेच वरिष्ठ प्रशासक, रुग्ण्यालये यांचे, श्री विवेक शिदोडकर यांना वर्ग-४ चे पदावर नेमणूक दिल्यानंतर ते कामे करण्यास पात्र असलेबाबतचे अभिप्राय विचारात घेऊन त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.५८. मा.ना.मुख्यमंत्री महोदयांनी पंढरपूर येथे दिनांक १८.०७.२००५ रोजी दिलेल्या आश्वासनाच्या कार्यवाहीबाबत.**

**निर्णय क्र. १६२.** उपरोक्त विषयास अनुसरुन कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई यांनी, संकिर्ण २००५/६४१/(८६)/का.१६,विधी व न्याय विभाग,मुंबई,दिांक ०८/११/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे की, " मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.१८/०७/२००५ रोजी पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिरात पूजा करतेवेळी. " मोठयाप्रमाणात निधी उपलब्ध होणा-या देवस्थानांतील निधीचा विनियोग राज्यातील इतर देवस्थानांच्या विकासासाठी करता येईल काय ते तपासून पाहिले जाईल. " असे आश्वासन दिलेले आहे.

उपरोक्त आश्वासनाच्या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ मधील पोट कलम (२) (ग) मध्ये राज्य शासनाच्या पूर्व परवाानगीने कोणत्याही शैक्षणिक संस्था,क्रिडा अकादमी अथवा संस्था,सार्वजाकि ग्रंथालय दवाखाना,निराश्रीत अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृहे किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अवये नोंदणी केलेली कला व साहित्य क्षेत्रांशी सबंधीत असलेली कोणतीही अय बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी स्थापन करणे व त्यांची देखभाल करणे, स्थनिक - नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थाच्या सोईमध्ये वाढ होण्यासाठी अशा संस्थांना अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगरपंचायतीला वित्त सहाय्य देणे, अशी तरतुद आहे.

तरी आपण सदर आश्वासनाच्याबाबत आपले अभिप्राय त्वरित शासनास कळविण्यात यावेत. जेणेकरुन लवकरात लवकर मुख्यमंत्री कार्यालयास कळविण्यात येईल. असे कळविले आहे

<u>संस्थान मार्फत सध्या चालु असलेल्या व नियोजीत कामाचा तपशिल खालील प्रमाणे-</u>

१) चालु असलेली कामेः-सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल,मंदिर परिसर वॉल कंपाऊंड,वर्ग ४ कर्मचा-यांचे िनवासस्थान,मध्यवर्ती भांडर अंतर्गत रस्ता.नगर मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण,नांदुर्खी रस्ता,पालखी रस्ता,जि.प.शाळा बांधकाम. अंदाजीत रक्कम रुपये १२ कोटी ४३ लाख. (अक्षरी-बारा कोटी त्रेचाळीस लाख मात्र)

२) प्रस्तावित कामेः-पिंपळवाडी रस्ता सुशोभिकरण,नगर-मामाड रस्ता सुशोभिकरण,नगरपंचायतीसमोर कारंजा, निमगांव शिव रस्ता,रुई रस्ता,कनकुरी रस्ता,नाला रस्ता,बिरेगांव रस्ता,शेती महामंडळाचे जमीनीचे रस्ते चारी क्र.१२ पुढील रस्ता.शिडी ते डो-हाळे रस्ता,शिंगणापूर रस्ता,विविध ठिकाणी गावांना कमानी उभारणे. अंदाजीत रक्कम रुपये ६६ कोटी ७० लाख. (अक्षरी-रुपये सहासष्ट कोटी सत्तर लाख मात्र).

३) नियोजीत कामेः-क्रिंडांगण आरक्षण क्र.२५ व २९, बगीचा, पार्किंग,स्विमींग पुल,वळण रस्ता. अंदाजीत रक्कम रुपये-७६ कोटी ९० लाख.(शहात्तर कोटी नव्वद लाख मात्र.)

४) हॉस्पिटल मशिनरी खरेदी :- रुपये १४ कोटी,६४ लाख.

५) संस्थानचे सर्व विभागांचा वार्षिक अंदाजपत्रकीय खर्चः- (औषधे खेरेदी,प्रसादालयास व इतर विभागास माल व मशिनरी खरेदी, कर्मचारी पगार, वैद्यकीय अनुदान,जमीन खरेदी व इतर दैनंदीन खर्च)- अंदाजीत खर्च रक्कम रुपये १४४ कोटी.(अक्षरी रुपये-एकशे चौऱ्येचाळीस कोटी मात्र.)

उपरोक्त सर्व मिळुन सन २००५-२००६ चा वार्षिक एकूण अंदाजे खर्च रुपये-३१४ कोटी, ६७ लाख मात्र. (अक्षरी-तिनशे कोटी, सदुसष्ट लाख मात्र) आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) (अध्यादेशा-न्वये सुधारित) मधील तरतुदीवये छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाच्या मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे. <u>अद्याप छाननी समितीची नियुक्ती राज्य शासनाकडून झालेली नाही</u>.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्राचे दैवत असलेले श्रीक्षेत्र पंढरपूर व तुळजापूर हे तिर्थक्षेत्रे अत्यंत अल्प उत्पन्न असलेली असल्याने त्यांना त्यांचे देवस्थानांचा व गांवाचा विकास करता येत नाही याकरीता या देवस्थानांना त्यांचा विकास करणेसाठी श्रीक्षेत्र पंढरपूर व तुळजापूर यांना प्रत्येकी १ कोटी मदत देण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी-३)

**विषय नं.५९. संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेष देणेबाबत.**

**निर्णय क्र. १६३.** संस्थान कर्मचा-यांना सन २००४ ते २००६ या सालासाठी प्रत्येकी दोन गणवेष देण्यात आले होते. माहे जुलै २००६ मध्ये त्यांस दोन वर्षे पूर्ण होत आहेत. सन २००४ या सालात शिवलेल्या संस्थान कर्मचा-यांचे गणवेषासाठी म्हणून साधारणपणे रु. ९,२५,०००/- (अक्षरी रु.नऊ लाख पंचवीस हजार मात्र)इतका खर्च आलेला आहे.

त्यामुळे संस्थान कर्मचा-यांना यावर्षी परत गणवेष द्यावे लागतील. पगार पत्रकानुसार कर्मचा-यांची संख्या एकूण १००८ अशी आहे. तसेच मा.कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संरक्षण अधिकारी यांची नांवे पगारपत्रकात नाहीत. त्यांचा समावेश यांत केल्यास ही संख्या १०११ इतकी होईल. सदरच्या गणवेषामध्ये संरक्षण विभाग-पहारेकरी, रुग्णालय-नर्स,आया,वॉर्डबॉय, इं.मि.स्कुल, क.वि.मंदिर व औ.प्र.संस्था-शिक्षक,शिक्षिका यांचे गणवेष हे वेगळे असतात. मंदिरातील -चोपदार, पुजारी, सहा.पुजारी यांना दरवर्षी दसरा उत्सवाला नवीनगणवेष दिला जातो. त्यामुळे त्यांचा समावेश ह्या गणवेषात केलेला नाही. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) यांच्या विविध पदांची निश्चिती

अजून झालेली नाही. पदांची निश्चिती झालेनंतर त्यानुसार त्यांचे गणवेषाबाबत त्या त्यावेळी टिपणी तयार करुन त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेता येईल.

कर्मचारी संख्या १०११ पैकी ८१६ पूरुष व १९५ स्त्री कर्मचारी आहेत. १९५ स्त्री कर्मचा-यांपैकी १५६ स्त्री कर्मचारी हया ६ वारी साडया(पैकी ९२ रुग्णालयातील स्त्री कर्मचारी पांढ-या साडया, रुग्णालयातील ५ लिपीक व ३ तंत्रज्ञ, २९ शिक्षीका, २४ स्त्री मदतनीस इतर विभाग व ३ स्त्री पहारेकरी-खाकी) व ३९ स्त्री कर्मचारी(६ रुग्णालय व ३३ इतर विभागातील स्त्री मदतनीस) हया ९ वारी साडी वापरतात.

हयात ८१६ पुरुष कर्मचा-यांपैकी २३७ पुरुष कर्मचारी (४५-शिक्षक,८०-पहारेकरी-खाकी,१९-वाहनचालक,३७-ओ.टी.असि., मेलनर्स, व वॉर्डबॉय-पांढरा,४३(१० महिला व २७ पुरुष)डॉक्टर्स यांना पांढरे फुलॲप्रन व १३ तंत्रज्ञ यांना हाफ ॲप्रन)यांचे गणवेष हे वेगळे असतात.

सर्व १०११ कर्मचा-यांना नेहमीप्रमाणे प्रत्येकी २ गणवेष कापड खरेदी करुन शिवावयाचे आहेत. एकूण १०११ स्त्री व पुरुष कर्मचा-यांच्या गणवेषाचे कापड, साडया, परकर, ब्लाऊज इ.खरेदी व त्याकामी लागणा-या शिलाई खर्चाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| ०१) | पुरुष कर्मचारी गणवेष खरेदी अंदाजे खर्च | रु.०९,९८,३५०.०० |
| ०२) | पुरुष कर्मचारी गणवेष शिलाई अंदाजे खर्च | रु.०१,६३,२००.०० |
| ०३) | स्त्री कर्मचारी साडया खरेदी अंदाजे खर्च | रु.०१,१७,०००.०० |
| ०४) | स्त्री कर्मचारी ब्लाऊज कापड खरेदी अंदाजे खर्च | रु.००,१४,५६०.०० |
| ०५) | स्त्री कर्मचारी ब्लाऊज शिलाई अंदाजे खर्च | रु.००,०३,९००.०० |
| ०६) | स्त्री कर्मचारी परकर खरेदी अंदाजे खर्च | रु.००,१९,४४०.०० |

===========

एकूण गणवेष खर्च अंदाजे रु.१३,१६,४५०.००

===========

तरी उपरोक्तप्रमाणे एकूण कर्मचारी (स्त्री व पुरुष) १०११ साठी गणवेषाचे कापड, साडया, ब्लाऊज, परकर इ.खरेदी व शिलाई कामी अंदाजे रु.१३,१६,४५०.००( अक्षरी रु.तेरा लाख सोळा हजार चारशे पन्नास ) मात्रचा खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थान कायम कर्मचाऱ्यांसाठी (स्त्री व पुरुष) गणवेषाचे कापड, साडया, ब्लाऊज, परकर इ.खरेदी तसेच शिलाई विहीत पध्दतीने करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.१३,१६,४५०.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी-५/अधिक्षक, खरेदी विभाग)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१.** **श्री व्दारकामाई धुनीसाठी गोवरी खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.१६४.** एप्रिल २००६ ते मार्च,२००७ या कालावधीसाठी श्री व्दारकामाई धुनीसाठी अंदाजे ७०,००० किलो शेन गोवरी खरेदी करणेकामी जा.नं. एसएसएस-वशी-मंदिर-२१५१-२००६ दिनांक १६.०२.२००६ अन्वये पत्र पाठवून शेनगोवरी पुरविणाऱ्या पुरवठादारांकडून दिनांक २५.०२.२००६ अखेर कोटेशन्स मागविण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत खालील कोटेशन्सधारकांनी आपली कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव व पत्ता |
|---|---|
| ०१. | श्री विजय पितांबर देवरे, मु.पो.मालेगांव ता.जि.नाशिक |
| ०२. | श्रीमती कुसुमबाई ल ढवळे, मु.पो.साकरवाडी ता.कोपरगांव जि.अहमदनगर |
| ०३. | सौ. मंदाबाई राधुजी गवळी, मु.पो.साकरवाडी ता.कोपरगांव जि.अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव व पत्ता | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर प्रति किलो रुपये |
|---|---|---|
| ०१. | श्री विजय पितांबर देवरे, मु.पो.मालेगांव ता.जि.नाशिक | २.४० |
| ०२. | श्रीमती कुसुमबाई ल ढवळे, मु.पो.साकरवाडी ता.कोपरगांव जि.अहमदनगर | २.२५ |
| ०३. | सौ. मंदाबाई राधुजी गवळी, मु.पो.साकरवाडी ता.कोपरगांव जि.अहमदनगर | २.४० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ.नं. ०२ चे कोटेशन सादरकर्ते श्रीमती कुसूमबाई ल. ढवळे, यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना सन २००६-२००७ करीता शेणगोवरी पुरविणेकामी आदेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२.** **दि.२४.०१.२००६ रोजी मुंबई येथे झालेल्या श्री रामनवमी उत्सव-२००६ पालखी धारकांचे सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.१६५.** दि.२४.०१.२००६ रोजी मुंबई येथे झालेल्या श्री रामनवमी उत्सव-२००६ पालखी धारकांचे सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, ते **सोबत परिशिष्ट "ड"** म्हणून ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार श्रीरामनवमी उत्सवात पालखीसोबत येणाऱ्या भक्तांना थांब्याच्या ठिकाणी मंडप, पिण्याच्या पाण्याची सोय, मोबाईल टॉयलेट व ॲम्ब्यूलन्सची सोय संस्थानतर्फे करण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-प्रशासन शाख,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३. मल्याळम भाषेतून श्री साईसतचरित प्रकाशित करण्यास परवानगी देणे बाबत.**

**निर्णय क्र.१६६.** श्री.एम.आर रामकृष्णन,तिरुविलावामला (केरळ) यांनी त्यांचे दि.२१.११.२००५ चे पत्राद्वारे शिरडी साईराम संस्थान, तिरुविलावामला (केरळ) चे प्रेसिडेन्ट, श्री एम.आर रामकृष्णन हे साईभक्त असून, ते त्यांच्या संस्थानद्वारा श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार व प्रसार करीत आहेत.याबाबत त्यांनी त्यांचे संस्थानद्वारा रुग्णांना मोफत औषधोपचार, मोफत वैद्यकीयशिबीर, शैक्षणिक मदत व गरीबांना अन्नदान याप्रमाणे कल्याणकारी योजना राबवित असून, तेथील साईभक्तांसाठी इंग्रजी साईसत्चरितांचे विनामुल्य वाटप करीत असतात. तथापि,बरेच मल्याळम साईभक्तांना इंग्रजी भाषा अवगत नसल्याने त्यांचेसाठी उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे त्यांनी साईसत्चरित मल्याळम भाषेतून प्रकाशित करण्याची इच्छा दर्शविली आहे.श्री साईबाबांच्या जीवनाविषयी त्यांच्या शिकवणूकीविषयी जास्तीत जास्त मल्याळम भक्तांना फायदा व्हावा यासाठी ते इंग्रजी भाषेतील साईसत्चरितांचे मल्याळम भाषेत रुपांतर करुन त्यांचे संस्थान द्वारा प्रकाशित करु इच्छित आहेत. त्यासाठी त्यांनी संस्थानची परवानगी मागीतली आहे. संस्थानने परवानगी दिल्यास ते इंग्रजी साईसत्चरितांचे मल्याळम भाषेत रुपांतर करुन छपाई करुन मल्याळम साईसत्चरित भक्तांसाठी विनामुल्य वाटणार असलेबाबत कळविले आहे. त्यामुळे सर्व मल्याळम साईभक्तांना श्री साईबाबांच्या जीवनाविषयी माहिती प्राप्त होऊ शकेल असे नमूदकेले आहे.

श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच मुळ संहितेत बदल न करता पुस्तक प्रकाशन करण्याचे अटीवर तसेच भाषांतर करुन ना नफा ना तोटा धर्तिवर पुस्तक प्रकाशनास त्यांना परवानगी देता येईल. संस्थानने मल्याळम भाषेत श्री साईसत्चरित अद्याप प्रकाशित केलेले नाही.

तरी श्री.एम.आर रामकृष्णन,प्रेसिडेन्ट, शिरडी साईराम संस्थान, तिरुविलावामला (केरळ) यांना इंग्रजी साईसत्चरिताचे मल्याळम भाषेत रुपांतर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, केरळ विद्यापीठाकडून या पुस्तकाचे भाषांतराबाबत अभिप्राय घेण्यात यावा व त्यानंतर पुस्तक प्रकाशित करणेत यावे, असे ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४. श्री साईलीला नियतकालिक अंकाची पाकीटे छपाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६७.** मुंबई कार्यालय यांचे दि.२५.०२.२००६ चे फॅक्स पत्रानुसार संस्थान प्रकाशित श्री साईलीला (मराठी) व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) नियतकालीकांचे अंक टपालाद्वारे पाकिटातून पाठविणेसाठी लागणा-या छापील पाकीटांचा साठा संपत आल्याने सन.२००६-२००७ करीता आवश्यक असणारी श्री साईलीला (मराठी) व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) नियतकालीकांचे अंक टपालाद्वारे पाकिटातून पाठविणेसाठी लागणा-या छापील पाकीटे छपाई करुन घेणे आवश्यक असल्याचे मुंबई कार्यालय अधिक्षक यांनी कळविले आहे.

श्रीसाईलीला अंक टपालाने पाठविणेसाठी छापील पाकीटे मुंबई कार्यालयाकडील दि.२५.०२.२००६ चे पत्रानुसार श्री साईलीला (मराठी) २,००,००० नग व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) - ३,००,००० नग असे एकूण ५,००,००० नग पाकीटे छापून घेणे गरजेचे आहे.सदरची पाकीटे मुंबई येथील प्रेस धारकांकडून कोटेशन मागवून छपाई करुन घेता येईल.

तरी श्रीसाईलीला (मराठी) २,००,००० नग व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी) -३,००,००० नग असे एकूण ५,००,००० नग पाकीटे छपाईकामी मुंबई येथील प्रेसधारकांकडून छपाईकामाचे कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे एकूण रुपये ५,००,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला (मराठी) २,००,००० नग व श्री साईलीला (इंग्रजी-हिन्दी)-३,००,००० नग असे एकूण ५,००,००० नग पाकीटे छपाईकामी मुंबई तसेच स्थानिक प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागवून छपाई करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रुपये ५ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५. श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल या दोन्ही रुग्णालया संबंधी मा.उपाध्यक्ष यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.१६८.** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल या दोन्ही रुग्णालया संबंधी मा.उपाध्यक्ष यांचे पत्राबाबत. तयार करण्यात आलेल्या टिपणीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होता. त्याची नोंद घेण्यात येऊन, ती सोबत **परिशिष्ट "इ" म्हणून** ठेवण्यात आलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तकामी खालील समितीची नियुक्ती करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| ०१. | मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष | समिती अध्यक्ष |
| ०२. | मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग, | सदस्य |
| ०३. | मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर, | सदस्य |
| ०४. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | सदस्य |
| ०५. | मा.श्री.कैलास गोविंद कोते | सदस्य |

उपरोक्त समितीने श्रीसाईनाथ रुग्णालय व श्रीसाईबाबा हॉस्पिटल या दोन्ही रुग्णालयासंबंधी तोट्याचे नियोजन व उपाययोजनेबाबत विचार-विनिमय करुन त्याबाबतचा अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा, असें ठरलें. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६. साईप्रसाद नं.०१ इमारतीमधील खोल्यांचा सेवाआकार वाढविणे बाबत.**

**निर्णय क्र.१६९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७. संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती होणेबाबत ॲड.अविनाश जनार्दन बोठे पाटील, राहाता यांचा अर्ज.**

**निर्णय क्र.१७०.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी,फौजदारी,तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत.
सदर चे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेटस् च्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.
**०१) कोपरगांव कोर्ट :-**सर्वश्री.ॲड.,पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी, डी.व्ही. वझे, जे.के.गोंदकर, रमेशचंद्र ठोळे, श्री. एस.एम.वाघ,राजेश नाईक,बाळासाहेब कोते,(विनामोबदला)
**०२) अहमदनगर कोर्ट :-** सर्वश्री. अशोक पाटील, एन.जी.तांबोळी, ए.आर.गाडेकर
**०३) मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद) :-** सर्वश्री. ॲड. आर.एन.धोर्डे, अनिल बजाज, विनायक होन, राजेंद्र रघुवंशी, नितीन भवर, बाबासाहेब वाघ,संदीप गोंदकर,
**०१) हायकोर्ट मुंबई :-** सर्वश्री ॲड.कुलदिप पाटील .अंधेरी (इस्ट) मुंबई,ॲड.विनोद शहा फोर्ट मुंबई ॲड. संजय इं.सलालकर,मु.खोकर ता.श्रीरामपूर व ॲड.प्रसन्ना अ.बिंगी,स्वस्तीक कॉलनी,श्रीरामपूर यांनी वरिल प्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधात राहाता श्रीरामपूर कोपरगांव अहमदनगर येथील न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत टिपणी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर केलेली आहे.

आता, ॲड.अविनाश जनार्दन बोठे पाटील, मु.पो. राहाता ता.राहाता जिल्हा अहमदनगर यांनी दि.११/०२/२००६ रोजी विनंती अर्ज करुन त्यात, मी गेल्या २६ वर्षापासून दिवाणी,महसूली,सहकार,लवाद फौजदारी इ. विविध न्यायालयात राहाता कोपरगांव,श्रीरामपूर, संगमनेर, नगर औरंगाबाद नाशिक इ. ठिकाणी कामे केलेली आहेत व करीत आहे. मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था यांना भू संपादन कारवाई,विविध करारांचे मसुदे तयार करणे,जमिन हस्तातरणाचे खरेदी विक्रीचे मसुदे तयार करणे, विविध शासकिय कार्यालयात, न्यायालयामधे संस्थानचे वकिल म्हणून काम करणे, विश्वस्त मंडळाचे बैठकाचे वेळी हजर राहून कायदेशीर सल्ला अभिप्राय देणे इ. कामे करणेस तयार आहे. तरी माझी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक करावी अशी विनंती केली आहे.

तरी ॲड. अविनाश जनार्दन बोठे पाटील,राहाता यांची वरीलप्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधीत राहाता,श्रीरामपूर कोपरगांव,अहमदनगर,औरंगाबाद, नाशिक इ. ठिकाणी न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूकीस मान्यता देणेबाबचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८. नवी दिल्ली येथे संस्थानचे माहितीकेंद्र सुरु करणे बाबत**

**निर्णय क्र.१७१.** दिल्ली व आजुबाजूच्या परीसरातील अनेक भाविक दरवर्षी श्री साईबाबांचे दर्शनाकरीता शिरडी येथे भेट देत असतात. संस्थानमध्ये रहाण्याची व दर्शनाची सोय सहजासहजी उपलब्ध होत नसते. तसेच याबाबतची सविस्तर माहिती देण्याची सोय राजधानीत (दिल्लीत) नाही. त्या पार्श्वभुमीवर श्री. गणेश रामदासी, उपसंचालक (माहिती), महाराष्ट्र परीचय केंद्र, नवी दिल्ली यांनी दिल्ली येथे संस्थानचे एक माहिती केंद्र असावे, याबाबत मा.अध्यक्ष साहेब यांचे समवेत चर्चा केली आहे.

याबाबत श्री.गणेश रामदासी,उपसंचालक यांनी दि.०३/१२/२००४ चे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क खात्याचे महाराष्ट्र परिचय केंद्र, नावाचे हे कार्यालय दिल्लीत आहे. दिल्लीचे हृदय

म्हणून ओळखल्या जाणा-या कॅनॉट प्लेस या भागात हे कार्यालय असून, या कार्यालयाच्या आजूबाजूला सर्वच राज्यांची पर्यटन कार्यालये तशीच माहिती कार्यालये आहेत. राजधानीतील सर्वच प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींचा व अति महत्वाच्या व्यक्तींचा या कार्यालयाशी सातत्याने संपर्क आहे. सर्व राज्याची पर्यटन कार्यालय या भागात असल्यामुळे अनेक भाविक शिर्डी संस्थानची माहिती मागण्यासाठी याच कार्यालयात येतात ही माहिती देण्याची व्यवस्था येथे नसल्याने ते भाविक नाउमेद होवून परत जातात. या सगळया बाबींचा विचार करता संस्थानचे माहिती केंद्र या कार्यालयाशी संलग्न असावे असे वाटते. महाराष्ट्र परिचय केंद्राकडे जागा व इन्फ्रास्ट्रक्चर तसेच मनुष्यबळ उपलब्ध आहे. सुशोभिकरण व सदरील जागा तिस-या मजल्यावर असल्याने लिफ्टची तांत्रिक अडचणी पूर्ण केल्यास संस्थानची अद्यावत माहिती भाविकांना देण्याची व्यवस्था करणे या कार्यालयास शक्य होईल. त्याचप्रमाणे भाविकांची गैरसोय टळेल.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि. २७/१२/२००४ चे सभेत चर्चा होउन आर्कीटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवी दिल्लीयांचे मार्फत पहाणी करुन खर्चाचा अहवाल घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे मा. अध्यक्ष सो., व कार्यकारी अधिकारी यांनी आर्कीटेक्ट काप्रे यांचे समवेत सदर कार्यालयाची पहाणी केली चर्चेप्रमाणे आर्कीटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवी दिल्लीयांनी याकामी खालील प्रमाणे रु. २९,७२,८३५/- खर्चाचे एस्टीमेट सादर केले आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | साईट डेव्हलपमेंट | ८,३१०.०० |
| ०२. | सिव्हील कामासाठी | ८,७५,३३.०० |
| ०३. | प्लबिंग सॅनिटरी काम | ४३,०००.०० |
| ०४. | इलेक्ट्रीक फिटींग | १५,२१,४४०.०० |
| ०५. | इंटेरीअर कामाकरिता | २,९३,७५२.०० |
| ०६. | फर्निचर करीता | २,३१,०००.०० |
| | | २९,७२,८३५.०० |

सदर कामासाठी उपरोक्त जागा संस्थानकडे हस्तांतरीत केल्यास संस्थान निधीतून खर्च करता येईल. करीता महाराष्ट्र परिचय केंद्राची जागा संस्थानकडे हस्तांतरीत करणेसाठी वेळोवेळी पत्रव्यव्हार करण्यात आला आहे. महाराष्ट्र परिचय केंद्राचे गणेश रामदासी यांनी दि. २७/०२/२००६ रोजीचे पत्रान्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मार्गदर्शनानुसार आपले विश्वस्त व्यवस्थेकडे माहिती केंद्राची जागा तात्पुरत्या स्वरुपात ५ वर्षासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. करीता आवश्यक कामे तातडीने हाती घेण्यास हरकत नाही असे कळविले आहे.

सदरची जागा तात्पुरत्या स्वरुपात संस्थानकडे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधिल कलम २१(२) अन्वये संस्थान निधीतून काम हाती घेणेसाठी मान्यता मिळणेकामी न्याय व विधी विभागाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाकडे सदरचा प्रस्ताव सत्वर मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९.** **पालखी घेऊन येणाऱ्या भक्तांसाठी सिन्नर ते शिर्डी दरम्यान थांब्यांसाठी जागा उपलब्ध करणेबाबत**
**निर्णय क्र.१७२.** मुंबई ते शिर्डी पालखी घेवून येणाऱ्या साईभक्तांसाठी पहिल्या टप्प्यात सिन्नर ते शिर्डी दरम्यान मुक्कामासाठी शेड, लाईट, पाणी व स्वच्छतागृह इत्यादी व्यवस्था करणेसाठी दिनांक ०९/०२/२००६ रोजी जागेची पहाणी केली . त्यावेळी मा.आ.जयंतराव ससाणे अध्यक्ष, मा.आ. श्री. मानिकराव कोकाटे, मा.श्री. सुरेश वाबळे, संस्थान अधिकारी व इतर संबधीत यांचे समवेत जागेची पाहाणी करणेत आली

**अ)** **सिन्नरः-** सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत सिन्नर यांचेकडील जागेची पहाणी केली. संस्थानला द्यावयाच्या सदर जागेबाबत त्यांनी दि. २०/०२/२००६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

०१. संस्थेमधील संस्थानास द्यावयाची जागा ही ९८ वर्षाचे दिर्घ मूदतीच्या भाडेपट्टयाने देण्यात येईल.

०२. सदर जागेवर बांधकाम करावयाचे शेड व इतर बाबींचे नकाशे तयार करुन ते नकाशे मा. नगररचना विभागाकडून मंजूर करुन घ्यावे लागतील.

०३. सदर जागेवरील शेडकरीता २४ तास पाणी पूरवठा व वीज पूरवठा उपलब्ध राहील मात्र त्यासाठी येणारा खर्च संस्थानला करावा लागेल.

०४. संस्थेची कार्यालयाशेजारील जागा ३६०० चौ.मी. क्षेत्राची वाणिज्य वापराची आहे त्या जागेचे रु. २००/- प्रती चौ.मी. प्रमाणे रु. ७,२०,०००/- संस्थेकडे भरणा करावी लागेल.मा. दुय्यम निबंधक श्रेणी-१ सिन्नर, यांनी दिलेल्या दिनांक २८/०२/२००६ पत्राप्रमाणे दर चौ.मी.ला रु.२७५/- प्रमाणे रु.९,९०,०००.०० किंमत येत आहे. त्यांनी नमूद केलेली किमंत कमी आहे.

०५.	संस्थेची प्लॉट क्रं.-बी-१११ समोरील जागा २३,८०० चौ.मी. क्षेत्राची खुली जागा आहे त्या जागेचे रु.२००/- प्रती चौ.मी.प्रमाणे रु.४७,६०,०००/- संस्थेकडे भरणा करावी लागेल. मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१ सिन्नर, यानी दिलेल्या दिनांक २८/०२/२००६ चे पत्राप्रमाणे दर चौ.मी.रु.२७५/- प्रमाणे एकूण जागेची किमंत रु.६५,४५,०००.०० होत आहे. त्यांनी नमूद केलेली किंमत कमी आहे.

०६.	तरी वरील पैकी अ.नं.४ अथवा ५ ची जागा पालखी थांब्यासाठी घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**ब)** **<u>फर्दापूर ता.सिन्नर</u>:-** गट नं. ६७/२ फर्दापूर शिवार, ता. सिन्नर येथील श्री. भाऊसाहेब त्रंबक रानडे यांच्या जागेची पहाणी केली. त्यांचेकडे नाशिक शिर्डी रस्त्यालगत शिर्डी पासुन सुमारे ४५ कि.मी. अंतरावर ४२ आर क्षेत्र शिल्लक आहे. सदर जमीन त्यांनी रु.१२,६०,०००.०० मात्र रकमेस देण्यास तयार असल्याचे दि. २७/०२/२००५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१ सिन्नर, यांनी दिलेल्या दिनांक २८/०२/२००६ चे पत्राप्रमाणे हेक्टरी मुल्यांकन रु. १,०६,०००/- दिले आहे. त्यानुसार वरील क्षेत्राचे मुल्यांकन रु.४४,५२०/- इतके येईल.

**क)** **<u>वावी</u> :-** गट नं. १६/१ वावी शिवार, ता. सिन्नर येथील श्री. ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर यांची जागेची पहाणी केली. त्याचेकडे नाशिक शिर्डी रस्त्यालगत शिर्डी पासुन सुमारे ३३ कि.मी. अंतरावर ०१ हेक्टर ७४ आर क्षेत्र असून त्यापैकी त्यांचेकडे दोन एकर क्षेत्र संस्थानकरीता देणेबाबत चर्चा करण्यात आली होती. परंतू त्यांनी १ हेक्टर ६० क्षेत्रा पेक्षा कमी क्षेत्र देण्यास नकार दिला. सदर क्षेत्रासाठी किंमत रु. ११.०० लाख तसेच खरेदीचा खर्च संस्थानने करावा असे दि. २१/०२/२००६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. मा. दुय्यम निंबधक श्रेणी -१ सिन्नर यांनी दिनांक २८/०२/२००६ रोजी पत्राप्रमाणे हेक्टरी मुल्यांकन रु.१,४०,०००/- इतके दिले आहे. त्यानुसार वरील क्षेत्राचे मुल्यांकन रु.२,२४,०००.०० इतके होईल.

**ड)** **सायाळे येथील जागा:-** ग्रामपंचायत गावठाणाची सुमारे दोन एकर जागा गावच्या दक्षिणेस उपस्थित सरपंच व इतरांनी दाखविलेली सदर जागा संस्थानचे नावे हस्तातरीत करणेस तोंडी सहमती दिली तसा ठराव व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता ग्रामपंचायतीकडून करण्यात येत आहे असे सरपंच व ग्रामसेवक यांनी दि. २२/०२/२००६ रोजी शिर्डी येथील भेटीत सांगितले. सायळे ग्रामपंचायतीकडून पुर्तता झालेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे-

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव 'अ',' ब' व 'क' वर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

अ) सिन्नर न्येथील जागा ९८ वर्षाचे दिर्घ मूदतीचे भाडेपट्ट्याने तसेच ब) फर्दापूर क) वावी न्येथील जागा खरेदीने घेणेस मान्यता देणेबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिन्नर तालुकासहकारी वसाहत सिन्नर यांचेकडील संस्थेच्या कार्यालयाजवळील ३६०० चौ.मी. जागा९८ वर्षाचे दीर्घ मुदतीचे भाडेपट्ट्याने नाममात्र रकमेत मिळणेसाठी विनंती करण्यात यावी. त्यांनी नाममात्र रकमेत सदरची जागा न दिल्यास त्यांनी देऊ केलेल्या रुपये ७,२०,०००/- मात्र रक्कमेस ९८ वर्षाचे भाडेपट्टयाने घेण्यात यावी.

तसेच सदर जागेत भक्तांना राहाण्यासाठी अद्ययावत शेड व संडास बाथरुम, कम्पाऊंड भिंत तसेच साईट Development इत्यादी कामांसाठी आराखडा तयार करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरलें.

ब) फर्दापुर येथील श्री.भाऊसाहेब त्र्यंबक रानडे यांनी ४२ आर साठीची किंमत रु.१२,६०,०००/- इतकी मागणी केली आहे. सदर किंमत फारच जास्त आहे त्यामुळे सदर जागा खरेदी करणे सध्या स्थगित ठेवावी असें ठरलें.

क) वावी येथील श्री.ज्ञानेश्वर निवृत्ती खांबेकर आज सभेपुढे उपस्थित होते. त्यांना दर कमी करणेबाबत विनंती करण्यात आली. शासकीय मूल्यांकनाचे दर फारच कमी आहेत. रु.११.०० लक्ष इतक्या रक्कमेस सदर जागेची मागणी दुसऱ्या ग्राहकांनी केली आहे. परंतू संस्थानला आग्रक्रमाने जागा देत आहोत असे सांगितले.

याबाबत साधक-बाधक चर्चा होऊन, सदर जागा रुपये ११.०० लक्ष इतक्या किमतीस खरेदी करणेचे ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १०.** **निमगांव-कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाकडून संस्थानने घेतलेल्या जमीनीला तारकुंपन करणे बाबत.**

**निर्णय क्र.१७३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११.** **साईआश्रम व साईविश्राम प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.१७४.** शिर्डी साई ट्रस्ट, तामिळनाडू यांचेमार्फत साईभक्तांचे सोईकरीता "साई विश्राम" वृध्दाश्रम व अनाथालय यांचेकरीता "साई विश्राम" तसेच ध्यान करण्यासाठी साईध्यान प्रकल्प देणगी स्वरुपात करुन देणार आहेत. याबाबत संस्थान व शिर्डी साई ट्रस्ट यांचेमध्ये करार झालेला आहे.

साई आश्रम व साई विश्राम या बांधकामाचे प्लॅन करीता खालील तीन आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन मागविण्यात आले होते.

०१) डी.ओ. निकम, पुणे
०२) ए.एम. शेख, अ.नगर
०३) अरविंद वैद्य, अ.नगर

उपरोक्त तिनही आर्किटेक्ट यांनी सादर केलेले प्लॅन, सी.डी. तसेच त्यांचे फर्म बाबतची सविस्तर माहिती शिर्डी साई ट्रस्टचे श्री. रमणी यांना पाठविण्यात आली होती. तसेच त्यांना आलेल्या शंकाचे निवारण व प्रकल्पाकरीता इतर आवश्यक असलेली माहिती आर्किटेक्ट यांचेकडून श्री. रमणी यांना देण्यात आली होती. त्यांनी सादर केलेल्या माहितीनुसार तीन आर्किटेक्ट यांची "साई आश्रम" या प्रकल्पाकरीता १० महत्वाचे मुद्दे विचारात घेवून तुलना केली असल्याचे त्यांनी दिनांक २१/०२/२००६ चे पत्रान्वये कळविले आहे. त्यांनी तुलनात्मक दृष्ट्या सादर केलेल्या अहवालावरुन श्री डी. ओ. निकम, पुणे यांची साई आश्रम व साई विश्राम या प्रकल्पाकरीता निवड केल्याचे कळविले आहे. त्यांची २% फी सर्व खर्चासह निम्नतम सादर झालेल्या १.५% निम्नतम फी पेक्षा जास्त आहे. संस्थानने त्यांचेशी चर्चा करुन सर्व खर्चासह १.५% फी अथवा प्रकल्पाकरीता लमसम फी ठरविण्यात यावी असे कळविले आहे. आर्किटेक्ट यांनी कोणती सेवा दयावयाची आहे, याबाबत संस्थानने पुन्हा review घेता यावा या करीता सविस्तर यादी सादर केली आहे.

प्रस्तावित साईध्यान प्रकल्पाकरीता श्री.ए.एम.शेख, क्रिएटिव्ह आर्किटेक्ट, अ.नगर यांचा विचार करता येईल असे कळविले आहे.

आर्किटेक्ट यांची नेमणूक झाल्याचे त्यांना कळविण्यात यावे म्हणजे पुढे सविस्तर डिझाईन बाबत आर्किटेक्ट यांचेशी चर्चा करुन प्लॅन अंतिम करता येईल असे कळविले आहे. आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांची व्यवस्थापन समिती दि. ०५/११/२००५ रोजीचे निर्णय क्र.७३० नुसार या प्रकल्पासाठी नेमणूक करणेबाबत तसेच याकामी त्यांना २% फी अधिक सर्व्हिस टॅक्स अदा करण्यात यावी, असे ठरले आहे. श्री.डी.ओ.निकम यांचे समवेत फी बाबत चर्चा करता येईल.

आजचे सभेपुढे Dormitory बांधकामासाठी तयार केलेला आराखडा आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांनी चित्रफितीव्दारे सदस्यांना दाखविला, तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे, यांनी हॉल व खोल्या यांचा सुधारित आराखडा व एस्टिमेट तयार करावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे, यांना सदर प्रकल्पासाठी १.५% फि + सर्व्हील टॅक्स व येण्या-जाण्याच्या खर्चाची प्रतीपूर्ती देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२. गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना भक्तनिवास येथील (स्टॉल) साईगंगाची विक्री करणेकामी गाळयाचे भाड्याबाबत.**

**निर्णय क्र.१७५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३. श्री वसंत महादू गोंदकर, रा.शिर्डी यांनी मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दाखल केलेला दावा समझोत्याबाबत.**

**निर्णय क्र.१७६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४. मा.विश्वस्त श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांचे दिनांक ०४ मार्च,२००६ चे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.१७७.** मा.विश्वस्त श्री रमाकान्त गणेश कर्णिक यांनी त्यांचे दिनांक ४ मार्च,२००६ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान स्वत:कडे घेतांना साईबाबांच्या मंदिरास भक्तजनांकडून प्राप्त होणाऱ्या देणग्यांचा उपयोग कल्याणकारी योजनांसाठी करण्यात यावा असे धोरण शासनाने नमूद केले होते. त्या धोरणानुसार श्रीसाईबाबा रुग्णालयाचे आधुनिकीकरण, पदयात्रींसाठी सेवासुविधा असे उपक्रम सुरु करण्याचे निर्णय व्यवस्था कमिटीने घेतले. त्या भक्तजनांकडून निर्णयांचे मोठे स्वागत झाले आहे. या धोरणास अनुसरुनच पूढीलप्रमाणे प्रस्ताव आजचे सभेत सादर केला होता.

०१. श्री साई कल्याण निधी स्थापन करण्यात यावा.
०२. श्री साईबाबा संस्थानने त्या कल्याण निधीस रुपये १० कोटींची देणगी द्यावी.
०३. अंध, अपंग,मूक-बधीर, मतीमंद यांच्या धर्मादाय संस्थांना त्या निधीतून अर्थसहाय्य करण्यात यावे.
०४. रुग्णाईत भक्तांनाही उपचारासाठी त्या निधीतून आर्थिक सहाय्य करण्यात यावे.
०५. उपचारासाठीचे एकूण आर्थिक सहाय्य गरजू रुग्णांसाठी अडीच लाखापेक्षा अधिक नसावे व ते एकदाच देय ठरविण्यात यावे.
०६. ह्रदय, किडणी, मेंदू अवयवाचे रोपन इत्यादी अतिगंभीर कारणासाठीच गुणवत्तेच्या तसेच रुग्णाईतांच्या कुटूंबियांच्या आर्थिक क्षमतेच्या संदर्भातच अर्थसहाय्य देण्याचा विचार विश्वस्त व्यवस्था समितीने करावा.

०७. मंजूरीसाठी उपरोक्त योजना शासनास सादर करण्यात यावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत अधिनियमाचे तरतूदीस अधिन राहून व त्यानुसार तपासणी करुन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा असे ठरलें.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५. माहे फेब्रुवारी-मार्च,२००६ अखेर उपलब्ध रकमांच्या गुंतवणूकी बाबत.**

**निर्णय क्र.१७८.** माहे फेब्रुवारी-मार्च, २००६मध्ये मुदत पूर्ण होणाऱ्या व इतर उपलब्ध गुंतवणूकपात्र रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | बँकेचे नाव | मुदतपूर्तीचा दिनांक | मुदतीअंती उपलब्ध रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी (स्टाफ बेनेफीट फंड) | २५.०२.२००६ | ४,१०,६२१.०० |
| ०२. | सारस्वत को.ऑप बँक लि.नाशिक | २३.०३.२००६ | ४,४४९.०० |
| ०३. | माहे मार्च ,२००६ अखेर दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम रुपये | | **निरंक** |

उपरोक्त गुंतवणूकीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(अ) अ.नं.१ मध्ये नमूद केलेली रक्कम संस्थान कर्मचारी कल्याण-निधीची असल्याने पूर्वीपासून सदरची रक्कम ही त्याच बँकेकडे प्रचलीत व्याजदराने गुंतविण्यात येत आहे. त्यामुळे सदरची रक्कम ही त्याच बँकेकडे प्रचलित व्याज दराने (द.सा.द.शे. ६.२५%) तीन वर्षासाठी पुनर्गुंतवणूक करण्यात आलेली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

(ब) अ.नं.२ मध्ये नमूद केलेली रक्कम अधिनियम -२००४ ,कलम २०(३) तसेच महाराष्ट्र शासन, सासवि २००५/४०६/(६३)/का.सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांचे दिनांक १४ नोव्हेंबर२००५ चे पत्रातील गुंतवणूकीबाबतच्या नियमास अधिन राहून सदरची रक्कम ही संस्थानचे बचत खात्यात वर्ग करण्यात यावी, असे ठरले.

(क) माहे मार्च २००६ अखेर पर्यन्त देयके मोठ्या प्रमाणात असल्याने या महिन्यात गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होणार नाही. तसेच व्यवस्थापन समितीची सभा दिनांक ८ मे २००५ रोजी शिरडी येथे आरक्षण क्र.३४ मधील जमीन खरेदी विषयक निर्णय झालेला आहे. व सदर जमीन खरेदीसाठी दिनांक १८ डिसेंबर २००५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणाऱ्या रकमेपैकी रक्कम रुपये ६ कोटी संस्थानच्या बचत खाती राखून ठेवण्यात आलेली आहे. तथापि, सदर जमिनीची अद्यापही खरेदी झालेली नाही व मार्च २००६ अखेर सदर जमीन खरेदी होणार नसल्यास रक्कम रुपये ६ कोटी व मार्च,२००६ या महिन्यात खर्च वजा जाता महिना अखेरीस काही रक्कम उपलब्ध झाल्यास, अल्पमुदतीसाठी संस्थानचे युनियन बँक ऑफ इंडिया,शिर्डी व बँक ऑफ बरोडा,नाशिक या संस्थानला सेवा देणाऱ्या बँकेकडे त्यांचेकडील प्रचलीत व्याजदराप्रमाणे गुंतविण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६. शिधा स्वरुपात मदत मिळणेबाबत श्रीविठ्ठल रुख्मिणी मंदीर ट्रस्ट,शिर्डी यांचे पत्र.**

**निर्णय क्र.१७९** खालील ट्रस्टने श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा म्हणून वस्तूरुपाने मदत मिळणेबाबत अर्ज केलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री बी.एस.गोंदकर, उपाध्यक्ष, श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर, | समस्त गांवकरी मंडळींनी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि. ४ मार्च ते दि.११ मार्च २००६ अखेर आयोजित असून कार्यक्रमचे महाप्रसादासाठी. | साखर, तांदुळ, तुप, हरबरा दाळ इ.वस्तुरुपात शिधा मिळणेबाबत पत्र. |

दि.४/२/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७० अन्वये अशाप्रकारचे शिधा स्वरुपाचे प्रस्ताव अमान्य झालेले आहेत.

परंतू सदरहू कार्यक्रम स्थानिक असून दरवर्षी त्यांना शिधा रुपाने मदत संस्थानकडून दिली जाते. त्याअनुषंगाने उपरोक्त कार्यक्रमास एक विशेष बाब म्हणून रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार मात्र) चा शिधा म्हणून वस्तूरुपाने मदत देण्यात यावी असें ठरलें.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**निर्णय क्र.१७९ <u>याचवेळेस काही सदस्यांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या,</u>**

०१. भक्तनिवासस्थान, धर्मशाळा या ठिकाणी भक्तांना जाण्यासाठी नवीन साईप्रसाद येथून संस्थानमार्फत बसेसची व्यवस्था केलेली आहे. याठिकाणी भक्तांना थांबण्यासाठी पत्र्याचे शेडही उभारण्यात आलेले आहे. मात्र बस येईपर्यंत येथे भक्तांना ताटकळत उभे रहावे लागते. म्हणून याठिकाणी भक्तांना बसण्यासाठी बाके टाकण्यात यावीत.

०२. संस्थान प्रकाशित पुस्तके-फोटो-सीडी भक्तांना वेळेवर उपलब्ध व्हावीत याकरिता साठा संपण्यापूर्वीच आवश्यकतेनुसार नवीन छपाई करुन घेण्यात यावी.
०३. तिरुपती, पुट्टूपर्ती, अक्षरधाम इ.ठिकाणी देणगी स्वीकारण्याचे पद्धतीबाबत सविस्तर अभ्यास करणेकामी संस्थान अधिकाऱ्यांना पाठविण्यात यावे.

वरील निर्णय क्र.१०५ ते १७९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

*Satarday 9/03/06*